नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : २८३ | किंमत : ४ रूपये

Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे    POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




**सोमवार, दि. २८ सप्टेंबर २०२६**

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

# कळवण-सुरगाणा अखेर दुष्काळाच्या यादीत आता खरी कसोटी लोकप्रतिनिधींच्या मागणीला यश

**कळवण/नाशिक : (स. गांवकरी)**

नाशिक जिल्ह्यातील कळवणआणि सुरगाणा तालुक्यांचा अखेर दुष्काळग्रस्त तालुक्यांच्या यादीत समावेश झाल्याने तालुक्यातील शेतकरी, आदिवासी बांधव आणि नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.कळवण-सुरगाणा तालुक्यातील दुष्काळी परिस्थिती,पाण्याची टंचाई,शेतीसमोरील संकट भौगोलिक परिस्थितीचा विचार करून दुष्काळी यादीत समावेश करण्यासाठी राष्ट्रीय उपाध्यक्षा डॉ. भारती पवार आणि आमदार नितीन पवार यांनी सातत्याने पाठपुरावा केला.

कळवण-सुरगाणा तालुक्यात निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीची सविस्तर माहिती मांडण्यासाठी राष्ट्रीय उपाध्यक्षा डॉ.भारती पवार यांनी मुंबई येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेतली.यावेळी दोन्ही तालुक्यांची भौगोलिक परिस्थिती,पावसाचे बदलते स्वरूप,शेती आणि पशुधनावर होणारा परिणाम तसेच भविष्यात निर्माण होणाऱ्या पाणीटंचाईबाबत सविस्तर माहिती देत कळवण-सुरगाण्याचा दुष्काळी यादीत समावेश करण्याची मागणी करण्यात आली.



नाशिक येथील विभागीय आयुक्त कार्यालयात कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या अध्यक्षतेखाली दुष्काळ संदर्भात झालेल्या आढावा बैठकीत आमदार नितीन पवार यांनी कळवण-सुरगाणा तालुक्यांच्या भौगोलिक परिस्थितीचा मुद्दा ठामपणे मांडला. कळवण-सुरगाणा परिसरातील अनेक भाग डोंगराळ व तीव्र उताराचे असल्याने पावसाचे पाणी मोठ्या प्रमाणावर वाहून जाते. त्यामुळे पाऊस झाल्यानंतरही त्याचा अपेक्षित जलसाठा निर्माण होत नाही. परिणामी पावसावर आधारित शेती, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता आणि जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर होण्याची शक्यता निर्माण होते.

ही वस्तुस्थिती प्रशासनाच्या निदर्शनास आणून देत दुष्काळी परिस्थितीचे गांभीर्य बैठकीत ठामपणे मांडण्यात आले.

प्रशासनाच्या निर्णयामुळे नागरिकांना दिलासा लोकप्रतिनिधींनी सातत्याने मांडलेले प्रश्न आणि प्रशासनाने केलेला परिस्थितीचा आढावा यानंतर कळवण व सुरगाणा या दोन्ही तालुक्यांचा दुष्काळी यादीत समावेश करण्यात आला आहे.उपलब्ध अहवालानुसार नाशिक विभागातील दुष्काळाच्या यादीत कळवण आणि सुरगाणा या दोन्ही तालुक्यांचा समावेश आहे.कळवण तालुक्यात मोठ्या प्रमाणावर अनुसूचित जमातीची लोकसंख्या असून शेती,पशुपालन आणि पावसावर आधारित उपजीविकेवरअनेक कुटुंबेअवलंबूनआहेत. जिल्हा परिषदेच्या माहितीनुसार कळवण तालुक्यात अनुसूचित जमातीची लोकसंख्या १,४३,६६७ इतकी आहे.आता दुष्काळ जाहीर झाला;पुढे नियोजनाची खरी कसोटीदुष्काळी यादीत समावेश हा केवळ शासन निर्णयापुरता विषय न राहता त्यानंतर प्रत्यक्ष उपाययोजना होणे आवश्यक आहे. पाणीटंचाईचा सामना करण्यासाठी गावागावांत पाणी उपलब्धतेचे नियोजन, पिण्याच्या पाण्याला प्राधान्य, जलसंधारणाची कामे, नाला खोलीकरण, बंधारे, शेततळे, पाझर तलाव आणि उपलब्ध जलस्रोतांचे संवर्धन यावर भर देण्याची गरज आहे.

विशेषतः पाऊस पडला की पाणी वाहून जाण्याऐवजी ते गावाच्या परिसरात आणि शेतात कसे अडवता येईल', याचा दीर्घकालीन आराखडा तयार करण्याची आवश्यकता आहे.

जनावरांच्या चाऱ्याचेही नियोजनआवश्यक

दुष्काळाचा परिणाम केवळ पिकांवर होत नाही, तर पशुधनावरही मोठ्या प्रमाणात होतो. त्यामुळे जनावरांसाठी चारा उपलब्ध करून देणे, चारा छावण्या अथवा आवश्यक त्या चारा व्यवस्थेचे नियोजन करणे, पाणवठे उपलब्ध ठेवणे आणि पशुधनाचे संरक्षण करणे याकडे प्रशासनाने गांभीर्याने पाहणे गरजेचे आहे.

शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान, जनावरांच्या चाऱ्याची समस्या, पिण्याच्या पाण्याची टंचाई आणि रोजगाराचा प्रश्न अशा अनेक संकटांची मालिका दुष्काळामुळे निर्माण होऊ शकते. त्यामुळे दुष्काळ जाहीर करण्याबरोबरच 'दुष्काळपूर्व तयारी आणि दुष्काळानंतरची पुनर्बांधणी' या दोन्ही बाबींवर शासनाने लक्ष केंद्रित करणेआवश्यक आहे.

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनीही पाण्याचा वापर अत्यंत नियोजनबद्ध आणि काटकसरीने करणे गरजेचे आहे. पावसाचे पाणी साठवणे, घरगुती पाणी बचत, शेतातील पाणी व्यवस्थापन आणि जलसंधारणाच्या कामांना लोकसहभागातून गती देणे ही काळाची गरज आहे. आजचा साठवलेला प्रत्येक थेंब उद्याच्या संकटात मोठी भूमिका बजावू शकतो. त्यामुळे 'पाणी अडवा, पाणी जिरवाआणि उपलब्ध पाण्याचा योग्य वापर करा'हा संदेश गावागावांत प्रभावीपणे पोहोचविण्याची आवश्यकता आहे.




# वाशी मार्केटमध्ये माथाडी कामगारांचा भव्य मेळावा!

**नवी मुंबई : (स. गांवकरी)**

माथाडी कामगारांच्या हक्कांसाठी आयुष्यभर संघर्ष करणारे स्व. आमदार अण्णासाहेब पाटील यांच्या ९३व्या जयंतीनिमित्त वाशी येथील कांदा-बटाटा मार्केटमध्ये माथाडी कामगारांचा भव्य मेळावा उत्साहात पार पडला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या मेळाव्यास माथाडी कामगार, पदाधिकारी व विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी वडाळा माथाडी घरकुल प्रकल्पाच्या शुभारंभाची घोषणा करण्यात आली.

माथाडी कामगारांना निवारा व भविष्यासाठी स्थैर्य मिळावे, या उद्देशाने हा प्रकल्प महत्त्वपूर्ण ठरणार आहे. तसेच गुणवंत माथाडी कामगारांचा पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.

स्व. अण्णासाहेब पाटील यांनी उभारलेली माथाडी चळवळ श्रम, स्वाभिमान आणि सामाजिक न्यायाची प्रेरणा देणारी असून, त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेत माथाडी कामगारांच्या हितासाठी कार्य करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

## थोडक्यात...

### राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर आज नांदेड जिल्हा दौऱ्यावर

नांदेड (स. गांवकरी) : राज्याच्या सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, पाणीपुरवठा व स्वच्छता, ऊर्जा, महिला व बालविकास तसेच सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर या सोमवार, दि. 28 सप्टेंबर 2026 रोजी नांदेड जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. सोमवार, दि. 28 सप्टेंबर रोजी दुपारी 3 वाजता मसूड, ता. कळमनुरी, जि. हिंगोली येथून मोटारीने नांदेडकडे प्रयाण करतील. सायंकाळी 5.45 वाजता नांदेड विमानतळ येथे त्यांचे आगमन होईल. सायंकाळी 6.45 वाजता नांदेड विमानतळ येथून त्या पुणेकडे प्रयाण करतील.

### सौरभ भोसले यांचे प्रेरणादायी व्याख्यान

वडाळा महादेव (स. गांवकरी) : संपूर्ण महाराष्ट्राला आपल्या विनोदी शैलीने हसविणारे स्टँडअप कॉमेडियन सौरभ भोसले यांचे वडाळा महादेव येथील श्री श्री रविशंकर विद्या मंदिर शाळेत विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी व्याख्यान आयोजित करण्यात आले. मनोरंजनातून विद्यार्थ्यांचे प्रबोधन करताना त्यांनी चांगली मूल्ये, संस्कार आणि सकारात्मक विचारांची मांडणी विनोदी शैलीत केली. गणेशोत्सव काळात श्रीरामपूर येथील खासदार गोविंदराव आदिक सभागृहात आपल्या विनोदी कार्यक्रमातून श्रीरामपूरकरांचे मनोरंजन करणारे सौरभ भोसले यांनी या वेळी शाळेतील विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्यांच्या विनोदी सादरीकरणातून विद्यार्थ्यांना आनंदासोबतच जीवनातील चांगल्या सवयी, संस्कार आणि मूल्यांचे महत्त्व समजावून सांगण्यात आले. या कार्यक्रमाप्रसंगी शाळेचे संस्थापक अध्यक्ष संदीप कसार सर, संस्थेचे व्यवस्थापक सदस्य सागर भोंगळे सर, मुख्याध्यापिका भाग्यश्री आघाडे मॅडम यांच्या हस्ते सौरभ भोसले यांचा द आर्ट ऑफ लिव्हिंग संस्था व श्री श्री रविशंकर विद्या मंदिर शाळेच्या वतीने सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या. उपस्थित सर्वांचे आभार प्रविण गायधने सर यांनी मानले.

# महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आज नांदेड जिल्हा दौऱ्यावर

**नांदेड: (स. गांवकरी)**

राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे हे सोमवार, दि. 28 सप्टेंबर 2026 रोजी नांदेड जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून, या दौऱ्यात ते अर्धापूर तालुक्यातील दुष्काळग्रस्त भागाची पाहणी करणार आहेत. तसेच कंधार तालुक्यातील शिराढोण येथे आयोजित मोफत महाआरोग्य शिबिर कार्यक्रमास उपस्थित राहणार आहेत.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे. सोमवार, दि. 28 सप्टेंबर रोजी दुपारी 1 वाजता हिंगोली येथून मोटारीने अर्धापूरकडे प्रयाण करतील. दुपारी 2 वाजता अर्धापूर येथे दुष्काळग्रस्त भागाचा पीक पाहणी दौरा करतील.

दुपारी 2.45 वाजता अर्धापूर येथून मोटारीने नांदेड येथील शासकीय विश्रामगृहाकडे प्रयाण करून दुपारी 3 वाजता आगमन होईल.

दुपारी 3 ते 4 या वेळेत शासकीय विश्रामगृह, नांदेड येथे नागरिकांची निवेदने स्वीकारण्यासाठी वेळ राखीव ठेवण्यात आला आहे. त्यानंतर सायंकाळी 4 वाजता शिराढोण, ता. कंधार येथील कार्यक्रमस्थळाकडे प्रयाण करतील.

सायंकाळी 4.30 वाजता शिराढोण येथील प्रेरणास्थळ, भीमाशंकर विद्यालय परिसरात लोकनेते कै. माधवराव गोविंदराव पांडागळे यांच्या पूर्णाकृती पुतळा अनावरणानिमित्त आयोजित मोफत महाआरोग्य शिबिर कार्यक्रमास उपस्थित राहतील.

सायंकाळी 5.15 वाजता कार्यक्रमस्थळावरून नांदेड विमानतळाकडे प्रयाण करून 5.45 वाजता विमानतळावर आगमन होईल. सायंकाळी 645 वाजता नांदेड विमानतळ येथून पुणेकडे प्रयाण करतील.

# तामसा भागातील दुष्काळाची पालकमंत्र्यांनी घेतली थेट दखल!

**तामसा : (स. गांवकरी)**

पावसाच्या प्रदीर्घ खंडामुळे तामसा परिसरातील शेती पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, या दुष्काळी परिस्थितीची राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांनी रविवारी (दि. २७) थेट शेताच्या बांधावर जाऊन पाहणी केली. नियोजित कार्यक्रम नसतानाही त्यांनी तामसा भागात थांबून वाळकी फाटा तसेच श्रीक्षेत्र बारालिंग देवस्थान परिसरातील शेतकऱ्यांशी संवाद साधला.

हिंगोलीचा दौरा आटोपून नांदेडकडे येत असताना हदगावचे आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांच्या आग्रहावरून पालकमंत्री सावे यांनी तामसा भागाला भेट दिली. यावेळी पावसाअभावी करपून गेलेल्या पिकांची त्यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. हातातोंडाशी आलेला घास दुष्काळाने हिरावून घेतल्याने हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांनी पालकमंत्र्यांसमोर आपल्या व्यथा मांडल्या.



शेतकऱ्यांशी संवाद साधताना पालकमंत्री अतुल सावे यांनी "शेतकऱ्यांनी खचून जाऊ नये, कोणतीही काळजी करू नये. सरकार खंबीरपणे शेतकऱ्यांच्या पाठीशी आहे," असा दिलासा दिला. पावसाचा मोठा खंड आणि वाढलेल्या उष्णतेमुळे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे त्यांनी सांगितले. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासनाकडून मदत मिळवून देण्यासाठी प्रशासन आवश्यक कार्यवाही करीत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, शेतकऱ्यांच्या नुकसानीची पाहणी करताना त्यांच्या व्यथा ऐकून पालकमंत्री सावे काही काळ भावुक झाल्याचे दिसून आले. प्रत्यक्ष शेताच्या बांधावर येऊन परिस्थितीची पाहणी केल्याने परिसरातील शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले.

यावेळी हदगावचे आमदार बाबुराव कदम कोहळीकर, भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष चैतन्य बापू देशमुख, बालाजी बच्चेवार, तामसा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक शहादेव खेडकर यांच्यासह महसूल व कृषी विभागाचे अधिकारी तसेच तामसा व परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पाहणीदरम्यान आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांनी हदगाव व हिमायतनगर तालुक्यातील दुष्काळी परिस्थितीचे गांभीर्य पालकमंत्री अतुल सावे यांच्या निदर्शनास आणून दिले. दोन्ही तालुक्यांतील भीषण पाणीटंचाई, पिकांचे झालेले अतोनात नुकसान आणि शेतकऱ्यांवरील आर्थिक संकट याबाबत त्यांनी सविस्तर माहिती दिली. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना लवकरात लवकर जास्तीत जास्त आर्थिक मदत, रब्बी हंगामासाठी मोफत बियाणे तसेच पीक विम्याचा लाभ मिळवून देण्यासाठी शासनस्तरावर तातडीने पाठपुरावा करावा, अशी मागणी आमदार कोहळीकर यांनी पालकमंत्री यांना केली.

# एनआरसी कामगारांसोबत मोठा विश्वासघात?

## मुख्य याचिकाकर्त्यां कामगारांना विश्वासात न घेतला परस्पर निर्णय

**टिटवाळा : (स. गांवकरी)**

एनआरसी कंपनीतील कामगारांच्या हक्कांसाठी गेल्या १७ वर्षांपासून सुरू असलेल्या संघर्षाला आता निर्णायक वळण मिळण्याची शक्यता निर्माण झाली असतानाच तसेच कामगारांना लवकरच त्यांच्या हक्काचे पैसे मिळण्याचा मार्ग मोकळा दिसत असताना दिल्ली एनसीएलएटी कोर्टातील केस मागे घेतल्याने कामगारांना पुन्हा मोठी प्रतीक्षा करावी लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे. दिल्लीतील राष्ट्रीय कंपनी कायदा अपील प्राधिकरण अर्थात (NCLAT ) मध्ये सुरू असलेली कामगारांची न्यायालयीन लढाई मागे घेण्याच्या तयारी सुरू असल्याची माहिती कामगारांनी दिली तसेच महाराष्ट्र जनरल कामगार युनियनचे अध्यक्ष कामगार नेते भूषण सामंत, आयटक चे जनरल सेक्रेटरी उदय चौधरी सुकुमार दामले यांनी कामगारांना विश्वासात न घेता कामगारांसोबत कोणत्याही प्रकारची चर्चा न करता कोर्टातून केस मागे घेण्याच्या निर्णय घेतल्याने कामगार चांगलेच संतापले आहेत. त्यामुळे एनआरसी कामगारांमध्ये तीव्र संताप आणि अस्वस्थता निर्माण झाली आहे.

मुख्य याचिकाकर्ते धनराज गायकवाड आणि इतर सर्व कामगारांना विश्वासात न घेता ज्या युनियन वर हजारो कामगारांनी विश्वास ठेवला त्यांनीच कामगारांचा केसाने गळा कापला असा स्पष्ट आरोप एन आर सी कामगार अरविंद पाटील अर्जुन पाटील धनराज गायकवाड यांनी केला आहे.

गायत्री सिंग यांनी सांगितले की केस मागे घेण्यासंदर्भात न्यायालयात अर्ज दाखल करण्यात आला असून कामगारांच्या वकील गायत्री सिंग यांनी यापुढे कामगारांची बाजू न मांडण्याचा निर्णय घेतला आहे.

सतरा वर्ष संघर्ष करून कामगारांना न्याय मिळण्याची आशा निर्माण झाली होती लवकरच कामगारांना दिल्ली कोर्टातील निर्णय लागून अपेक्षित रक्कम मिळण्याची स्पष्ट चिन्हे असताना कामगार नेत्यांनी ऐनवेळी असा निर्णय घेऊन कामगारांना देशोधडीला लावण्याचा विडा उचलला असल्याचा कामगारांनी आरोप केला आहे.




"१७ वर्षे संघर्ष केल्यानंतर आता कामगारांच्या हातात नेमके काय येणार?" असा सवाल उपस्थित केला जात आहे. कामगारांना विश्वासात न घेता कामगार नेत्यांनी कोर्टातून केस मागे घेऊ नये कामगारांची चर्चा करूनच कोर्टातील केस संदर्भात विचार करावा अशी एकमुखी मागणी आजच्या बैठकीत करण्यात आली. तसेच दिल्ली एन सी एल ए टी कोर्टातील जुने फिटिशनर आणि कामगार उदय चौधरी श्रीकांत कांबळे सुकुमार दामले राजेश त्रिपाठी मोहन कांबळे सुनील थोरवे प्राजक्ता कुलधरण व मारुती दिघोळकर यांची भूमिका कामगार विरोधी असल्याचा आरोप करत कामगारांनी आजच्या बैठकीमध्ये एक ठराव करून त्यांची हकालपट्टीचा करण्याचा शेकडो कामगारांच्या उपस्थितीत ठराव मंजूर करण्यात आला. यापुढे वरील कामगारांनी कोर्टात कामगारांतर्फे हजर राहू नये कामगारांची बाजू मांडूने कामगारांचा कोणत्याही प्रकारचा निर्णय घेऊ नये असा एकमुखी निर्णय घेण्यात आला.

दिल्लीतील केस मागे घेतल्यास कामगारांना अतिशय कमी म्हणजेच नाममात्र तुटपुंज्या रकमेवर समाधान लागेल अठरा वर्ष केलेला संघर्ष करून कामगारांच्या पदरी निराशा पडेल ही रक्कम अत्यंत तुटपुंजी असून कामगारांनी या रकमेत जगायचं की घर घ्यायचं की भविष्याची सोय करायची दोन अडीच लाखांमध्ये घर भाड्याने सुद्धा मिळत नाही त्यामुळे हा कामगारांवर अन्याय असल्याचे कामगारांनी सांगितले सांगितले असून कामगारांनी केस मागे घेण्याच्या निर्णयाला विरोध केला आहे. दिल्लीतील NCLATमधील केस मागे घेण्याच्या कथित निर्णयाला मुख्य याचिकाकर्ते धनराज गायकवाड, तसेच कामगार नेते अरविंद पाटील आणि शाहीर अर्जुन पाटील रामदास वळसे पाटील जे.सी. कटारिया यांनी विरोध केला आहे. तसेच या बैठकीसाठी माजी नगरसेवक महेंद्र गायकवाड नगरसेवक राहुल कोट, उपस्थित होते यावेळी ज्या पद्धतीने एनसीएलटी कोर्टात अदानी समूहाच्या बाजूने सहा ते सात वकील लढत असून कामगारांच्या बाजूने केवळ एकट्या वकील गायत्री सिंग लढा देत आहेत. कामगारांच्या विविध प्रश्न संदर्भात गायत्री सिंग सोबत दोन ते तीन वकील अजून असणे गरजेचे असून आवश्यकता पडल्यास आपण कामगारांच्या बाजूने लढण्यासाठी एका वकिलाचा खर्च देण्याची तयारी माजी नगरसेवक महिंद्र गायकवाड यांनी दर्शविली त्यामुळे आगामी काळात कामगारांच्या बाजूने तीन ते चार वकील लढताना कामगारांना पहावयास मिळेल.

### कामगारांचा स्पष्ट सवाल आहे

"ज्यांच्यावर विश्वास ठेवला, त्यांनीच आमचा विश्वासघात केला असेल तर आता कामगारांनी कोणावर विश्वास ठेवायचा?" असा सवाल कामगारांनी उपस्थित केला. असे असले तरी 17 वर्षे संघर्ष करूनही कामगारांच्या वाटेला काय आले ? तारखांवर तारखा कोणताही राजकीय नेता किंवा कामगार नेता दरवेळेस फसवून आपली पोळी भाजून घेत आहे आमच्या पदरी केवळ निराशा पडत आहे तारकावर तारखा किती तारखा करायच्या आम्हाला आमच्या हक्काचे पैसे मिळू द्या प्रत्येक वेळेस कोणत्या ना कोणत्या कारणाने आमचे हाल सुरूच आहेत कॉलनी कधीही कोसळू शकते छोटासा भूकंप किंवा भूगर्भातील हालचालीने जीर्ण झालेल्या भिंती जीर्ण झालेल्या इमारती एका क्षणात भुई सपाट होऊ शकतात आमच्या जीवाचे बरे वाईट झाल्यास याला कोण जबाबदार सर्व कामगारांनी कामगारांच्या बाजूने विचार करून आम्हाला आमच्या पैसे मिळवून द्यावेत अशी मागणी यावेळी कामगारांनी केली आहे.

महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक समर्थ गांवकरी संपादकीय

# शेतकऱ्यांसाठी कोरडा दुष्काळ, मग वृत्तपत्रांसाठी आर्थिक दुष्काळाचे काय?



राज्यातील अनेक भागांमध्ये पावसाअभावी निर्माण झालेल्या परिस्थितीची गंभीर दखल घेत शासनाने शेतकऱ्यांसाठी कोरडा दुष्काळ जाहीर केला. शेतकऱ्यांच्या अडचणींची दखल घेणे आणि त्यांना शासनाकडून मदत मिळणे ही निश्चितच आवश्यक बाब आहे. मात्र, या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर आणखी एका क्षेत्राकडे शासनाने गांभीर्याने पाहण्याची वेळ आली आहे—ते म्हणजे वृत्तपत्र आणि प्रसारमाध्यम क्षेत्र. शेतकरी पावसाची वाट पाहतो, तर वृत्तपत्र व्यवसाय शासनाच्या जाहिरातींच्या आणि प्रलंबित बिलांच्या वाटेकडे पाहत आहे. शेतकऱ्याच्या शेतात पिके करपतात, त्याचप्रमाणे अनेक छोट्या आणि मध्यम वृत्तपत्रांच्या कार्यालयांमध्ये आर्थिक परिस्थिती दिवसेंदिवस बिकट होत आहे. फरक एवढाच की शेतकऱ्याचा दुष्काळ दिसतो; वृत्तपत्रांचा आर्थिक दुष्काळ मात्र कागदांच्या फाइलमध्ये लपलेला आहे. आज अनेक वृत्तपत्रांसमोर कागद, छपाई, शाई, वितरण, वीज, कार्यालयीन खर्च, कर्मचारी वेतन आणि इतर खर्च सातत्याने वाढत आहेत. उत्पन्नाचे स्रोत मात्र मर्यादित होत चालले आहेत. शासनाच्या विविध विभागांकडून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिराती ही अनेक स्थानिक आणि लघु वृत्तपत्रांसाठी उत्पन्नाची महत्त्वाची साधने आहेत. मात्र, जाहिराती मिळणे, त्यांची बिले तयार होणे आणि त्यानंतर प्रत्यक्ष देयक मिळणे या संपूर्ण प्रक्रियेला बराच कालावधी लागतो.

प्रश्न असा आहे की, वृत्तपत्रांनी आपली जबाबदारी वेळेवर पार पाडायची आणि शासनाने त्यांची बिले वेळेवर देण्याची जबाबदारी कधी पार पाडायची?

वृत्तपत्र हे केवळ व्यवसायाचे साधन नाही. ते लोकशाहीचा महत्त्वाचा आधारस्तंभ आहे. गावातील रस्त्यापासून ते मंत्रालयातील निर्णयापर्यंत सामान्य नागरिकांचा आवाज शासनापर्यंत पोहोचवण्याचे काम स्थानिक वृत्तपत्रे करतात. पूर असो, दुष्काळ असो, शेतकऱ्यांचा प्रश्न असो किंवा सामान्य नागरिकांची समस्या—स्थानिक पत्रकार आणि वृत्तपत्रे घटनास्थळी पोहोचून बातमी समाजासमोर आणतात. मात्र या कामाच्या मागे उभ्या असलेल्या संस्थेची आर्थिक परिस्थिती काय आहे, याचा विचार किती वेळा केला जातो?

शेतकऱ्याच्या शेतात दुष्काळ पडतो, तेव्हा शासन मदतीसाठी पुढे येते. पण वृत्तपत्रांच्या अर्थकारणात दुष्काळ पडला तर त्याची दखल कोण घेणार?

सरकारी जाहिरातींची प्रलंबित बिले वेळेत मिळाली नाहीत, तर त्याचा थेट परिणाम वृत्तपत्राच्या संपूर्ण व्यवस्थेवर होतो. छोट्या वृत्तपत्रासाठी काही महिन्यांचे प्रलंबित बिल म्हणजे केवळ कागदावरची थकबाकी नसते; त्यामागे पत्रकारांचे वेतन, मुद्रणालयाचे पैसे, कागदाचा खर्च, वितरण करणाऱ्या व्यक्तींचे मानधन आणि कार्यालयाचा दैनंदिन खर्च असतो. मोठ्या माध्यमसंस्थांना आर्थिक चढ-उतार सहन करण्याची काही प्रमाणात क्षमता असू शकते. परंतु ग्रामीण आणि स्थानिक पातळीवर काम करणाऱ्या लघु व मध्यम वृत्तपत्रांची परिस्थिती वेगळी आहे. त्यांच्या उत्पन्नाचा मोठा आधार जाहिराती आणि स्थानिक वाचकवर्ग असतो. त्यामुळे शासकीय जाहिरातींची बिले वेळेत मिळणे हा त्यांच्या अस्तित्वाचा प्रश्न आहे.

शासनाने शेतकऱ्यांसाठी कोरडा दुष्काळ जाहीर केला, ही बाब स्वागतार्ह आहे. परंतु त्याच वेळी राज्यातील लघु आणि मध्यम वृत्तपत्रांची आर्थिक स्थिती तपासण्यासाठी स्वतंत्र आढावा घेण्याची गरज आहे.

प्रलंबित शासकीय जाहिरात बिलांचा विभागनिहाय आढावा घ्यावा. किती बिले प्रलंबित आहेत, किती रक्कम थकीत आहे आणि ती कधीपर्यंत अदा केली जाणार आहे, याची स्पष्ट माहिती शासनाने द्यावी. जाहिरात वितरण आणि बिल भुगतानाची प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि वेळबद्ध करण्याची गरज आहे. कारण वृत्तपत्र बंद पडणे म्हणजे केवळ एक व्यवसाय बंद होणे नाही; एका परिसराचा आवाज कमकुवत होणे आहे.

आज शेतकरी पावसासाठी आकाशाकडे पाहत आहे आणि अनेक वृत्तपत्र मालक, संपादक आणि पत्रकार शासनाच्या प्रलंबित देयकांकडे पाहत आहेत. दोघांच्या समस्या वेगळ्या असल्या तरी वेदना एकच आहे—उत्पन्नाचा अभाव आणि भविष्याची चिंता. म्हणूनच शासनाने शेतकऱ्यांसाठी ज्या संवेदनशीलतेने निर्णय घेतला आहे, त्याच संवेदनशीलतेने वृत्तपत्र क्षेत्रातील आर्थिक संकटाकडेही पाहावे. शेतकऱ्यांच्या शेतात दुष्काळ पडला आहे; पण वृत्तपत्रांच्या अर्थकारणात पडलेला दुष्काळही दुर्लक्षित करू नये.

लोकशाही मजबूत ठेवायची असेल, तर तिचा आवाज जिवंत ठेवावा लागेल. आणि तो आवाज जिवंत ठेवण्यासाठी वृत्तपत्रांची आर्थिक घडीही मजबूत असणे तितकेच आवश्यक आहे.

आता प्रश्न एकच—शेतकऱ्यांसाठी कोरडा दुष्काळ जाहीर झाला; पण वृत्तपत्रांवर पडलेल्या आर्थिक दुष्काळासाठी शासन काय करणार?

# थोडक्यात पण महत्वाचे



## नानजी ठक्कर यांच्या वाढदिवसा निमित्त शालेय साहित्य वाटप!

अकोले (स. गांवकरी) : शेठ नानजीभाई खिमजीभाई ठक्कर (ठाणावाला) यांच्या वाढदिवसानिमित्त पिंपळगाव नाकविंदा, आढळवाडी व सोंगाळवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमधील विद्यार्थ्यांना वह्या, पेन व शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे व महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे सहसचिव प्रा. सचिन लगड यांच्या वतीने हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी वाळिबा लगड, गणेश बगनर, मुख्याध्यापक कचरू बेणके, विष्णू भांगरे, गणपत मुठे, बाळू धिंदळे, समता कराळे आदी उपस्थित होते. या उपक्रमाबद्दल तिन्ही शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी, पालक, ग्रामस्थ व शाळा व्यवस्थापन समितीच्या वतीने डॉ. विश्वासराव आरोटे व प्रा. सचिन लगड यांचे आभार मानण्यात आले.



## रोटरी क्लब ऑफ दिवा, ठाणेच्या वतीने वृक्षारोपण

ठाणे (स. गांवकरी) : पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत रोटरी क्लब ऑफ दिवा, ठाणे यांच्या वतीने रविवारी (२७ सप्टेंबर) वृक्षारोपण उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. संकल्प सर्वोदय शैक्षणिक संकुल, कोळेगाव-घेसर रोड, निळजे येथील सर्वोदय विद्यालयाच्या प्रांगणात तब्बल ४५ रोपांची लागवड करण्यात आली. या उपक्रमातून विद्यार्थ्यांसह नागरिकांमध्ये पर्यावरण संरक्षण आणि वृक्षसंवर्धनाबाबत जनजागृती करण्याचा संदेश देण्यात आला. लावण्यात आलेल्या रोपांची नियमित देखभाल व संगोपन करण्याचे आवाहनही यावेळी करण्यात आले. या वृक्षारोपण कार्यक्रमास रोटरी क्लब ऑफ दिवाचे अध्यक्ष गणेश टावरे, माजी अध्यक्ष किशोर पाटील, प्रकल्प प्रमुख गजानन पाटील सर, स्वप्नील गायकर सर, साईनाथ म्हात्रे सर, डॉ. पराग जोशी, शुभम म्हात्रे आणि सक्षम पाटील यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. उपस्थितांनी वृक्षारोपणाचे महत्त्व अधोरेखित करत पर्यावरण रक्षणासाठी सातत्याने उपक्रम राबविण्याचा संकल्प व्यक्त केला.

## कोंढवळ-तेरुंगणला मुसळधार पावसाचा तडाखा; भरपाईची मागणी

मंचर (स. गांवकरी) : आंबेगाव तालुक्याच्या पश्चिम आदिवासी भागातील भीमाशंकर खोऱ्यात तीन दिवसांपूर्वी झालेल्या ढगफुटीसदृश मुसळधार पावसाचा कोंढवळ व तेरुंगण परिसराला मोठा फटका बसला. पावसामुळे भातखाचरे, शेतबांध, ग्रामीण रस्ते व मोऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी होत आहे. अचानक पावसाचा जोर वाढल्याने ओढे-नाले दुथडी भरून वाहू लागले. डोंगर उतारावरून आलेल्या पाण्यामुळे रस्त्यांवर माती, दगड व झाडे आल्याने वाहतुकीला अडथळा निर्माण झाला.तेरुंगण गावठाण ते वनदेव परिसर तसेच कोंढवळ गावठाण भागातील मोऱ्यांचे कठडे तुटले.त्यामुळे पाण्याचा प्रवाह बदलून शेतजमिनीत पाणी शिरले. रस्त्यालगतचे बांध फुटल्याने भातखाचरांतील माती व पिके वाहून गेली.ऐन भातशेतीच्या हंगामात झालेल्या नुकसानीमुळे शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. वाहून गेलेले बांध व खाचरे पूर्ववत करण्यासाठी मोठा खर्च करावा लागणार आहे.संबंधित यंत्रणांनी तातडीने पाहणी करून पंचनामे करावेत आणि शासनाच्या नियमानुसार नुकसानभरपाई द्यावी,अशी मागणी काळू डामसे, शांताराम कारोटे, ज्ञानेश्वर कारोटे आणि महादू वाजे यांनी केली आहे.

## अमोल बेंगडे यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना लेखन फलकांचे वाटप

मंचर (स. गांवकरी) : कुरवंडी (ता.आंबेगाव) येथील उद्योजक अमोल बेंगडे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त भावडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील इयत्ता पहिली ते सातवीच्या ५५ विद्यार्थ्यांना लेखन फलकांचे वाटप करण्यात आले. सामाजिक दातृत्वाच्या भावनेतून या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, अशी माहिती मुख्याध्यापिका तनुजा पिंगळे यांनी दिली. या कार्यक्रमास भावडी शाळेच्या शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दिगंबर कातळे, उपाध्यक्ष विशाल चक्कर, तंटामुक्ती समितीचे माजी अध्यक्ष हरिश्चंद्र चक्कर पाटील, सदस्य पंढरीनाथ नवले तसेच शिक्षकवृंद उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापिका तनुजा पिंगळे यांनी केले.आभार उषा मुळुक यांनी मानले.

# रायखोडच्या लोकसहभाची जिल्हाधिकाऱ्यांकडून दखल ‘जलतारा’चे उद्घाटन

भोकर : (स. गांवकरी)

लोकसहभागातून गावाच्या विकासाला गती देत आरोग्य, शिक्षण, स्वच्छता आणि सामाजिक बांधिलकीचा समन्वय साधणाऱ्या रायखोड येथील विविध उपक्रमांची जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी शनिवारी (२६ सप्टेंबर) पाहणी करून कौतुक केले.

‘माझे गाव आरोग्यसंपन्न गाव’ अभियानांतर्गत लोकवर्गणीतून उभारण्यात येणाऱ्या लोकोपयोगी ‘जलतारा’चे उद्घाटन जिल्हाधिकारी कर्डिले यांच्या हस्ते करण्यात आले.

सेवा समर्पण परिवार आणि तालुका प्रशासनाच्या संयुक्त पुढाकारातून रायखोड येथे ग्रामस्वच्छता, आरोग्य, शिक्षण तसेच विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येत आहेत. या उपक्रमांची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी जिल्हाधिकारी कर्डिले यांनी गावाला भेट दिली. गावकऱ्यांच्या सहभागातून उभारण्यात येणाऱ्या ‘जलतारा’च्या प्रयत्नांचे त्यांनी कौतुक केले.

उद्घाटनानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी अंगणवाडी तसेच जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला भेट देत शैक्षणिक गुणवत्तेचा आढावा घेतला. शाळेत नव्याने उभारण्यात आलेल्या वर्गखोलीचे उद्घाटनही त्यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी गटशिक्षणाधिकारी अजित तरवटे यांनी भोकर तालुक्यात राबविण्यात येत असलेल्या ‘निपुण भोकर’ या शैक्षणिक उपक्रमाची माहिती जिल्हाधिकाऱ्यांना दिली. विद्यार्थ्यांच्या मूलभूत अध्ययन क्षमतांमध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी तालुकास्तरावर सुरू असलेल्या या उपक्रमाची माहिती ऐकून जिल्हाधिकारी कर्डिले यांनी अजित तरवटे यांचे अभिनंदन केले. तसेच ‘निपुण भोकर’ उपक्रमाच्या अमलबजावणीची प्रत्यक्ष पाहणी करून ते समजून घेण्यासाठी गटशिक्षणाधिकाऱ्यास जिल्हा कार्यालयास येण्यासाठी सूचना केले.



दरम्यान, ‘सेवा संकल्प अभियानांतर्गत आयोजित रक्तदान व आरोग्य तपासणी शिबिरालाही जिल्हाधिकाऱ्यांनी भेट दिली. या शिबिरात ग्रामस्थांची रक्तदाब, रक्तातील साखर, सिकलसेल आदींची तपासणी करण्यात आली. आवश्यकतेनुसार औषधोपचार व आरोग्यविषयक मार्गदर्शन देण्यात आले. रक्तदान शिबिरात सुमारे 35 रक्तदात्यांनी रक्तदान करून राष्ट्रीय कार्यास हातभार लावला.ग्रामीण भागात आरोग्यसेवा लोकांच्या दारापर्यंत पोहोचविण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमाचे जिल्हाधिकाऱ्यांनी कौतुक केले.

सेवा समर्पण परिवाराच्या वतीने जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी शाळेच्या रंगरंगोटीसाठी पाच हजार रुपयांची देणगी तसेच विद्यार्थ्यांसाठी पाठ्यपुस्तके देण्यात आली. गावात लोकसहभागातून राबविण्यात येणाऱ्या शैक्षणिक, आरोग्यविषयक व सामाजिक उपक्रमांची माहिती घेतल्यानंतर जिल्हाधिकारी कर्डिले यांनी रायखोडच्या उपक्रमांचे कौतुक केले. भविष्यात गावाच्या विकासासाठी आवश्यक ती प्रशासकीय मदत करण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

यावेळी उपविभागीय अधिकारी प्रवीण मेंगशेट्टी, गटविकास अधिकारी देशमुख, गटशिक्षणाधिकारी अजित तरवटे, तालुका आरोग्य अधिकारी संदेश जाधव, सेवा समर्पण परिवाराचे तालुकाध्यक्ष देशमुख, सचिव विठ्ठल फुलारी यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, ग्रामपंचायत पदाधिकारी व कर्मचारी, पोलीस पाटील, महसूल विभागाचे अधिकारी तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दुष्काळाच्या संकटात शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे - पालकमंत्री अतुल सावे

नांदेड: (स. गांवकरी)

राज्यात दुष्काळ जाहीर करण्यात आला असून, या संकटाच्या काळात शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. शेतकऱ्यांनी काळजी करू नये, शासनाकडून सर्वतोपरी मदत केली जाईल, अशी ग्वाही राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपरिक ऊर्जा, दिव्यांग कल्याण मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांनी आज दिली.

पालकमंत्री अतुल सावे यांनी आज हदगाव तालुक्यातील जगापूर व तामसा, भोकर तालुक्यातील हळदा व मोघाळी, उमरी तालुक्यातील सोमठाणा, नायगाव तालुक्यातील पळसगाव आणि नांदेड तालुक्यातील तुप्पा येथे भेट देऊन पीक परिस्थितीची पाहणी केली. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांशी, विशेषतः महिला शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी व व्यथा जाणून घेतल्या.

राज्य शासन या संकटात शेतकऱ्यांसोबत असून, त्यांना सर्वतोपरी मदत केली जाईल. शेतकऱ्यांनी खचून जाऊ नये, शासन त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे आहे, असा धीर देत पालकमंत्री सावे यांनी शेतकऱ्यांना दिलासा दिला. तसेच, सर्व पात्र शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळेपर्यंत कर्जमाफीची प्रक्रिया सुरू राहणार असल्याचेही अतुल सावे यांनी यावेळी स्पष्ट केले.



जिल्ह्यातील उर्वरित दोन तालुक्यांचाही ट्रिगर-2 अंतर्गत दुष्काळग्रस्त यादीत समावेश करण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्याशी चर्चा करून अहवाल घेतला असून, या दोन्ही तालुक्यांचाही समावेश केला जाईल, असा विश्वास पालकमंत्री अतुल सावे यांनी व्यक्त केला. या पाहणी दौऱ्यात जगापूर व सोमठाणा येथे आमदार बाबूराव कदम कोहळीकर, हळदा व मोघाळी येथे खासदार अशोकराव चव्हाण व आमदार श्रीजया चव्हाण, पळसगाव येथे आमदार राजेश पवार, तर तुप्पा येथे आमदार आनंद तिडके-बोंढारकर उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांच्यासह संबंधित तालुक्यांचे उपविभागीय अधिकारी, तहसीलदार व तालुका कृषी अधिकारी उपस्थित होते. या पीक परिस्थिती पाहणी दौऱ्यावेळी संबंधित गाव परिसरातील शेतकरी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संत ज्ञानेश्वर नागरी सहकारी पतसंस्थेच्या वार्षिक सभेत लाभांश जाहीर

मंचर: (स. गांवकरी)

मंचर ता.आंबेगाव येथील संत ज्ञानेश्वर नागरी सहकारी पतसंस्थेच्या वार्षिक सभेत साडेअकरा टक्के लाभांश जाहीर करण्यात आल्याची माहिती अध्यक्ष यतीनकुमार हुले यांनी दिली.

संत ज्ञानेश्वर नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, मंचरची २६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शिवगिरी मंगल कार्यालय, मंचर येथे संपन्न झाली. सभेच्या प्रारंभी ॲड.महेंद्र खरात यांनी उपस्थित सभासदांना सहकार विषयाचे प्रशिक्षण दिले. संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता पोखरकर यांनी अहवाल वाचन केले.यावेळी संस्थेचे ज्येष्ठ सभासद महामनी भोर, हिरामण सोमवंशी, प्रमिला निऱ्हाळी आदी उपस्थित होते. पतसंस्थेच्या मंचर, पेठ, शिंगवे, पारगाव, महाळुंगे पडवळ व रांजणी येथे शाखा कार्यरत आहेत.सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात संस्थेला ६० लाख रुपयांचा निव्वळ नफा झाला असून, ठेवी ४५ कोटी रुपये, कर्जवाटप ३१ कोटी रुपये, भागभांडवल २ कोटी ९४ लाख रुपये तर निधी ४ कोटी ९४ लाख रुपये इतका आहे.संस्थेला सातत्याने ‘अ’ लेखापरीक्षण वर्ग प्राप्त झाला असून सभासदांना साडेअकरा टक्के लाभांश देण्यात येणार असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष इंजिनिअर यतीनकुमार हुले यांनी दिली.सभेमध्ये संस्थेच्या व्यवसायवृद्धीसाठी राबविण्यात येणारे विविध उपक्रम, सभासदहिताच्या योजना तसेच भविष्यातील नियोजन याबाबत चर्चा करण्यात आली. रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त सभासदांना दिवाळीपूर्वी भेटवस्तूंचे वितरण करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.संस्थेचे ताळेबंद व नफा-तोटा पत्रकाचे वाचन मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता पोखरकर यांनी केले.



# ढोल-ताशांचा गजर अन् ‘पुढच्या वर्षी लवकर या’चा जयघोष; किनवटमध्ये गणरायाला भावपूर्ण निरोप

किनवट : (स. गांवकरी)

‘गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या’च्या गगनभेदी जयघोषात आणि ढोल-ताशांच्या निनादात किनवट शहरात लाडक्या गणरायाला अत्यंत उत्साही, मंगलमय आणि शांततापूर्ण वातावरणात भावपूर्ण निरोप देण्यात आला. शुक्रवारी सकाळपासूनच शहरातील सार्वजनिक गणेश मंडळांनी पारंपरिक वाद्यांच्या गजरात मिरवणुकांना प्रारंभ केला होता. सायंकाळी चारनंतर मानाच्या गणपतींच्या मिरवणुका डीजेमुक्त, पर्यावरणपूरक आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडल्या.

पैनगंगा नदीवरील विसर्जन घाटावर नगरपालिकेतर्फे भाविकांसाठी विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. नदीपात्रात प्रदूषण रोखण्यासाठी दरवर्षीप्रमाणे यंदाही स्वतंत्र ‘निर्माल्य संकलन’ कुंडांची चोख व्यवस्था करण्यात आली होती, तसेच सुरक्षेच्या दृष्टीने घाटावर पुरेशी प्रकाशव्यवस्था व जीवरक्षक तैनात ठेवण्यात आले होते. या संपूर्ण व्यवस्थेची पाहणी मुख्याधिकारी रोहित भगरे, नगराध्यक्षा सौ. सुजाता यंड्रलवार, शिवसेना नेते करण यंड्रलवार, स्वच्छता व पाणीपुरवठा विभाग प्रमुख अशोक भालेराव यांच्यासह नगरसेवक प्रवीण राठोड, चंद्रशेखर नेम्मानीवार, मारोती मुनेश्वर,



अन्वर मिर्झा रोहित यंड्रलवार, मुकेश नेम्मानीवार तसेच राजेश जोशी यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून केली.

मिरवणूक मार्गावर कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी आणि वाहतुकीची कोंडी होऊ नये, यासाठी महसूल व पोलीस प्रशासनाने संयुक्तपणे सूक्ष्म नियोजन केले होते. तहसीलदार डॉ. शारदा चोंडेकर, नायब तहसीलदार मोहम्मद रफिक यांच्या नेतृत्वाखाली मंडळ अधिकारी, तलाठी व महसूल पथकाने परिस्थितीवर लक्ष ठेवले.

उपविभागीय पोलीस अधिकारी चंद्रशेखर कदम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक जगदीश मंडलवार यांनी विसर्जन घाट आणि शहरातील संवेदनशील नाक्यांवर कडेकोट बंदोबस्त तैनात केला होता. या शिस्तबद्ध नियोजनामुळे मिरवणुकांना सुसूत्र स्वरूप लाभले. माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार, माजी नगराध्यक्ष के. मूर्ती, गटनेते श्रीनिवास नेम्मानीवार, नगरसेवक अभय महाजन यांच्यासह अनेक स्थानिक लोकप्रतिनिधी व सामाजिक कार्यकर्त्यांनी प्रमुख मार्गांवर उपस्थित राहून सहकार्य केले.

# थोडक्यात पण महत्वाचे



## मॉर्डन हायस्कूल ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप!

अकोले (स. गांवकरी) : अकोले शहरातील मॉर्डन हायस्कूल ज्युनिअर कॉलेजमधील विद्यार्थ्यांना शेठ नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला यांच्या वाढदिवसानिमित्त शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या वतीने हा उपक्रम राबविण्यात आला. विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य देऊन त्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न यावेळी करण्यात आला. या सामाजिक उपक्रमाचे उपस्थितांकडून कौतुक करण्यात आले.



## भैरवनाथ हायस्कूल कॉलेजच्या विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप!

अकोले (स. गांवकरी) : अकोले तालुक्यातील मुळा परिसरातील अकोले तालुका एज्युकेशन सोसायटी संचलित भैरवनाथ हायस्कूल ज्युनिअर कॉलेजमधील विद्यार्थ्यांना शेठ नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला यांच्या वाढदिवसानिमित्त शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या वतीने हा उपक्रम राबविण्यात आला. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला प्रोत्साहन देणाऱ्या या उपक्रमाचे उपस्थितांकडून कौतुक करण्यात आले.



## ढोल-ताशांच्या निनादात पडघ्यात बाप्पाला निरोप

भिवंडी (स. गांवकरी) : भिवंडी तालुक्यातील अनेक गावांचा केंद्रबिंदू आणि मध्यवर्ती बाजारपेठ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पडघा येथे दहा दिवस मनोभावे सेवा केलेल्या गणरायाला अनंत चतुर्दशीच्या मुहूर्तावर भावपूर्ण वातावरणात निरोप देण्यात आला. अकरा दिवसांच्या वास्तव्यानंतर बाप्पाच्या मूर्ती सजवलेल्या ट्रॅक्टर, टेम्पो व चारचाकी वाहनांतून वाजत-गाजत पडघा येथील ओहळ आणि कुंभीरी नदीवरील विसर्जन घाटावर नेण्यात आल्या. यावेळी पडघेकरांनी 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या'चा जयघोष करत आपल्या लाडक्या बाप्पाला निरोप दिला. विसर्जन मिरवणुकीत फटाक्यांची आतषबाजी, ढोल-पथकाचा ठेका तसेच पारंपरिक वेशभूषेतील महिला-भगिनींचा सहभाग हे विशेष आकर्षण ठरले. तसेच विद्युत रोषणाईने सजवलेले वाहन सर्वांचे लक्ष वेधून घेत होते. पडघा ग्रामपंचायतीच्या वतीने दोन्ही विसर्जन घाटांवर, पिण्याचे पाणी आणि प्रकाशाची व्यवस्था करण्यात आली होती. तसेच कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पडघा पोलिस ठाणे व होमगार्ड जवानांचा चोख बंदोबस्त ठेवला होता. या विसर्जन मिरवणुकीत ८० हून अधिक गणेशमूर्तींचे विसर्जन करण्यात आले. यावेळी पडघे गावातील अनेक गणेशभक्त मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## आज वडाळा महादेव येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिर

वडाळा महादेव (स. गांवकरी) : एकात्मिक सल्ला व चाचणी केंद्र, उपजिल्हा रुग्णालय श्रीरामपूर, आरोग्य उपकेंद्र वडाळा महादेव आणि एच. व्ही. देसाई नेत्र रुग्णालय, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच ग्रामपंचायत कार्यालय, वडाळा महादेव यांच्या सहकार्याने सोमवार, दि. २८ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ९ ते दुपारी ४ वाजेपर्यंत मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर ग्रामपंचायत कार्यालय, वडाळा महादेव येथे होणार आहे. शिबिरात मोफत नेत्र तपासणी, हिपॅटायटिस बी व सी तपासणी, एचआयव्ही तपासणी व समुपदेशन, गुप्तरोग तपासणी व उपचार, क्षयरोग (टीबी) तपासणी तसेच आयुष्मान कार्ड नोंदणी व तपासणी अशा विविध आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. शिबिरातील सर्व तपासण्या व औषधे पूर्णपणे मोफत असून तज्ज्ञ वैद्यकीय अधिकारी व आरोग्य कर्मचारी उपस्थित राहणार आहेत. लाभार्थ्यांनी आधार कार्ड व रेशन कार्ड सोबत आणावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे. तपासणीसाठी सकाळी ९ वाजल्यापासून नावनोंदणी सुरू होणार असून, अधिक माहितीसाठी आरोग्य उपकेंद्र, वडाळा महादेव येथे संपर्क साधावा, असे आवाहन डॉ अनुराधा अनाप डॉ पि आर जाधव सिस्टर शितल दुंशीग आरोग्य सेवक सत्यम पवार यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## वळती येथे विजेचा धक्का; कैलास बेनके यांचा दुर्दैवी मृत्यू

मंचर (स. गांवकरी) : वळती (ता.आंबेगाव) येथील बेनकेमळा येथे घराच्या बांधकामादरम्यान पाणी मारण्यासाठी गेलेल्या कैलास जिजाभाऊ बेनके (वय ४५) यांचा विजेचा धक्का लागून रविवार दि.२७ रोजी सकाळी दुर्दैवी मृत्यू झाला.सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास ही दुर्घटना घडली. मिळालेल्या माहितीनुसार, कैलास बेनके हे घराच्या सुरू असलेल्या बांधकामाच्या ठिकाणी पाणी मारण्यासाठी गेले होते.त्यावेळी त्यांना अचानक विजेचा जोरदार धक्का बसला.या घटनेनंतर त्यांना तातडीने मंचर उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी केल्यानंतर त्यांना मृत घोषित केले.घटनेची माहिती मिळताच मंचर पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. कैलास बेनके हे आंबेगाव तालुक्यातील डीजे क्षेत्रातील परिचित तरुण होते.

# दिलीप वळसे पाटील महाविद्यालयात डॉ. मनमोहन सिंग यांची जयंती साजरी

आळेफाटा : (स. गांवकरी)

श्री पांडुरंग ग्रामीण विकास प्रतिष्ठान संचलित दिलीप वळसे पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ तथा भारताचे माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाच्या अर्थशास्त्र विभागाच्या वतीने करण्यात आले.



कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते डॉ. मनमोहन सिंग यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष संदिपान पवार, सचिव परेश घोडे तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य प्रल्हाद शिंदे प्रमुख मान्यवर म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अर्थशास्त्र विभागप्रमुख प्रा. अनिल पडवळ यांनी केले. यावेळी प्रा.संजय दुधावडे यांनी डॉ. मनमोहन सिंग यांच्या जीवनकार्यावर व देशाच्या आर्थिक विकासातील त्यांच्या योगदानावर मनोगत व्यक्त केले. डॉ. मनमोहन सिंग यांनी अर्थतज्ज्ञ, रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर, केंद्रीय अर्थमंत्री आणि भारताचे पंतप्रधान म्हणून देशाच्या आर्थिक व सामाजिक विकासात महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांच्या साधेपणा, अभ्यासू वृत्ती आणि अर्थव्यवस्थेबाबतच्या दूरदृष्टीचा विद्यार्थ्यांनी आदर्श घ्यावा, असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

कार्यक्रमाचे आभार प्रा. सुभाष घोडे यांनी मानले. संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन व आयोजन अर्थशास्त्र विभागाच्या वतीने करण्यात आले. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गणेश मंडळाचा दंत तपासणी उपक्रम गरजू नागरीकांसाठी वरदान: गोपाळदादा तिवारी

पुणे: (स. गांवकरी)

'शरीराच्या आरोग्यात, दातांचे आरोग्य महत्वाचे असुन दांत हे शरीर आरोग्याचे प्रवेशद्वार असल्याचे वक्तव्य काँग्रेस नेते गोपाळदादा तिवारी यांनी केले. नवी पेठ तालीम येथील "श्री गणेश मित्र मंडळ सार्व. गणेशोत्सव", पुणे यांनी आयोजित 'विनामुल्य दंत तपासणी व उपचार' उपक्रमाच्या समारोप प्रसंगी ते बोलत होते. एम ए रंगुनवाला कॉलेज ऑफ डेंटल सायन्स, पुणे यांचे सहकार्याने सदरचे 'दंत चिकीत्सा शिबीर' आयेजित केले होते. दंत चिकीत्सा उपक्रमाचा शुभारंभ श्री गणेश मंडळाचे जेष्ठ कार्यकर्ते श्री वसंतराव गवारे यांचे हस्ते झाले.

समारोप प्रसंगी, काँग्रेस नेते गोपाळदादा पुढे म्हणाले की, 'सार्वजनिक गणेशोत्सवात - सार्वजनिक आरोग्य सेवा' परीसरातील गरजू नागरीकांना उपलब्ध करून देणे, हा स्तुत्य व अभिनंदनीय सामाजिक उपक्रम असुन सामाजिक बांधिलकीचे प्रतिक आहे. धकाधकीच्या जीवनात आरोग्याच्या रक्षणा करीता दांतांची निगा राखणे ही 'एकंदर आरोग्य जपणारी चांगली सवय' असल्याचे सांगीतले. आर्थिक विवंचना वा खर्च करण्यास टाळाटाळ या मध्ये अडकलेल्या आबाल - वृध्द नागरीकांसाठी असे उपक्रम वरदान ठरतात अशी पुस्ती ही त्यांनी जोडली.

एम ए रंगुनवाला कॉलेज ऑफ डेंटल सायन्स'चे डॉ. उत्कर्षा देशपांडे, डॉ.उमेर शेख, डॉ.असिफाली मुलाणी, डॉ.अदनान बागवान, डॉ.मोरेश्वर पवार, निलोफर पटेल इ नी तपासणी केली व गरजेनुसार उपचार दिले. दंत - चिकीत्सा शिबीरात सु ९० नागरीकांनी लाभ घेतला. शिबीराचे निमंत्रक, काँग्रेस'चे प्रभाग अध्यक्ष व मंडळाचे कार्याधक्ष शेखर पवार यांनी आभार प्रदर्शन केले. मंडळाचे अध्यक्ष सागर गोळे सह आशिष शिंदे, आयुष गोळे, समर्थ पवार, अनिकेत काळे इ नी "दंत चिकीत्सा शिबीराचे यशस्वी संयोजन करण्यात" परीश्रम घेतले.



## श्रम आणि ज्ञानातून घडलेला माणूस दिशादर्शक ठरतो : प्राचार्य डॉ. मतकर

वडाळा महादेव: (स. गांवकरी)

श्रम आणि ज्ञानातून घडलेला माणूस समाजासाठी दिशादर्शक ठरतो. ज्येष्ठ साहित्यिक डॉ. बाबुराव उपाध्ये यांनी प्रतिकूल परिस्थितीतही कष्ट, ध्यास व अभ्यासाच्या बळावर आपले जीवन घडविले. आजच्या पिढीने त्यांच्या साहित्यिक व शैक्षणिक कार्याचा अभ्यास करावा, असे प्रतिपादन श्री ढोकेश्वर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लक्ष्मणराव मतकर यांनी केले.

श्रीरामपूर येथील वाचन संस्कृती प्रतिष्ठानचे संस्थापक-अध्यक्ष डॉ. बाबुराव उपाध्ये यांच्या शैक्षणिक व साहित्यिक योगदानाबद्दल प्राचार्य डॉ. मतकर यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी प्रा. शिवाजीराव बारगळ व प्रा. डॉ. सुनील खिलारी यांचाही सत्कार करण्यात आला. प्रारंभी डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. सत्काराला उत्तर देताना डॉ. उपाध्ये यांनी डॉ. मतकर यांच्यासोबतच्या महाविद्यालयीन आठवणींना उजाळा देत त्यांचा प्रेमळ, कष्टाळू व माणुसकीने समृद्ध व्यक्तिमत्त्व म्हणून गौरव केला. तसेच आपल्या पुस्तकांचा संच भेट देऊन त्यांचा सन्मान केला. प्रा. बारगळ व प्रा. डॉ. खिलारी यांनीही मनोगत व्यक्त केले.

## स्वातंत्र्याच्या ७९ वर्षांनंतरही काकडमाळ 'विकासापासून' दूर!

जव्हार : (स. गांवकरी)

देश स्वातंत्र्याची ७९ वर्षे पूर्ण झाल्याचा अभिमान मिरवत असताना, जव्हारपासून अवघ्या १२-१३ किलोमीटर अंतरावर असलेल्या काकडमाळच्या आदिम कातकरी वस्तीला मात्र आजही मूलभूत सुविधांसाठी संघर्ष करावा लागत आहे. एका बाजूला आदिवासी विकासाच्या योजना आणि विविध अभियानांचा गाजावाजा होत असताना, दुसऱ्या बाजूला ११ कुटुंबांच्या या वस्तीलाच अद्याप रस्ता आणि पिण्याचे पाणी मिळालेले नाही. प्रशासनाकडे वारंवार निवेदने देऊनही प्रत्यक्ष काम सुरू न झाल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.



ग्रामपंचायत शिरोशी पैकी पेसा गाव कातकरीपाडा येथील काकडमाळ वस्तीवर सुमारे ११ कुटुंबे असून, जवळपास ११० लोकसंख्या आहे. पेसा नियमानुसार ग्रामसभा घेऊन ग्रामस्थ आपल्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करीत असले, तरी मूलभूत सुविधांच्या प्रश्नावर प्रशासनाची ठोस पावले अद्याप दिसून आलेली नाहीत.

रस्त्याअभावी शाळकरी मुले, वयोवृद्ध, आजारी व्यक्ती आणि गरोदर महिलांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. घरकुल योजनेतून घर मंजूर झाल्यानंतरही बांधकाम साहित्य वस्तीपर्यंत पोहोचविणे हे ग्रामस्थांसाठी मोठे संकट ठरत आहे. सिमेंट, रेती, डबर, पत्रे यांसारखे साहित्य तब्बल ८०० मीटरपेक्षा अधिक अंतर डोक्यावर घेऊन पायी वाहून न्यावे लागत आहे.

या समस्यांबाबत ग्रामस्थांनी उपविभागीय अधिकारी, जव्हार तसेच तहसीलदार, जव्हार यांच्याकडे लेखी निवेदने देऊन वारंवार पाठपुरावा केला. तहसीलदार कार्यालयाकडून स्थळ पाहणी करण्यात आली; मात्र त्यानंतर नेमकी कोणती कार्यवाही झाली, याची कोणतीही लेखी माहिती ग्रामस्थांना देण्यात आलेली नाही.

'पाहणी झाली, आता प्रत्यक्ष रस्ता कधी होणार?' हा प्रश्न काकडमाळच्या ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे. शासनाच्या योजना आणि विकासाच्या घोषणा कागदावर न राहता प्रत्यक्ष काकडमाळच्या वस्तीपर्यंत कधी पोहोचणार, याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

# ग्रामीण महिलांना स्वयंरोजगाराची दिशा; सबला उत्कर्ष फाउंडेशनचा रोजगाराभिमुख उपक्रम!

पडेगाव, छत्रपती संभाजीनगर : (स. गांवकरी)

ग्रामीण व गरजू महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करून रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने सबला उत्कर्ष फाउंडेशन, पडेगाव यांच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. फाउंडेशनच्या अध्यक्षा श्रीमती राजश्री चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली FlavorCrest Masala हा रोजगाराभिमुख उपक्रम सुरू करण्यात आला असून, महिलांना मसाला उत्पादन, स्वच्छता, गुणवत्ता, पॅकिंग, लेबलिंग, विक्री व मार्केटिंगबाबत मार्गदर्शन आणि प्रशिक्षण देण्यात येत आहे.



पडेगाव येथील मीरा नगरमध्ये आयोजित मार्गदर्शन कार्यक्रमात राजश्री चौधरी यांनी महिलांना FlavorCrest Masala होलसेल स्वरूपात घेऊन स्वतःचा व्यवसाय कशा पद्धतीने सुरू करता येईल, याबाबत माहिती दिली. तसेच मसाला युनिटमध्ये महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे आणि व्यवसायाचा विस्तार करण्यासाठी आवश्यक बाबींवर मार्गदर्शन करण्यात आले. मोबाइलचा योग्य वापर करून डिजिटल मार्केटिंग, सोशल मीडिया, ऑनलाइन ग्राहकांशी संपर्क आणि डिजिटल पेमेंटच्या माध्यमातून घरबसल्या व्यवसाय वाढविता येतो, याबाबतही महिलांना प्रशिक्षण देण्यात आले.

या कार्यक्रमाला पडेगाव, मीरा नगर व साई नगर परिसरातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. गणेशोत्सवाच्या निमित्ताने पडेगाव प्रभाग क्रमांक ४ च्या नगरसेविका सौ. सावित्रीबाई वाणी यांचीही उपस्थिती होती. यावेळी राजश्री चौधरी आणि सावित्रीबाई वाणी यांच्यात महिला स्वयंरोजगार, FlavorCrest Masala उद्योग आणि महिलांसाठी रोजगाराच्या विविध संधींबाबत चर्चा झाली. महिलांना केवळ प्रशिक्षण न देता उत्पादनापासून विक्री व डिजिटल मार्केटिंगपर्यंत संपूर्ण व्यवसाय प्रक्रिया समजावून देऊन त्यांना स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी सबला उत्कर्ष फाउंडेशनच्या माध्यमातून सातत्याने प्रयत्न केले जातील, तसेच शासनाच्या माध्यमातून महिलांसाठी विविध प्रकल्प व रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी पुढाकार घेतला जाईल, असे राजश्री चौधरी यांनी सांगितले.



## सापुतारा घाटमार्गात दोन कारची भीषण धडक; आई-मुलगी जखमी

सापुतारा : (स. गांवकरी)

सापुतारा घाटमार्गात सापुताऱ्यावरून खाली येत असताना दोन कारमध्ये समोरासमोर जोरदार धडक होऊन गंभीर अपघात झाला.

मिळालेल्या माहितीनुसार, मराठी कुटुंबाची टाटा नेक्सॉन कार (क्रमांक MH 15 KC 7113) आणि सुरती कुटुंबाची टोयोटा इनोव्हा कार (क्रमांक GJ 05 CK 8712) यांच्यात समोरासमोर जोरदार धडक झाली. या अपघातात टाटा नेक्सॉनच्या पुढील भागाचे मोठे नुकसान झाले असून कारमधील एअरबॅगही उघडल्या.

या दुर्घटनेत टाटा कारमध्ये प्रवास करणाऱ्या आई-मुलगी जखमी झाल्याचे वृत्त आहे. अपघातानंतर परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली आणि जखमींना तातडीने उपचारासाठी जवळच्या रुग्णालयात हलविण्याची व्यवस्था केली.

अपघातामुळे सापुतारा घाटमार्गावर काही काळ वाहतुकीचा खोळंबा निर्माण झाला होता. अपघाताचे नेमके कारण तसेच अन्य कोणी जखमी झाले आहे का, याबाबत अधिक माहितीची प्रतीक्षा आहे.

# अनुदानित आश्रमशाळा सेवक सहकारी पतसंस्थेची सर्वसाधारण सभा संपन्न

ओतूर : (स. गांवकरी)

जुन्नर तालुक्यातील नारायणगाव येथील अनुदानित आश्रमशाळा सेवक सहकारी पतसंस्थेची २१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. २७ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता आर्या हॉल, श्री क्षेत्र ओझर ता. जुन्नर याठिकाणी खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय घोडेगाव अंतर्गत असलेल्या ओतूर, कोळवाडी, आलमे, चावंड, तळेरान, कामशेत, माळेगाव व फुलवडे येथील अनुदानित आश्रमशाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या पतसंस्थेचे सभासद असून ही एक अग्रगण्य पतसंस्था आहे.

ही सभा चंद्रकांत शेळके यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. सभेची सुरुवात दीप प्रज्ववलन व श्री गणेशाच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करून झाली. त्यानंतर दिवंगत कर्मचाऱ्यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली.

या सभेत दहावी, बारावी व विशेष प्रावीण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा व पालकांचा सत्कार 'सभासद-पाल्य गुणगौरव' सोहळ्यात स्कूल बॅग व सन्मानचिन्ह देऊन करण्यात आला. त्याचप्रमाणे सेवानिवृत्त झालेल्या सभासद कर्मचाऱ्यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह सन्मान करण्यात आला.

पतसंस्थेचे संस्थापक-सचिव विजय नवले यांनी सन २०२५-२६ च्या अहवालाचे वाचन करताना ताळेबंद, नफा-तोटा पत्रक वाचून कायम केले. संस्थेचे भागभांडवल १ कोटी ९९ लाख ९५ हजार ६०० इतके असून १ कोटी ३१ लाख २१ हजार ८२८ रुपयांच्या ठेवी आहेत. ४ कोटी ५५ लाख २१ हजार १७६ रुपये



सभासदांना कर्ज वाटप करण्यात आले आहे. चालू आर्थिक वर्षात संस्थेला यावर्षी २६ लाख १५ हजार १२६ रुपये इतका नफा झाला असून सभासदांना ९.५० टक्के लाभांश देण्यात आला आहे.

अध्यक्षीय भाषणात शेळके यांनी पतसंस्थेची चालू आर्थिक वर्षातील परिस्थिती विषद करताना नवनवीन योजनांबाबत माहिती देत संस्थेचा लेखाजोखा मांडला. सभासदांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे देत संस्थेची यशस्वी वाटचाल सुरू राहण्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन प्रयत्न करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले. यावेळी चंद्रकांत शेळके, विजय नवले, गणेश नलावडे, मुख्याध्यापक तुकाराम गायकर, पंढरीनाथ वाडेकर, सुनील पोटे, सचिन डुंबरे, अविनाश घोलप, विजय लोहकरे, प्रशांत फल्ले, रवींद्र काकडे, संतोष गायकवाड, प्रकाश फापाळे तसेच सर्व मुख्याध्यापक, संचालक व सभासद उपस्थित होते. सूत्रसंचालन उपाध्यक्षा उज्वला थोरात यांनी केले. आभार महादेव डोळे यांनी मानले.

# पुण्यातील इंजिनिअरने स्केलरच्या मदतीने बदलले करिअर; पगारात 670 टक्क्यांची वाढ

पुणे : (स. गांवकरी)

आर्थिक अडचणी असूनही नोकरी सांभाळत कौशल्यविकास करून सॉफ्टवेअर इंजिनिअरिंगमध्ये करिअर करण्याचे स्वप्न पुण्यातील अजय तानाजी पाटील यांनी पूर्ण केले.

'स्केलर'च्या माध्यमातून कौशल्ये विकसित केल्यानंतर त्यांना 'सेल्सफोर्स'मध्ये टेक्निकल सपोर्ट इंजिनिअर म्हणून नोकरी मिळाली. या नोकरीतील त्यांचे वेतन सुरुवातीच्या पगारापेक्षा तब्बल ६७० टक्क्यांनी अधिक आहे.

आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन अजय यांनी पुण्यात मेकॅनिकल इंजिनिअरिंगचे शिक्षण घेतले. शिक्षण सुरू असतानाच वयाच्या १८व्या वर्षी त्यांनी 'टाटा कन्सल्टिंग इंजिनिअर्स'मध्ये डिझाइन इंजिनिअर म्हणून कामाला सुरुवात केली. मात्र, त्यांना सॉफ्टवेअर इंजिनिअरिंगमध्ये करिअर करायचे होते.कोडिंगची पार्श्वभूमी नसल्याने त्यांच्यासमोर



मोठे आव्हान होते. नोकरी सोडून शिक्षण घेणेही शक्य नव्हते. त्यामुळे २०२३ मध्ये त्यांनी शैक्षणिक कर्ज घेत 'स्केलर'मध्ये प्रवेश घेतला आणि नोकरीसोबतच सॉफ्टवेअर इंजिनिअरिंगचे शिक्षण सुरू केले.

नोकरीच्या शिफ्टनुसार ते 'स्केलर'चे लाइव्ह वर्ग किंवा रेकॉर्ड केलेली सत्रे पाहत असत. त्यासोबत असाइनमेंट्स पूर्ण करून त्यांनी सातत्याने कौशल्यविकास केला. तंत्रज्ञान क्षेत्रातील मंदीमुळे नोकरी मिळण्यास अपेक्षेपेक्षा अधिक वेळ लागला.

या अनुभवामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढला. त्यानंतर त्यांनी 'स्केलर'च्या माध्यमातून कौशल्यविकास सुरू ठेवला आणि वर्षभरानंतर 'सेल्सफोर्स'मध्ये टेक्निकल सपोर्ट इंजिनिअर म्हणून रुजू झाले. अजय यांच्या मते, पगारातील वाढ ही त्यांच्या प्रवासाचा परिणाम आहे. नोकरी, शिक्षण, कर्जाचे हप्ते आणि कौटुंबिक जबाबदाऱ्या सांभाळत त्यांनी करिअरमध्ये बदल घडवून आणला.




नवरात्रीच्या पार्श्वभूमीवर ठाण्यात ११ ते २० ऑक्टोबरदरम्यान 'रास-रंग ठाणे २०२६' भव्य गरबा-दांडिया महोत्सव रंगणार. रेमंड ग्राउंडवर होणाऱ्या या उत्सवात नामवंत कलाकारांसह विशेष मुलांसाठी व विद्यार्थ्यांसाठीही खास दांडिया कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे भूमिपूजन २५ सप्टेंबर रोजी झाले.

## थोडक्यात बातम्या...



### आमदार संभाजीराव कुंजीर यांनी घेतले श्री स्वामी समर्थांचे दर्शन

अक्कलकोट (स. गांवकरी) : आमदार संभाजीराव कुंजीर यांनी आपल्या परिवारासह श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानला भेट देऊन श्री स्वामी समर्थ महाराजांचे मनोभावे दर्शन घेतले. यावेळी देवस्थानचे चेअरमन तथा भारतीय जनता पार्टीचे नगरसेवक महेश मालक इंगळे यांनी त्यांचा सपत्निक शाल श्रीफळ आणि स्वामींचा प्रसाद देऊन यथोचित सत्कार केला. दर्शनानंतर बोलताना मा. आमदार कुंजीर यांनी देवस्थानच्या वतीने भाविकांसाठी करण्यात येणाऱ्या सोयी-सुविधांबद्दल समाधान व्यक्त केले. चेअरमन महेश मालक इंगळे यांच्या नेतृत्वाखाली देवस्थानचा कायापालट होत असून स्वच्छता, भक्तनिवास आणि दर्शन व्यवस्थेत झालेली सुधारणा वाखाणण्याजोगी असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी चेअरमन महेश मालक इंगळे म्हणाले की माजी आमदार संभाजीराव कुंजीर साहेब हे स्वामींचे निस्सीम भक्त आहेत. आज त्यांनी सपत्नीक येऊन दर्शन घेतले, हा आमच्यासाठी आनंदाचा क्षण आहे. स्वामींचा आशीर्वाद त्यांना आणि त्यांच्या परिवाराला कायम लाभो, हीच प्रार्थना असल्याचे मनोगत व्यक्त केले. या प्रसंगी गौरव कोलते पाटील, शिवू स्वामी, शैलेश राठोड आदी मान्यवर उपस्थित होते.



### जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप!

अकोले (स. गांवकरी) : अकोले तालुक्यातील आढळा जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सावरगाव पाट येथिल विद्यार्थ्यांना शेठ नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला यांच्या वाढदिवसानिमित्त शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या वतीने हा उपक्रम राबविण्यात आला. विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य देऊन त्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न यावेळी करण्यात आला. या सामाजिक उपक्रमाचे उपस्थितांकडून कौतुक करण्यात आले. मुख्याध्यापक - राजेंद्र सदगीर, दशरथ सहाणे, सुलक्षण सहाणे - बाळासाहेब सहाणे, भगवान सहाणे सबाजी दातीर बाळासाहेब मुखेकर, श्री डगळे परिगा उगले, राजकमल नवले, k G शिक्षिका - श्रीम पवार आदी उपस्थित होते.

## कळवण येथे इयत्ता ६ वी ते १० वी च्या शिक्षकांसाठी 'मासिक पाळी व्यवस्थापन' प्रशिक्षण कार्यशाळा संपन्न

कळवण : (स. गांवकरी)

पंचायत समिती शिक्षण विभाग, कळवण यांच्या वतीने आणि राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यातील सर्व इयत्ता ६ वी ते १० वी च्या शाळांमधील शिक्षक-शिक्षिकांसाठी 'मासिक पाळी व्यवस्थापन' या विषयावर विशेष प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन शरद पवार पब्लिक स्कूल, मानूर येथे करण्यात आले होते.



या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गटशिक्षणाधिकारी तेजश्री पवार या होत्या. तज्ञ मार्गदर्शक म्हणून डॉ. राजश्री बोरसे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. या कार्यशाळेचे प्रशिक्षण समन्वयक म्हणून योगिता फड यांनी जबाबदारी सांभाळली. कार्यशाळेदरम्यान डॉ. बोरसे यांनी मासिक पाळीबाबत समाजात असणारे गैरसमज, अंधश्रद्धा आणि संकोच दूर करण्याच्या दृष्टीने शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे सांगितले. मुलींच्या आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करणे, किशोरवयीन वयात होणाऱ्या शारीरिक, मानसिक आणि भावनिक बदलांची शास्त्रीय माहिती पुरवणे, तसेच मासिक पाळीतील स्वच्छतेबाबत योग्य सवयी रुजवणे हा या प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश होता. मानवी हक्क आणि मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार प्रत्येक मुलीला स्वच्छ व सुरक्षित वातावरण मिळावे यासाठी शिक्षकांना प्रशिक्षित करून शालेय स्तरावर वातावरण निर्मिती करणे आवश्यक असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले. या प्रशिक्षणास कळवण तालुक्यातील सर्व माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील इयत्ता ६ वी ते १० वी चे शिक्षक आणि शिक्षिका मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन योगिता फड यांनी अतिशय उत्कृष्टपणे केले, तर उपस्थितांचे आभार निलेश भामरे यांनी मानले. उपक्रमाच्या यशस्वितेसाठी शिक्षण विभागातील कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## उंदीरगावहून दीडशेहून अधिक भाविक खाटू श्याम यात्रेसाठी रवाना

वडाळा महादेव: (स. गांवकरी)

श्रीरामपूर तालुक्यातील उंदीरगाव येथून श्री गंगागिरी महाराज ट्रॅव्हल्सच्या माध्यमातून तसेच अशोक सहकारी साखर कारखान्याचे माजी चेअरमन सुरेश पाटील गलांडे यांच्या मार्गदर्शनाखाली दीडशेहून अधिक भाविक खाटू श्याम यात्रेसाठी रवाना झाले. यात्रेच्या शुभारंभप्रसंगी भाऊसाहेब वमने, सोपान काका औताडे आदी मान्यवरांच्या हस्ते विधीवत पुजन करण्यात आले श्रीक्षेत्र सराला बेटाचे महंत रामगिरीजी महाराज तसेच मान्यवर ग्रामस्थांनी भाविकांना यात्रेसाठी शुभेच्छा दिल्या. या यात्रेदरम्यान भाविकांना मांडू येथील राणी रूपमती महाल, चित्तोडगड येथील राणा कुंभ पॅलेस व विजयस्तंभ, कालीमाता मंदिर, सांवरिया सेठ श्रीकृष्ण मंदिर, पुष्कर ब्रह्माजी मंदिर व सरोवर, राणाजी मंदिर, वराह मंदिर, अजमेर येथील ख्वाजा गरीब नवाज दर्गा, जैन मंदिर, जयपूर येथील हवा महल व जंतरमंतर, पिंक सिटी, सालासर बालाजी मंदिर, हनुमान मंदिर, खाटू श्याम मंदिर, उज्जैन येथील महाकालेश्वर व भैरवनाथ मंदिर, ओंकारेश्वर तसेच माहेश्वर येथील अहिल्याबाई होळकर राजवाडा आदी तीर्थक्षेत्रे व प्रेक्षणीय स्थळांना भेट देण्याची संधी मिळणार आहे.

यात्रा यशस्वी होण्यासाठी सुरेश पाटील गलांडे, बाजार समिती संचालक राजेंद्र पाऊलबुद्धे, भाऊसाहेब बांद्रे, बाबासाहेब काळे, बाबासाहेब आदिक, राजेंद्र गिन्हे, भगवान ताके, गेनूबाबा भालदंड, शिवाजी पाऊलबुद्धे, चित्रसेन पा गलांडे, दिलीप नाईक, बाळासाहेब राऊत, सुरेश शिंदे, बाळासाहेब रोकडे, हरिभाऊ पटारे, हरिभाऊ भालदंड आदींनी सहकार्य केले.

## वीवो इमेजिन स्मार्टफोन फोटोग्राफी अवॉर्ड्स; 'माय सिटी' फिल्म कॅटेगरीचाही समावेश

नवी दिल्ली: (स. गांवकरी)

स्मार्टफोन ब्रँड वीवोने नॅशनल जिओग्राफिक क्रिएटिववर्क्सच्या सहकार्याने वीवो इमेजिन स्मार्टफोन फोटोग्राफी अवॉर्ड्सच्या चौथ्या पर्वाची घोषणा केली आहे. 'आपली जिज्ञासा तुम्हाला कुठे घेऊन जाते?' या थीमअंतर्गत देशभरातील फोटोग्राफी आणि व्हिडिओग्राफीप्रेमींना स्मार्टफोनच्या माध्यमातून सर्जनशीलता आणि व्हिज्युअल स्टोरीटेलिंग सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. स्पर्धेसाठी प्रवेश 23 सप्टेंबरपासून सुरू असून 1 नोव्हेंबर 2026 पर्यंत खुले आहेत.

यंदाच्या पर्वात पोर्ट्रेट, नेचर अँड लँडस्केप, नाइट अँड लाइट, मोशन तसेच स्ट्रीट अँड कल्चर या पाच फोटोग्राफी कॅटेगरी आहेत. याशिवाय 'माय सिटी' या थीमसह फिल्म कॅटेगरीचा प्रथमच समावेश करण्यात आला आहे. या माध्यमातून शॉर्ट-फॉर्म व्हिडिओ आणि स्मार्टफोन स्टोरीटेलिंगला प्रोत्साहन दिले जाणार आहे. वीवो इंडिया येथील चीफ कॉर्पोरेट कम्युनिकेशन्स ऑफिसर गीताज चन्ना यांनी सांगितले की, वीवो इमेजिनने स्मार्टफोन फोटोग्राफीच्या माध्यमातून निर्माण होणाऱ्या कथा आणि सर्जनशीलतेला व्यासपीठ दिले. फिल्म कॅटेगरीच्या समावेशामुळे व्हिडिओच्या माध्यमातून कथा सांगणाऱ्या क्रिएटर्सनाही सहभागी होता येणार आहे.




## आदिवासी विद्यार्थिनीला शैक्षणिक मदत, गरिबीच्या अंधारातून डॉक्टर होण्याचे स्वप्न; डांगच्या संध्याबेन धूम यांना शैक्षणिक मदत

डांग : (स. गांवकरी)

"जंगल आणि वनवगड्यातून निघालेली लेखणी जेव्हा स्टेथोस्कोप बनेल, तेव्हा केवळ एक कुटुंब नव्हे, तर संपूर्ण आदिवासी समाज उन्नत होईल," हा विचार प्रत्यक्षात आणणारा मानवतावादी उपक्रम वघई येथे पाहायला मिळाला.



डांग जिल्ह्यातील वघई तालुक्यातील मालीन गावातील गरीब कुटुंबातील हुशार विद्यार्थिनी संध्याबेन शैलेशभाई धूम यांनी अथक मेहनत आणि गुणवत्तेच्या जोरावर NEET परीक्षा उत्तीर्ण करून MBBS अभ्यासक्रमात प्रवेश मिळवला आहे. त्यांना नडियाद येथील डॉ. एन. डी. देसाई फॅकल्टी ऑफ मेडिकल सायन्स अँड रिसर्च येथे सरकारी कोट्यातून वैद्यकीय प्रवेश मिळाला आहे.

आर्थिक परिस्थिती त्यांच्या डॉक्टर होण्याच्या स्वप्नाच्या आड येऊ नये, यासाठी आदिवासी संस्कृती चॅरिटेबल ट्रस्ट, वघई (डांग) यांच्या वतीने संध्याबेन यांना ₹15,051 ची शैक्षणिक आर्थिक मदत देण्यात आली.

ट्रस्टकडून देण्यात आलेली ही मदत केवळ ₹15,051 इतकी आर्थिक रक्कम नसून, संध्याबेनवरील समाजाचा विश्वास, प्रेम आणि त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठीचे आशीर्वाद यांचे प्रतीक असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

संध्याबेन यांना फ्रीशिप कार्डमुळे शिक्षणाची फी भरता येणार असली, तरी शिक्षणादरम्यान येणाऱ्या सुमारे ₹2 लाखांच्या इतर खर्चाचा प्रश्न त्यांच्या कुटुंबासमोर उभा राहिला होता. अशा परिस्थितीत ट्रस्टसह समाजातील इतर दाते आणि सेवाभावी व्यक्ती त्यांच्या मदतीसाठी पुढे आल्या आहेत.

"फूल नाही तर फुलाची पाकळी" या भावनेतून समाजातील दाते आणि सेवाभावी व्यक्तींकडून शिक्षणासाठी मिळणारे सहकार्य अनेक गुणवंत विद्यार्थ्यांच्या जीवनात नवी आशा निर्माण करू शकते. अशा मदतीमुळे विद्यार्थ्यांना आपल्या शैक्षणिक आणि व्यावसायिक स्वप्नांच्या दिशेने पुढे जाण्यास बळ मिळते. संध्याबेन यांना मदत पोहोचवण्यासाठी ट्रस्टच्या वतीने विजयभाई थोराट, रितेशभाई पटेल, विनयभाई पटेल, जिज्ञेशभाई पटेल, तानाजीभाई पवार, उमेशभाई चौधरी आणि रोहितभाई चौधरी यांच्यासह सहकारी मालीन येथे पोहोचले होते.

संध्याबेन धूम यांचा संघर्ष आणि यश हा संदेश देतो की, प्रतिकूल परिस्थिती स्वप्नांना थांबवू शकत नाही. मेहनत, दृढनिश्चय आणि समाजाचे सहकार्य मिळाल्यास गरिबीच्या परिस्थितीतही यशाची नवी वाट निर्माण करता येते.

डॉक्टर होण्याचे स्वप्न घेऊन पुढे जाणाऱ्या या आदिवासी कन्येला मिळणारे सामाजिक सहकार्य केवळ एका विद्यार्थिनीला आधार देणारे नाही, तर आदिवासी समाजातील पुढील पिढीच्या शिक्षणाला आणि सक्षम भविष्यासाठीही प्रेरणा देणारे ठरत आहे.

## निर्माल्य पाण्यात नाही, खताच्या रूपात शेतात..! सोलापुरात २३ हजार २५७ किलो निर्माल्य संकलित

### १ हजार ६०३ श्रीसदस्यांचा उत्स्फूर्त सहभाग

सोलापूर : (स. गांवकरी)

गणेशोत्सवातील श्रद्धेला पर्यावरण संवर्धनाची जोड देत डॉ. श्री नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान, रेवदंडा, अलिबाग यांच्या वतीने राबविण्यात आलेल्या निर्माल्य संकलन अभियानाला सोलापूर शहरासह परिसरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. अनंत चतुर्दशीच्या दिवशी राबविण्यात आलेल्या या अभियानात तब्बल २३ हजार २५७ किलो उपयुक्त निर्माल्य संकलित करण्यात आले. या निर्माल्यापासून सेंद्रिय खतनिर्मिती करण्यात येणार असून, त्याचा वापर वृक्षलागवड आणि शेतीसाठी केला जाणार आहे.

पद्मश्री तीर्थरूप डॉ. श्री आप्पासाहेब धर्माधिकारी आणि रायगड भूषण तीर्थरूप डॉ. श्री सचिन दादा धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली हा पर्यावरणपूरक उपक्रम राबविण्यात आला. सोलापूर शहरासह मोहोळ, उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर आणि अक्कलकोट तालुक्यातील जवळपास १ हजार ६०३ श्रीसदस्यांनी अभियानात सहभाग घेतला.

गणेश विसर्जनासाठी आलेल्या भाविकांनी हार, फुले, दुर्वा तसेच अन्य निर्माल्य पाण्यात विसर्जित न करता प्रतिष्ठानच्या श्रीसदस्यांकडे जमा केले. जमा झालेल्या निर्माल्यातून प्लास्टिक, थर्माकोल आणि अन्य विघटन न होणारे साहित्य वेगळे करण्यात आले. उपयुक्त निर्माल्य सेंद्रिय खतनिर्मितीसाठी पाठविण्यात आले, तर अनुपयुक्त साहित्य महापालिकेच्या ७४ घंटागाड्यांमार्फत विल्हेवाटीसाठी पाठविण्यात आले.

पाच प्रमुख विसर्जनस्थळी मोठे संकलन

सोलापूर शहरातील श्री सिद्धेश्वर तलाव गणपती घाट, श्री सिद्धेश्वर तलाव विष्णू घाट, विडी घरकुल म्हाडा विहीर, धर्मवीर संभाजीराजे तलाव (कंबर तलाव) आणि हिप्परगा तलाव या प्रमुख विसर्जनस्थळी निर्माल्य संकलन करण्यात आले.

अशा प्रकारे या पाच ठिकाणांहून एकूण २३ हजार २५७ किलो उपयुक्त निर्माल्य संकलित करण्यात आले.

महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओंबासे, महापौर विनायक कोंड्याल, सहाय्यक आयुक्त संदीप कारंजे यांच्यासह शहरातील नागरिकांनीही या उपक्रमाला सकारात्मक प्रतिसाद दिला. भाविकांनी निर्माल्य पाण्यात न टाकता ते संकलन केंद्रांवर जमा केल्याने जलप्रदूषण टाळण्यास मदत झाली.



खताचा वापर वृक्षलागवड आणि शेतीसाठी

सोलापूर शहरात प्रतिष्ठानच्या माध्यमातून मागील चार वर्षांपासून हा उपक्रम सातत्याने राबविला जात आहे. संकलित निर्माल्यापासून तयार होणारे सेंद्रिय खत प्रतिष्ठानच्या वृक्षलागवड उपक्रमासाठी वापरण्यात येते. उर्वरित खत शेतकऱ्यांना शेतीसाठी उपलब्ध करून दिले जाते. त्यामुळे गणेशोत्सवातील निर्माल्याचा पुनर्वापर करून त्याचे सेंद्रिय खतामध्ये रूपांतर करण्याचा पर्यावरणपूरक संदेश या उपक्रमातून दिला जात आहे.

सोलापूर शहराबरोबरच बार्शी, कुर्डूवाडी, पंढरपूर, वेळापूर आणि अकलूज यांसह विविध ठिकाणीही प्रतिष्ठानच्या वतीने निर्माल्य संकलन अभियान राबविण्यात आले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ३८ए, सोमेश्वर अपार्टमेंट, अदाते/शिंदे हॉस्पिटलजवळ, पुरूषोत्तम व्हिला समोर, वडगांव बुद्रुक, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)
कोकण विभागीय कार्यालय : शकुंतल बिल्डिंग, गाळा क्र, २, सेक्टर ५, कोपरखैरणे, नवी मुंबई ४००७०९

नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 । पाने : ५ । वर्ष : ४ थे । अंक : २८३ । किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक
# समर्थ गांवकरी
संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




सोमवार दि. २८ सप्टेंबर २०२६
मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

# दुष्काळग्रस्त महाराष्ट्रासाठी सरकारचा मोठा निर्णय!
# २६५ तालुक्यांत मदत, उर्वरित तालुक्यांचीही पाहणी

नागपूर (समर्थ गांवकरी)

अपुऱ्या पावसामुळे महाराष्ट्रातील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. या तालुक्यांमध्ये दुष्काळ व्यवस्थापनाच्या पहिल्या टप्प्यातील 'ट्रिगर-१' लागू करण्यात आला असून विविध उपाययोजना आणि सवलती सुरू करण्यात आल्या आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेताना मदतीपासून कुणीही वंचित राहणार नाही, अशी ग्वाही दिली.

दुष्काळाच्या यादीत समावेश न झालेल्या तालुक्यांचीही परिस्थिती तपासण्यात येणार आहे. निकषांची पूर्तता झाल्यास पुढील टप्प्यात या तालुक्यांचाही समावेश करून मदत दिली जाईल, असे फडणवीस यांनी स्पष्ट केले. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना पिकांच्या नुकसानीनुसार विहित कार्यपद्धती पूर्ण केल्यानंतर मदत देण्यात येणार आहे. त्यासाठी संबंधित भागात पंचनामे आणि पीक पाहणी सुरू करण्यात आली आहे.

दुष्काळग्रस्त तालुक्यांमध्ये जमीन म हसुलात सवलत, पीक कर्जाचे पुनर्गठन, शेतीशी संबंधित कर्जवसुलीला स्थगिती आणि कृषीपंपाच्या वीजबिलात सवलत यांसारख्या उपाययोजना लागू करण्यात आल्या आहेत. विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात सवलत, रोजगार हमीच्या कामांना चालना आणि गरजेनुसार टँकरने पाणीपुरवठा करण्याचीही तरतूद आहे.

पिण्याच्या पाण्याला सर्वाधिक प्राधान्य देण्यात येणार असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले. प्रत्येक जिल्ह्यासाठी पाणी उपलब्धतेचा आराखडा तयार करण्यात आला असून, उपलब्ध पाण्याचे नियोजन पिण्यासाठी आणि त्यानंतर रब्बी हंगामासाठी करण्याचा विचार आहे.

दरम्यान, गडचिरोलीतील भामरागड परिसरात छत्तीसगडमधील अतिवृष्टीमुळे पूरस्थिती निर्माण झाली होती. प्रशासनाकडून पूरग्रस्तांना मदत दिली जात असून परिस्थिती हळूहळू सुधारत असल्याची माहिती फडणवीस यांनी दिली.

राज्यातील दुष्काळी परिस्थितीवर शासन सातत्याने लक्ष ठेवून असून, प्रभावित भागातील शेतकरी आणि नागरिकांना आवश्यक मदत देण्यासाठी प्रशासनाला



निर्देश देण्यात आले आहेत.

# डॉ. डि. बी. खैरनार फौंडेशन... जामखेड चे भुषण..

जामखेड (समर्थ गांवकरी)

डॉक्टर. खैरनार डि. बी. फौंडेशन हे गेली २६ वर्षा पासुन विविध सामाजिक उपक्रम राबवित आहे. त्या मधे रक्तदान शिबीराचा मोठा वाटा आहे. सतत २६ वर्षे झाली अखंडितपणे रक्तदान शिबीर आयोजित केले जात आहे... सामाजिक बांधिलकी म्हणून हे शिबिर आयोजित केले जात आहे. फक्त सेवा भाव समोर ठेऊन फौंडेशन काम करत आहे.. म्हणून डॉ. खैरनार फौंडेशन जामखेड शहराचे आणि तालुकयाचे भुषण आहे...

डॉक्टर. खैरनार डि. बी. यांना दादा. या नावाने संपूर्ण तालुका.. जिल्हा ओळखत असे.. दादानी वैद्यकीय क्षेत्रात ५५ वर्षे सेवा केली. या मधे १५ वर्षे शासकीय रुग्णालयात सेवा केली. आणि तब्बल ४० वर्षे खाजगी हॉस्पिटलमध्ये सेवा केली.. दादांनी वैद्यकीय क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले आहे. आजही जामखेडकर आदराने दादांची आठवण काढतात.

दादांनी या क्षेत्रात फक्त आणि फक्त सेवा भाव समोर ठेऊन काम केले.

तेही नाममात्र शुल्क घेऊन.

रुग्ण गोळ्यानी बरा होऊ शकत असेल तर फक्त गोळ्याच देत असत..

गरज असेल तर इंजेक्शन देत. फारच आवश्यकता असेल तरच सलाईन लावत असत.. शक्यतो रूग्णाला कमित कमी शुल्क घेऊन बरे करत असत.. या मुळे त्यांच्या कडे जामखेड तालुका.. आष्टी.. पाटोदा. भुम. करमाळा. कर्जत. या तालुक्यामधुन रुग्ण त्यांच्या दवाखान्यात येत असत.

हीच त्यांच्या कामाची पावती होती. जन सामान्य लोक विश्वासाने दवाखान्यात दाखल होत होते...

विशेष म्हणजे दादा हे संघाचे तालुका प्रमुख



होते. त्यानंतर त्यांनी अनेक वर्षे नगर जिल्हा संघ प्रमुख म्हणून काम केले आहे. हिंदूत्ववादी संघटनेचे काम करत होते तरीही त्यांच्या कडे सर्व जाती धर्माचे लोक दवाखान्यात येत होते.. संघाचे पद या मधे कधिही अडसर ठरले नाही..

वैद्यकीय सेवा हे त्यांचे ब्रिद होते. समाज सेवेचे माध्यम होते.. अनेक रूग्ण उपचार घेतल्या नंतर म्हणत असत की दादा आता पैसे आणले नाहीत. नंतर देईन.. दादांचे उतर असेकी तु आगोदर बरा हो. पैसयाचे नंतर पाहू.

असा सेवा भाव आज वैद्यकीय क्षेत्रात अभावानेच दिसतो. नव्हे दुर्मिळ आहे.

दादा च्या ८७ व्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबीर आयोजित केले होते.

यावेळी ५५ जनांनी रक्तदान केले. योगायोग म्हणजे दादांनी ५५ वर्षे वैद्यकीय क्षेत्रात काम केले होते.. फौंडेशन च्या या रक्तदान शिबीरामधे सलग २१ वर्षे रक्तदान करणारे रक्त दाते आहेत सर्वश्री. प्रमोद दाणी. ज्ञानेश्वर अंदुरे. मनीष मासाळ.. ज्ञानेश्वर कुलथे. तुकाराम कुलथे. हनुमंत टेकाळे. रणजीत सुराणा. मयूर भोसले. या रक्त दात्यांनी सलग २१ वर्षे रक्तदान केले आहे.. हे शिबीर यशस्वी करण्यासाठी डॉ. प्रकाश खैरनार.. प्रमोद खैरनार. नागेश पाटील. जगदीश देशपांडे. डॉ. शहाणे. यांनी परीश्रम घेतले.

# लाडक्या बहिणींसाठी मोठी खुशखबर!
# ऑगस्टचा ₹१,५०० हप्ता जमा होण्यास सुरुवात

मुंबई (समर्थ गांवकरी)

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थी महिलांसाठी महत्त्वाची अपडेट समोर आली आहे. ऑगस्ट २०२६ महिन्याचा ₹१,५०० चा हप्ता रखडल्यामुळे लाभार्थी महिलांकडून पैसे कधी जमा होणार, असा प्रश्न उपस्थित केला जात होता. आता ऑगस्टच्या हप्त्यासाठी निधी वितरणाची प्रक्रिया सुरू झाली आहे. त्यामुळे पात्र महिलांच्या खात्यात पैसे टप्प्याटप्प्याने जमा होण्याची शक्यता आहे.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत पात्र महिलांच्या आधार-संलग्न बँक खात्यात दरमहा ₹१,५०० थेट लाभ हस्तांतरणाच्या माध्यमातून जमा केले जातात.

ऑगस्ट महिन्याचा हप्ता वेळेत जमा न झाल्याने गणेशोत्सवाच्या काळात लाभार्थी महिलांचे लक्ष या रकमेच्या प्रतीक्षेकडे लागले होते. आता शासनाकडून हप्त्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याची प्रक्रिया पुढे सरकली आहे. त्यामुळे पात्र लाभार्थींना लवकरच त्यांच्या खात्यात ₹१,५०० जमा झाल्याचा संदेश मिळू शकतो.

पैसे खात्यात आले की नाही, हे कसे तपासता येईल ?

हप्ता जमा झाल्याचा मोबाईलवर मेसेज आला नाही, तरी काही सोप्या पद्धतींनी खात्यात पैसे जमा झाले आहेत की नाही हे तपासता येईल.

बँकेच्या कस्टमर केअरवर संपर्क करून खात्यातील शिल्लक तपासा.

मोबाईल बँकिंग किंवा इंटरनेट बँकिंगम धून बँक स्टेटमेंट तपासा.




बँकेच्या ॲपमध्ये खात्यातील व्यवहार पाहा.

जवळच्या बँक शाखेत जाऊन खात्यात ₹१,५०० जमा झाले आहेत का, याची खात्री करा.

दरम्यान, योजनेशी संबंधित कोणतीही लिंक किंवा अनोळखी संदेशावर क्लिक करण्याऐवजी अधिकृत महाराष्ट्र शासनाच्या पोर्टलवरूनच माहिती तपासण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

# महाराष्ट्रामध्ये पुन्हा हवामान बदल, ६ जिल्ह्यांना यलो अलर्ट

मुंबई (समर्थ गांवकरी)

गणेशोत्सवानंतर राज्यातील हवाम ानात पुन्हा मोठे फेरबदल जाणवणार आहेत. सप्टेंबर महिन्याच्या अखेरच्या दिवसांमध्ये पावसाचं वातावरण कसं असेल? आणि मान्सून परतीच्या वाटेवर असताना राज्यामध्ये पावसाचं चित्र कसं राहील? याबद्दलची माहिती जाणून घेऊया... आज रविवारी हवाम ान खात्याने १६ जिल्ह्यांमध्ये हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता वर्तवली होती. त्याप्रमाणे हवामान खात्याने या भागातील नागरिकांना आणि शेतकऱ्याना हवामानाचा अंदाज लक्षात घेऊन आपल्या कामाचे नियोजन करण्याची माहिती दिली होती. उद्या देखील कोणकोणत्या जिल्ह्यांमध्ये पाऊस बरसणार आहे, जाणून घेऊया...

राज्यामध्ये सोमवारी हवामान बदलाची शक्यता आहे. हवामान विभागाने घाट परिसरामध्ये अर्थात पुणे घाट, कोल्हापूर घाट, सातारा घाट, सांगली, बीड आणि उस्मानाबाद या सहा जिल्ह्यांमध्ये यलो अलर्टचा अंदाज वर्तवला आहे. तर उर्वरित १५ जिल्ह्यांमध्ये हलका ते मध्यम पाऊस होणार असल्याची माहिती देण्यात आली आहे. मध्यम आणि हलका स्वरूपाचा पाऊस मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, नाशिक घाट, छत्रपती संभाजीनगरसह इतरत्र ८ जिल्ह्यांमध्ये पडणार असल्याची शक्यता वर्तवली आहे. या १५ जिल्ह्यांमध्ये हा पाऊस सलग पडणार असून नागरिकांना अधून मधून पावसाच्या सरी अनुभवायला मिळणार आहे. कोकण किनारपट्टीवरील नागरिकांना वातावरण पाहूनच घराबाहेर पडण्याचे आदेश देण्यात आले आहे.

कोकण किनारपट्टीतील पालघर, ठाणे, मुंबई, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या भागात ढगाळ वातावरणासह पाऊस बरसणार असल्याची शक्यता आहे.

# काँग्रेस नेते मा. मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या मागणीतून राज्यात दुष्काळ जाहीर

## शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी गरजेची

संगमनेर (समर्थ गांवकरी)

अलनिनोच्या प्रभावामुळे यावर्षी अत्यंत कमी पाऊस झाला आहे. खरिपाची पिके वाया गेली असून राज्य सरकारने तातडीने सरसकट दुष्काळ जाहीर करावा व शेतकऱ्यांना भरी मदत करावी अशी मागणी काँग्रेस पक्षाचे नेते माजी महसूल व कृषिमंत्री बाळासाहेब थोरात यांनी सातत्याने केली असून या मागणीला यश मिळाले असून राज्यांमध्ये आज सरकारने २६५ तालुक्यांम ध्ये दुष्काळ जाहीर केल्याने या तालुक्यामधील शेतकऱ्यांना काहीसा दिलासा मिळाला आहे.

यावर्षी राज्यभरात सर्व भागांम ध्ये अत्यंत कमी पाऊस झाला . ऑगस्ट व सप्टेंबर महिना पूर्ण कोरडा गेल्याने पावसाअभावी पिके सुकू लागली. त्यामुळे हा हातातोंडाशी आलेले खरिपाचे पीक पूर्णपणे वाया गेले. राज्यभरातील शेतकरी हवालदिल झाला पाऊस होईल अशी शक्यता कोणतीही नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना शेतमजुरांना व सर्वसामान्य नागरिकांना दिलासा देण्यासाठी सरकारनेच पुढाकार घेतला पाहिजे या मागणी करता काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनी सातत्याने आग्रह केला.

संगमनेर तालुक्यातील विविध सहकारी संस्थांच्या वार्षिक सर्वसाधारण सभांमधून हजारो नागरिकांसमोर याच विषयावरून सरकारला जागे करताना दुष्काळ जाहीर करण्याची सातत्याने मागणी केली. याचबरोबर आता पंचनामांची कोणतेही फार्स न करता शेतकऱ्यांना तातडीने मदत करा अशी मागणी केली.

राज्यामध्ये सरसकट दुष्काळ जाहीर व्हावा. संगमनेर तालुक्यात हक्काचे पाणी व पूर्ण दाबाने वीज मिळावी याचबरोबर राज्यातील शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी संगमनेरमध्ये हजारो नागरिकांच्या उपस्थितीमध्ये भव्य जन आक्रोश मोर्चा काढला.

या जनआक्रोश मोर्चा मधून सरकारचे लक्ष वेधताना संपूर्ण राज्यांमध्ये कोणताही पंचनामा न करता तातडीने दुष्काळ जाहीर करावा. शेतकऱ्यांना भरी मदत द्यावी. शेतीवर काम करणारे शेतम जूर जे आहेत त्यांचा रोज सरकारने द्यावा. दुष्काळी कामे सुरू करावी. पाण्याचे नियोजन करावे याचबरोबर वीजपुरवठा सुरळीत करावा तालुक्याला हक्काचे पाणी मिळावे अशा विविध मागण्या केल्या.

याचबरोबर ज्या ज्या वेळेस शेतकरी अडचणीत असतो त्यावेळेस सरकारने शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहिले पाहिजे असे सांगताना महाविकास आघाडी सरकारच्या काळामध्ये आणि काँग्रेस सरकारच्या काळामध्ये सातत्याने सरकारने शेतकऱ्यांना मदत केली आहे याची आठवण ही करून दिली. याचबरोबर जन आक्रोश मोर्चाच्या माध्यमातून जागे व्हा असे आव्हान करताना सरकार जागे झाले नाही तर शेतकरी त्यांना जागा सोडायला लागेल असेही सांगितले.

राज्यभरात गणेश उत्सवाची धामधूम सुरू असताना दुष्काळाची चाहूल ओळखतात शेतकऱ्यांचे नेते अशी ओळख असलेले देशाचे ज्येष्ठ नेते खासदार शरदचंद्रजी पवार यांनी सरकारने दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपयांची मदत करावी अशी मागणी केली होती. त्यानंतर त्यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर भेटी ही दिल्या.

पाठोपाठ काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनी राज्यभरात सरसकट दुष्काळ जाहीर करावा अशी मागणी केली यानंतर मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री व विविध खात्यांच्या मंत्र्यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर




जाऊन भेटी दिल्या यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दुष्काळ जाहीर करून ३५८ तालुक्यांपैकी २६५ तालुक्यांचा या दुष्काळी योजनांमध्ये समावेश केला. यामध्ये अहिल्यानगर जिल्ह्यातील १४ तालुक्यांचा समावेश करण्यात आला आहे.

शेतकऱ्यांची जाण असलेले ज्येष्ठ नेते शरदचंद्रजी पवार व काँग्रेसनेते बाळासाहेब थोरात यांच्या पाठपुराव्यातून राज्य सरकारने दुष्काळ जाहीर केल्याने शेतकऱ्यांना काहीसा दिलासा मिळाला आहे.

मात्र सरकारने जाहीर केल्याप्रम ाणे सर्व शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी करावी सातबारा पूर्णपणे कोरा करावा याचबरोबर शेतमजूर यांना त्यांचा रोज देण्यात यावा विविध दुष्काळी योजना कागदपत्र न करता तातडीने सर्व नागरिकांना मिळाव्यात अशी मागणी काँग्रेस पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात यांनी केली आहे.

## संक्षिप्त

### नेपाळमध्ये निसर्गाचा कोप
हिमलुंग हिमाल बेस कॅम्पवर भीषण हिमस्खलन, १० जण बेपत्ता

काठमांडू (समर्थ गांवकरी)

शेजारील नेपाळ देश सध्या तीव्र नैसर्गिक आपत्तीच्या विळख्यात सापडला आहे. पश्चिम नेपाळमधील तिबेट सीमेजवळ असलेल्या प्रसिद्ध 'हिमलुंग हिमाल' बेस कॅम्पवर रविवारी सकाळी एक भीषण हिमवादळ कोसळले. या मानवनिर्मित नव्हे तर नैसर्गिक दुर्घटनेत किमान १० जण बेपत्ता झाल्याची भीती वर्तवण्यात येत असून, प्रशासनाकडून युद्धपातळीवर माहिती घेतली जात आहे. पर्वतारोहण मोहिमेचे प्रमुख आयोजक मिंगमा ग्याल्जे शेर्पा यांनी या दुर्घटनेला दुजोरा दिला आहे. बेपत्ता झालेल्यांमध्ये त्यांच्या कॅम्पमधील दोन स्वयंपाकी कर्मचाऱ्यांचाही समावेश आहे. मिळालेल्या माहितीनुसार, रविवारी सकाळी अचानक हे हिमवादळ आले. हवामान विभागाने याआधीच खराब हवाम ानाचा इशारा दिला होता, ज्यामुळे अनेक पथकांनी सुरक्षितस्थळी माघार घेतली होती; मात्र काही जण अद्याप बेस कॅम्पवरच थांबले होते.

महाराष्ट्रात पावसाने घेतला ब्रेक!
### २७ सप्टेंबरला कसा राहील हवामानाचा अंदाज?

मुंबई (समर्थ गांवकरी)

महाराष्ट्रातील हवामानात सध्या चढ-उतार पाहायला मिळत असून अनेक भागांत पावसाने विश्रांती घेतली आहे. काही ठिकाणी हलक्या ते मध्यम सरी पडत असल्या तरी राज्यात सर्वदूर चांगला पाऊस झालेला नाही. अनेक भागांत कोरडे, दमट आणि ढगाळ वातावरण आहे. २७ सप्टेंबर रोजी राज्यातील कोणत्याही भागासाठी मोठ्या पावसाचा इशारा देण्यात आलेला नाही. मात्र काही ठिकाणी मेघगर्जनेसह पावसाच्या सरी पडण्याची शक्यता आहे. कोकणातील पालघर, ठाणे, मुंबई, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यांत पावसाने काही दिवसांपासून उघडीप घेतली आहे. काही भागांत हलक्या सरींची शक्यता असली तरी जोरदार पावसाची शक्यता कमी आहे. पुढील काही दिवसही या भागात अशीच परिस्थिती राहण्याचा अंदाज आहे.

### आदिवासी पाड्यांपर्यंत पोहोचणार लालपरी!
दुर्गम भागासाठी १०० मिडी बसेस धावणार

मुंबई (समर्थ गांवकरी)

महाराष्ट्रातील दुर्गम, डोंगराळ आणि अरुंद रस्त्यांच्या भागात राहणाऱ्या आदिवासी नागरिक आणि विद्यार्थ्यांसाठी एसटी महामंडळाने मोठा निर्णय घेतला आहे. राज्यातील दुर्गम मार्गांवर १०० 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी' मिडी बसेस चालवण्यात येणार असल्याची माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली. डोंगर-दऱ्या, तीव्र चढ-उतार आणि अरुंद रस्त्यांमुळे अनेक ठिकाणी मोठ्या एसटी बसेस पोहोचणे शक्य होत नाही. त्यामुळे या भागातील विद्यार्थी आणि नागरिकांना शाळा, महाविद्यालय, बाजारपेठ, रुग्णालय किंवा इतर गरजांसाठी अनेक किलोमीटर पायी जावे लागते.

मुलांचे आधार कार्ड अपडेट केले का?
### ३० सप्टेंबरपर्यंत मिळणार मोठी सवलत

मआधार कार्ड हे भारतातील महत्त्वाचे ओळखपत्र असून अनेक सरकारी आणि शैक्षणिक कामांसाठी त्याचा वापर केला जातो. मुलांच्या आधारमध्ये वयानुसार बायोमेट्रिक माहिती अपडेट करणे आवश्यक असते. आता ५ ते १७ वर्षे वयोगटातील मुलांसाठी अनिवार्य बायोमेट्रिक अपडेट मोफत करण्याची मुदत ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत असल्याची माहिती UIDAI ने दिली आहे.

मुलांचे १५ वर्षे पूर्ण झाल्यावर बायोमेट्रिक अपडेट करणे आवश्यक-लहान मुलांचे आधार तयार करताना सुरुवातीला बायोमेट्रिक माहिती घेतली जात नाही.

# डिंभे-माणिकडोह बोगद्यासाठी आमदार रोहित पवार आक्रमक

## जिल्हाधिकाऱ्यांना भेटून दिला आंदोलनाचा इशारा

**जामखेड (समर्थ गांवकरी)**

सरकारने स्थगिती दिलेल्या डिंभे–माणिकडोह जोड बोगदा प्रकल्पासाठी आमदार रोहित पवार हे आक्रमक झाले असून याबाबत त्यांनी आज जिल्हाधिकारी पंकज आशिया यांची भेट घेऊन डिंभे–माणिकडोह बोगद्याची चौथी सुधारीत प्रशासकीय मान्यता तत्काळ पुनरुज्जीवित करुन बोगद्याचे काम तातडीने सुरु करण्याची मागणी केली. तसेच येत्या ५ ऑक्टोबरपर्यंत याबाबत सकारात्मक निर्णय न झाल्यास मोठे जनआंदोलन उभारण्याचा इशारा त्यांनी दिला आहे. दरम्यान, या बैठकीत त्यांनी कर्जत–जामखेडमधील दुष्काळी परिस्थितीचाही आढावा घेऊन तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली. याबाबतचे निवेदनही त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिले.

गेल्या काही महिन्यांपासून आक्रमक मोडमध्ये असलेले कर्जत–जामखेडचे आमदार रोहित पवार हे आता मतदारसंघातील पाण्यासाठी मैदानात उतरले आहेत. डिंभे–माणिकडोह जोड बोगद्याचा विषय राजकीय वर्तुळात गेल्या काही दिवसांपासून चांगलाच गाजत आहे. या जोड बोगद्यासाठी आमदार रोहित पवार हे पहिल्या टर्ममध्ये आमदार झाल्यानंतर गेल्या ७ वर्षांपासून सातत्याने पाठपुरावा करत आहेत. महाविकास आघाडी सरकारच्या काळातच तत्कालीन जलसंपदामंत्री जयंत पाटील यांच्याकडून त्यांनी या बोगद्याला मंजुरी आणली आहे. १६ किलोमीटर लांबीच्या या जोड बोगद्यामुळे पुणे जिल्ह्यातील आंबेगाव, जुन्नर, शिरूर या कोणत्याही तालुक्याच्या हक्काचे १ थेंबही पाणी कमी न होता पावसाळ्यात डिंभे धरणातून वाहून जाणारे अतिरिक्त पाणी या बोगद्याद्वारे माणिकडोह धरणात आणणे, हा या प्रकल्पाचा मूळ उद्देश आहे. माणिकडोह धरणाच्या पाणलोट क्षेत्रात कमी पाऊस पडत असल्याने साधारणपणे हे धरण पाच वर्षांतून एकदाच भरते. त्यामुळे डिंभे धरणातून वाहून जाणारे पावसाचे अतिरीक्त पाणी माणिकडोह धरणामध्ये आणण्यासाठी हा बोगदा लवकर होणे अत्यंत गरजेचे आहे. यामुळे जुन्नर, पारनेर, श्रीगोंदा, कर्जत–जामखेड आणि करमाळा या तालुक्यांना एक अतिरिक्त आवर्तन मिळून येथील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

त्यासाठीच आमदार रोहित पवार यांनी २०२२ मध्ये तत्कालीन जलसंपदामंत्री जयंत पाटील यांच्यासोबत बैठक घेऊन डिंभे धरणाची पाणी पातळी ७०९ मीटर (मध्यावर) कायम ठेवूनच हा बोगदा करण्याबाबत सर्वसहमती घडवून आणली आहे.

महाविकास आघाडी सरकार गेल्यानंतर आलेल्या सरकाकडेही या बोगद्याच्या कामाला तांत्रिक, प्रशासकीय आणि प्रत्यक्ष गती देण्याबाबत त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला आहे. तसेच पालकमंत्री, जलसंपदामंत्री आणि मुख्यमंत्री यांचीही वेळोवेळी भेट घेऊन त्यांनाही निवेदने दिली आहेत. नुकतीच शासनाने ५७०४ कोटी ५० लाख रुपये खर्चाला चौथी सुधारीत प्रशासकीय मान्यताही दिली होती, परंतु आंबेगावचे आमदार दिलीप वळसे पाटील यांच्या दबावामुळे १५ दिवसांपूर्वी या प्रकल्पाच्या चौथ्या सुधारीत प्रशासकीय मान्यतेला सरकारने स्थागिती दिली आहे. हा निर्णय कर्जत–जामखेड मतदारसंघासह जुन्नर, पारनेर, श्रीगोंदा, करमाळा या तालुक्यातील शेतकऱ्यांवर अन्यायकारक असून शेतकऱ्यांच्या आशा–अपेक्षांवर पाणी फिरवणारा आहे. त्यामुळे तातडीने ही चौथ्या सुधारीत प्रशासकीय मान्यतेला दिलेली स्थगिती तत्काळ पुनरुज्जीवित करुन बोगद्याचे काम तातडीने सुरू करण्याचे आदेश देण्याची मागणी आमदार रोहित पवार यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे. तसेच येत्या ५ ऑक्टोबरपर्यंत सरकारने याबाबत निर्णय घेतला नाही तर जुन्नर, पारनेर, श्रीगोंदा आणि कर्जत या भागातील शेतकऱ्यांना सोबत घेऊन मोठे जनआंदोलन उभारण्याचा इशारा त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना भेटून दिला आहे. यावेळी खा. निलेश लंके हेही उपस्थित होते.

दरम्यान, कर्जत–जामखेडसह संपूर्ण जिल्ह्यात दुष्काळाची भीषण परिस्थिती आहे. या पार्श्वभूमीवर मागणी असलेल्या गावांमध्ये टँकर आणि चारा छावण्या सुरु करणे, उपलब्ध जलस्त्रोतातील पाणी नियोजन, विहिर व बोअरवेलचे



अधिग्रहण, शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये तर शेतमजुरांना प्रती कुटुंब २५ हजार रुपये मदत करणे, कर्जमाफी योजनेचा आढावा घेऊन तातडीने सर्वांना या योजनेचा लाभ देणे, नियमित कर्जदारांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर अनुदान वितरीत करणे, चुकीच्या पीक कापणी प्रयोगांना आळा घालणे, विद्यार्थ्यांची संपूर्ण शुल्कमाफी, सीना प्रकल्पात आवर्तन सोडणे या सर्व मुद्द्यांवरही यावेळी चर्चा झाली आणि याबाबतचे निवेदनही आमदार रोहित पवार यांनी यावेळी जिल्हाधिकाऱ्यांना दिले.

''डिंभे–माणिकडोह बोगद्यामुळे कोणत्याही तालुक्याचे पाणी कमी न होता माझ्या मतदारसंघासह जुन्नर, पारनेर, श्रीगोंदा आणि करमाळा या तालुक्यातील शेतकऱ्यांना एक जादा आवर्तन मिळणार आहे. परंतु या कामाला स्थगिती देण्यात आल्याचं कळतंय, ती का देण्यात आली हे कळत नाही. उलट जे नेते या बोगद्याला आज विरोध करत आहेत त्यांनीच २०१८ मध्ये बोगदा करण्याबाबत आणि डिंभे धरणातून तळापासून पाणी घेण्याबाबत शासनाला पत्र दिले होते, परंतु कोणत्याही तालुक्यावर अन्याय नको म्हणून २०२२ मध्येही आम्ही तत्कालीन जलसंपदामंत्र्यांसोबत बैठक घेऊन डिंभे धरणाची पाणी पातळी ७०९ मीटर (मध्यभागी) स्थिर ठेवून बोगदा करण्याचा निर्णय घेतला. तरीही विरोध होत असेल तर हा अन्याय आम्ही का सहन करावा? याबाबत सरकारने ५ ऑक्टोबरपर्यंत योग्य निर्णय घेतला नाही तर नाईलाजाने शेतकऱ्यांचं जनआंदोलन उभारावं लागेल, असा अल्टीमेटम जिल्हाधिकाऱ्यांना भेटून दिला. तसंच मतदारसंघात दुष्काळाची अत्यंत गंभीर स्थिती असून याबाबत पदाधिकारी, कार्यकर्ते, अधिकारी आणि माझ्या टीमकडून घेतलेल्या आढाव्याचा अहवालही त्यांना सादर केला आणि तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली.''

**–रोहित पवार, आमदार कर्जत–जामखेड**

# दुष्काळाबाबतच्या घोषणेचे स्वागत; मात्र शेतकऱ्यांना ठोस मदतीपासून वंचित ठेवू नका : किसान सभा

## सलग दोन खरीप हंगाम उद्ध्वस्त झालेल्या शेतकऱ्यांना कर्जमाफी व पीकविमा संरक्षित रकमेनुसार भरपाई द्या : किसान सभा

राज्य सरकारने केंद्र सरकारच्या दुष्काळ संहितेअंतर्गत पहिला टप्पा अर्थात 'फर्स्ट ट्रिगर' लागू झाल्याने राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळसदृश परिस्थिती जाहीर केली आहे. किसान सभेच्या वतीने या घोषणेचे स्वागत करण्यात येत आहे. मात्र दुष्काळ जाहीर करताना काढण्यात आलेल्या शासनादेशामध्ये शेतकऱ्यांना प्रत्यक्ष दिलासा देणाऱ्या ठोस उपाययोजनांचा अभाव आहे. त्यामुळे केवळ दुष्काळाची घोषणा न करता संकटग्रस्त शेतकऱ्यांना पुरेशी आर्थिक मदत देण्याची भूमिका राज्य सरकारने घ्यावी, अशी मागणी किसान सभेने केली आहे.

मागील वर्षी अतिवृष्टीमुळे राज्यातील शेतकऱ्यांचा खरीप हंगाम मोठ्या प्रमाणावर उद्ध्वस्त झाला. यावर्षी पुन्हा पावसाअभावी आणि दुष्काळी परिस्थितीमुळे खरीप पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. सलग दोन खरीप हंगाम हातातून गेल्यामुळे शेतकरी अभूतपूर्व आर्थिक संकटात सापडले आहेत. उत्पादन नाही, उत्पन्न नाही आणि दुसरीकडे शेतीचा खर्च, कर्जाचा बोजा आणि कुटुंबाचा खर्च कायम आहे. या वास्तवाचा विचार करून सरकारने दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांसाठी विशेष आर्थिक पॅकेज जाहीर करणे आवश्यक आहे.

### दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांसाठी कर्जमाफीचा विस्तार करा

राज्य सरकारने जाहीर केलेल्या कर्जमाफीमध्ये २०२५ पर्यंतच्या कर्जाचा विचार करण्यात आला आहे. मात्र त्यानंतरचा मागील खरीप हंगाम अतिवृष्टीमुळे व आत्ताचा खरीप हंगाम दुष्काळामुळे उध्वस्त झाला आहे. सलग दोन खरीप हातचे गेले आहेत.न्या पार्श्वभूमीवर २०२५ नंतर थकीत झालेल्या सर्व शेतकऱ्यांचाही कर्जमाफीमध्ये समावेश करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर नियमितपणे कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांनाही सातत्याने अन्याय सहन करावा लागतो. अशा शेतकऱ्यांना केवळ ५० हजार रुपयांपर्यंतची मदत देणे योग्य नाही. नियमित कर्जदारांना किमान २ लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी किंवा कर्ज सवलत देण्यात यावी. तसेच २०२५ नंतर आजपर्यंत ज्या शेतकऱ्यांची कर्जे थकीत झाली आहेत, त्या सर्व पात्र शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ देण्यात यावा.

### एनडीआरएफच्या तुटपुंज्या मदतीने शेतकऱ्यांचे नुकसान भरून निघणार नाही

मुख्यमंत्री सातत्याने सांगत आहेत की दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना केंद्र सरकारच्या एनडीआरएफच्या निकषांनुसार मदत दिली जाईल. मात्र या निकषांनुसार कोरडवाहू पिकांसाठी केवळ ८,५०० रुपये प्रति हेक्टर, बागायती पिकांसाठी १७,००० रुपये प्रति हेक्टर आणि बहुवर्षिक फळपिकांसाठी २२,५०० रुपये प्रति हेक्टर इतकीच मदत मिळते.

ही मदत प्रत्यक्ष शेतकऱ्यांचे झालेले नुकसान भरून काढण्यासाठी अत्यंत अपुरी आहे. या रकमेतून मुख्यतः पिकासाठी झालेला निविष्ठांचा खर्चही पूर्णपणे भरून निघत नाही. शेतकऱ्याने पिकवलेले उत्पादन, त्यातून अपेक्षित असलेले उत्पन्न आणि पुढील हंगामासाठीची आर्थिक क्षमता यांचे झालेले नुकसान या मदतीतून भरून निघत नाही.

### पीकविम्याची संरक्षित रक्कम किमान भरपाईचा आधार ठरवा

शेतकऱ्याने पीकविमा काढताना संबंधित पिकासाठी निश्चित केलेली पीक संरक्षण रक्कम म्हणजेच विमा संरक्षित रक्कम ही त्या पिकाच्या उत्पादनमूल्याशी संबंधित असते. त्यामुळे दुष्काळामुळे एखाद्या पिकाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असल्यास केवळ एनडीआरएफच्या तुटपुंज्या निकषांवर भरपाई मर्यादित न ठेवता, संबंधित पिकासाठी निश्चित केलेल्या विमा संरक्षित रकमेला किमान भरपाईचा आधार मानण्यात यावा.

यापेक्षाही प्रत्यक्ष नुकसान अधिक असल्यास त्यानुसार अतिरिक्त भरपाई देण्याची जबाबदारी राज्य सरकारने स्वीकारली पाहिजे. शेतकऱ्याचे खरे नुकसान भरून काढणे हा मदतीचा केंद्रबिंदू असला पाहिजे; केवळ कागदोपत्री मदत जाहीर करून सरकारची जबाबदारी संपत नाही.

किसान सभा राज्य सरकारकडे मागणी करते की, २६५ तालुक्यांतील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांसाठी तातडीने विशेष आर्थिक मदत जाहीर करावी, २०२५ नंतर थकीत झालेल्या शेतकऱ्यांना कर्जमाफी द्यावी, नियमित कर्जदारांना किमान २ लाख रुपयांपर्यंत कर्जसवलत द्यावी, पीक विम्याचे काढून टाकलेले ट्रिगर पुन्हा लागू करावे आणि पिकांच्या विमा संरक्षित रकमेला किमान भरपाईचा आधार मानून त्यापुढे प्रत्यक्ष नुकसानीनुसार अतिरिक्त मदत द्यावी.

दुष्काळाची घोषणा ही पहिली पायरी आहे; शेतकऱ्यांच्या हातात पुरेशी मदत पोहोचवणे ही सरकारची खरी कसोटी आहे. सलग दोन खरीप हंगाम उद्ध्वस्त झालेल्या शेतकऱ्यांना सरकारने केवळ आश्वासनांवर न ठेवता तातडीने ठोस आर्थिक आधार द्यावा, अशी किसान सभेची मागणी आहे.



**डॉ अशोक ढवळे**
**जे पी गावित**
**डॉ अजित नवले**
**उमेश देशमुख**

# ॲड. एम एन देशमुख महाविद्यालयात कॉम्रेड डॉ. अजित नवलेंच्या हस्ते 'प्राध्यापक प्रबोधिनी'चे उद्घाटन



**राजूर (समर्थ गांवकरी)**

राजुर येथील ड. एम. एन. देशमुख कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात कामगार व शेतकरी नेते कॉम्रेड डॉ. अजित नवले यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून प्राध्यापक प्रबोधिनीचे उद्घाटन करण्यात आले. आपल्या उद्घाटनपर व्याख्यानात कॉम्रेड नवले यांनी मुक्त अर्थव्यवस्थेत कृषी संस्कृतीच्या ऱ्हासाबद्दल चिंता व्यक्त केली. ज्या देशातील शेतकरी सुखी नाही तो देश कधीच विकसित होत नाही. ज्या देशात शेती व शेतकऱ्यांचे शोषण होते तो देश रसातळाला जातो. आज साम्राज्यवादी अमेरिका गरीब देशांवर एकतर्फी व्यापारी करार लादून जगाचे शोषण करून अमेरिकेचे पोषण करीत आहे. देशातील कार्पोरेट क्षेत्राकडूनही शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात शोषण सुरू आहे. कार्पोरेटकडून विकासाच्या नावाखाली शेतकऱ्यांच्या जमिनी काढून घेतल्या जात आहेत. शेतकऱ्यांच्या शोषणामुळे शेतकऱ्यांची शेती करण्याची मानसिकता राहिलेली नाही. शेतकरी उध्वस्त करून शेतीवर कब्जा करण्याचा प्रयत्न बड्या भांडवलदारांकडून चालू आहे. कृषी निविष्ठांच्या प्रचंड किमती वाढवून व नियोजनबद्ध पद्धतीने शेतमालाचे भाव पाडून शेतीचे दुहेरी शोषण चालू आहे. शेतकरी आत्महत्या वाढतच आहेत व त्यापेक्षा जास्त विद्यार्थ्यांच्या आत्महत्या होत आहेत. भारत विश्वगुरू बनणार असे सांगत असतानाच कुपोषण आणि उपासमारीत वाढ होत आहे. थोड्या दिवसात शेती अंबानी अडाणीच्या मालकीची होणार आहे. शेती वाचवायची असेल तर शेतीचे भांडवलदारांकडे होत असलेले हस्तांतरण थांबवले पाहिजे, कृषी निविष्ठांचे दर कमी केले पाहिजेत, शेतमाला राष्ट्र किंमत मिळाली पाहिजे, नैसर्गिक आपत्तीत शेतकऱ्यांना सरकारी संरक्षण मिळाले पाहिजे, शेतीला पुरेशी वीज व पाणी मिळाले पाहिजे. असे कॉम्रेड अजित नवलेंनी आपल्या व्याख्यानात सांगितले.तसेच लग्नाळू मुली सुद्धा शेतकरी नवरा नको म्हणतात त्याबद्दलही चिंता व्यक्त केली.

# कर्मवीरांची रयत शिक्षण संस्था ही काळाबरोबर बदलणारी संस्था

## एड. भगीरथ शिंदे : रयत शिक्षण संस्थेचे व्हाईस चेअरमन

**श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)**

सामाजिक परिवर्तनाचे माध्यम म्हणजे शिक्षण होय. याची आत्मजाणीव कर्मवीरांना होती म्हणूनच त्यांनी बहुजनांच्या उत्थानासाठी रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. पुरोगामी महाराष्ट्राची जडणघडण कर्मवीरांमुळेच झाली. कर्मवीर भाऊराव पाटील हे महात्मा फुले यांच्या सत्यशोधक विचाराचे वारसदार होते. आजचे रयतमधील शिक्षक हे कर्मवीरांचा विचार वारसा जोपासत आहे. रयत शिक्षण संस्था ही काळाबरोबर बदलणारी संस्था आहे. असे विचार रयत शिक्षण संस्थेचे व्हाईस चेअरमन एड. भगीरथ शिंदे यांनी व्यक्त केले. ते महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयात रयत संकुलाच्यावतीने आयोजित केलेल्या कर्मवीर जयंती समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. प्रमुख वक्ते म्हणून रयत शिक्षण संस्थेचे माध्यमिक विभागाचे सहसचिव मा. बंडू पवार यांनीही मोलाचे विचार व्यक्त केले. ते म्हणाले की, कर्मवीर भाऊराव पाटील यांची प्रेरणा महात्मा फुले, महात्मा गांधी व राजर्षी शाहू होते. कर्मवीरांनी शिक्षणाच्या माध्यमातून बहुजन समाजाच्या विकासाचे काम केले. आजच्या युवकांनी कौशल्याधिष्ठित शिक्षण घेऊन आपल्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास करावा असे विचार त्यांनी विचार मांडले. मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य मा. बाबासाहेब भोस यांनीही विचार व्यक्त केले. ते म्हणाले की, रयत शिक्षण संस्थेत गुणवत्तापूर्ण शिक्षण दिले जाते. कर्मवीरांच्या त्यागाला विसरू नका. विभागीय अधिकारी नवनाथ बोडखे यांनीही मोलाचे विचार व्यक्त केले.

अध्यक्षस्थानी माजी मंत्री बबनराव पाचपुते होते. ते म्हणाले की, रयत ही माणसं घडवणारी संस्था आहे. कर्मवीरांचा विचार वारसा या रयतेमधूनच जोपासला जातो. असे ते म्हणाले

स्वागत व प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. प्रकाश साळवे यांनी केले. प्रतिमा पूजनानंतर श्रीमंत राजमाता कन्या विद्यालयाच्या विद्यार्थिनीनी सुमधुर स्वरात रयत गीत सादर केले. याप्रसंगी गणेश भोस यांची जनरल बॉडी सदस्यपदी नियुक्ती झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. पीएच. डी. पदवी प्राप्त झाल्याबद्दल डॉ. देवेंद्र बहिरम यांचाही सत्कार



करण्यात आला. प्रमुख संपादक डॉ. राजेंद्र ठाकरे यांनी संपादित केलेल्या भगीरथ नियतकालिकाचे प्रकाशन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. अहवाल वाचन प्राचार्य दिलीप भुजबळ, मुख्याध्यापिका श्रीमती वर्षा भोईटे यांनी केले.

पीटर रणसिंग यांनी गरीब विद्यार्थ्यांना गणवेशाचे वाटप केले.कर्मवीर जयंतीच्या निमित्ताने श्रम प्रतिष्ठा दिन महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयात साजरा करण्यात आला. तसेच रांगोळी स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा ,पुष्प सजावट स्पर्धा घेण्यात आल्या. त्याला उदंड असा विद्यार्थ्यांचा प्रतिसाद लाभला. सूत्रसंचालन डॉ. देवेंद्र बहिरम, प्रा. संजय फटे, प्रा. संदीप दरेकर यांनी केले. आभार पर्यवेक्षक प्रा. रत्नाकर झिटे यांनी मानले. सुभाषशेठ गांधी, कुंडलिकराव दरेकर, माजी विभागीय अधिकारी तुकाराम कन्हेरकर,महावीर पटवा, रवीशेठ दंडनाईक, रत्नप्रभा बोरुडे, ज्योत्स्ना भंडारी,उद्योजक संजय मचे, नगरसेवक, मुख्याध्यापक राजेंद्र खेडकर, डॉ. ज्ञानदेव भोसले, पत्रकार पीटर रणसिंग, भगवान गोरखे, गणेश कविटकर, पत्रकार जगताप, पत्रकार कुरुमकर आदी मान्यवर या समारंभासाठी उपस्थित होते. आभार पर्यवेक्षक रत्नाकर झिटे यांनी मानले.

# महाराष्ट्र सदनात गणेशोत्सवाची भक्तिमय वातावरणात सांगता भव्य मिरवणुकीने गणरायास निरोप

## दिल्लीकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**नवी दिल्ली (समर्थ गांवकरी)**

राजधानी दिल्लीतील कोपर्निकस मार्गावरील महाराष्ट्र सदनात १४ सप्टेंबरपासून उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात सुरू असलेल्या सार्वजनिक गणेशोत्सवाची काल दिमाखात सांगता झाली. रात्री श्री गणेश मूर्तीचे विधिवत विसर्जन करण्यात आले. या उत्सवादरम्यान राजधानी दिल्लीमध्ये आयोजित विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेचे परिपूर्ण दर्शन घडले.

विसर्जनाच्या मुख्य कार्यक्रमाची सुरुवात जुन्या महाराष्ट्र सदनातून झाली. विसर्जनापूर्वी निवासी आयुक्त गुंतवणूक सुशील गायकवाड यांच्या हस्ते श्री गणेशाची आरती करण्यात आली. आरतीनंतर झांज पथक, ढोल–ताशांच्या गजरात श्रींच्या भव्य मिरवणुकीला सुरुवात झाली. 'गणपती बाप्पा मोरया'च्या जयघोषात जुन्या महाराष्ट्र सदनातून नव्या महाराष्ट्र सदनापर्यंत काढण्यात आलेल्या या मिरवणुकीत दिल्लीतील नागरिक, विविध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येने सहभागी झाले. ढोल–ताशांच्या तालावर उत्साहाने सहभागी झालेल्या भक्तांमुळे संपूर्ण परिसर भक्तिमय आणि चैतन्यमय झाला. मिरवणूक महाराष्ट्र सदनात पोहोचल्यानंतर गणेशभक्तांनी श्रींचे दर्शन घेतले आणि विहित धार्मिक विधींनुसार श्रींच्या मूर्तीचे विधिवत विसर्जन करण्यात आले.

या बारा दिवसांच्या उत्सवात दररोज सकाळी ९ वाजता आणि सायंकाळी ६.१५ वाजता श्रींची महाआरती करण्यात आली. १४ सप्टेंबर रोजी श्रींची प्राणप्रतिष्ठा, आगमन मिरवणूक आणि भजनाचा कार्यक्रम झाला. याशिवाय आकाशवाणी रंगभवन तसेच जुन्या महाराष्ट्र सदनात विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. प्रख्यात अभिनेते भरत जाधव यांचे 'पुन्हा सही रे सही' हे नाटक, नितीन सरकटे हंसराज यांची लाईव्ह कॉन्सर्ट,



वैभव जोशी व संदीप खरे यांचा 'मराठी चित्रपट गीते' कार्यक्रम, संतोष भांगरे यांचा 'महाराष्ट्राची लोककला', गझलनवाज भीमराव पांचाळे यांचा गझल कार्यक्रम तसेच वैशाली सामंत, ऋषिकेश रानडे आणि शरयू दाते यांच्या गायन कार्यक्रमांना रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. भरतनाट्यम, लावणी, 'खेळ पैठणीचा' आणि 'बॉली बीट्स' यांसारख्या कार्यक्रमांनीही उत्सवाची रंगत वाढवली. १९ सप्टेंबर रोजी श्री सत्यनारायण पूजा व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले.

'चव महाराष्ट्राची!' या उपक्रमांतर्गत पुरणपोळी व उकडीचे मोदक यांचे लाईव्ह स्टॉल, 'कौशल्याला सलाम!' अंतर्गत दिव्यांग बांधवांनी तयार केलेल्या कलावस्तूंचे प्रदर्शन व विक्री, तसेच 'महाराष्ट्राच्या वस्त्रपरंपरेचा अनोखा ठेवा!' या उपक्रमातून पैठणी, इंदुरी, माहेश्वरी, इरकल साड्या आणि हस्तमाग वस्तूंची मांडणी करण्यात आली. विविध स्टॉल्समुळे दिल्लीकरांना महाराष्ट्राच्या खाद्यसंस्कृती, हस्तकला आणि पारंपरिक वस्तूंचा अनुभव घेता आला.

गणेशोत्सवाच्या यशस्वी आयोजनाबद्दल निवासी आयुक्त तथा सचिव डॉ. श्वेता सिंघल यांनी सर्व नागरिक, कलाकार, स्वयंसेवक, संस्था आणि आयोजन समितीचे आभार मानले. दिल्लीतील नागरिक व महाराष्ट्रप्रेमींच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे यंदाचा गणेशोत्सव भक्ती, कला, संस्कृती आणि महाराष्ट्राच्या गौरवशाली परंपरेचा सुंदर संगम ठरला.

## थोडक्यात पण महत्त्वाचे

### बाबुजी आव्हाड महाविद्यालयात जिल्हास्तरीय वेटलिफ्टिंग स्पर्धा संपन्न



**पाथर्डी (समर्थ गांवकरी)**

अहिल्यानगर जिल्हा आंतरमहाविद्यालयीन वेटलिफ्टिंग स्पर्धा, अहिल्यानगर जिल्हा शालेय वेटलिफ्टिंग स्पर्धा तसेच अहिल्यानगर डिस्ट्रिक्ट वेटलिफ्टिंग असोसिएशनच्या मान्यतेने युथ, ज्युनियर व सिनियर वयोगटातील अहिल्यानगर जिल्हा वेटलिफ्टिंग अजिंक्यपद स्पर्धा २०२६ बाबुजी आव्हाड महाविद्यालय, पाथर्डी येथे उत्साहात संपन्न झाली. या स्पर्धेचे उद्घाटन पार्थ विद्या प्रसारक मंडळाचे विश्वस्त कुणाल आव्हाड यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बबन चौरे, अहिल्यानगर जिल्हा क्रीडा विभागाचे सचिव डॉ. सतीश चोरमले, महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक तथा अहिल्यानगर जिल्हा वेटलिफ्टिंग असोसिएशनचे सचिव प्रा. डॉ. विजय देशमुख, उपाध्यक्ष राजेंद्र सोनवणे, प्रा. दादासाहेब लोखंडे, प्रा. डॉ. रोहित अदलिंग हे उपस्थित होते.

या स्पर्धेत अहिल्यानगर जिल्ह्यातील विविध महाविद्यालये व शाळेमधून २०० हून अधिक खेळाडूंनी सहभाग नोंदविला. विविध वयोगट व वजनगटांमध्ये खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरीचे प्रदर्शन केले. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे बाबुजी आव्हाड महाविद्यालयाच्या महिला व पुरुष या दोन्ही संघांनी आंतर महाविद्यालयीन स्पर्धेत सर्वसाधारण विजेतेपद पटकावले. स्पर्धेत पंच म्हणून राजेंद्र सोनवणे सर, प्रा. डॉ. विवेक साळवे, प्रवीण चोरमले सर, प्रशांत गायकवाड, शहानवाज आतार, कार्तिक तेवर, राहुल घुमरे आणि संजय लोखंडे यांनी जबाबदारी पार पाडली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. विजय देशमुख यांनी केले, तर आभार प्रा. सचिन शिरसाट यांनी मानले.

### एम. एम. निऱ्हाळी विद्यालयात पारितोषिक वितरण समारंभ



**पाथर्डी (समर्थ गांवकरी)**

शहरातील एकलव्य शिक्षण संस्थेचे एम. एम. निऱ्हाळी विद्यालयात विद्यार्थ्यांना सन्मान चिन्ह, प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. अनेक स्पर्धा वकृत्व स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, सुंदर हस्ताक्षर, रांगोळी स्पर्धा, सामान्य ज्ञान स्पर्धा, वर्ग सजावट, स्वच्छता, गायन स्पर्धा, नृत्य स्पर्धा, संगीत खुर्ची अशा विविध स्पर्धा घेण्यात आल्या आणि विद्यार्थ्यांनी भरघोस पारितोषिके मिळविले आहेत.

या कार्यक्रमाला पाथर्डी पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी सचिन राख, शिक्षण विस्तार अधिकारी रामनाथ कराड, जिल्हा परिषद आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त सुरेखा खाडे, निलेश क्षीरसागर, संस्थेचे विश्वस्तजं श्रीकांत निऱ्हाळी, प्रा. पांडुरंग बांगर, प्रा. राजेंद्र डागा, गणेश सरोदे ,अपर्णा शेळगावकर आदी उपस्थित होते. यावेळी सचिन राख यांनी विद्यार्थ्यांना आपल्या भाषणात सहभागी सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक केले. शाळेचा हा अतिशय स्तुत्य उपक्रम आहे, असे यावेळी सांगितले.

### मर्चंट बँकेच्या वतीने विशाल गणेशाची पूजा



**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

गणेश विसर्जन मिरवणूक चितळेरोड वर मर्चंट बँकेच्या येथे आल्यावर बँकेच्या वतीने बँकेचे चेअरमन संजय चोपडा, संचालक किशोर मुनोत, प्रमिलाताई बोरा, मीनाताई मुनोत,मोहन बरमेचा,जितेंद्र बोरा,कोथिंबीर साहेब,बँकेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी नितीन भंडारी यांच्या हस्ते माळीवाडा विशाल गणेशाची पूजा करून स्वागत करण्यात आले,यावेळी विशाल गणेशचे मुख्य पुजारी महंत संगमनाथजी महाराज, भारत शेळके महाराज,अनिल जेवे महाराज,विशाल गणेश मंडळाचे चेअरमन अभय आगरकर,पंडितराव खरपुडे,माणिकराव विधाते,अशोक कानडे व विश्वस्त यांचा सत्कार करण्यात आला.

उपस्थित महाराज मंडळी व विश्वस्त यांचा सन्मान यावेळी अहमदनगर मर्चंट को-ऑपरेटिव्ह बँक चितळेरोड शाखेत करण्यात आला.कार्यक्रमाला चितळे रोड शाखाधिकारी प्रमोद बोरा,श्री गवळी,राहुल गांधी,जितेश भळगट,अवधूत गर्जे,कोमल झिंजुर्डे,शिल्पा खती ,मनाली कावडीच्या,नेत्रा गोंधळे , वैभव मनोत,सागर उगलमुगले,अजय सिसोदिया आदींसह शाखेतील सर्व कर्मचारी उपस्थित होते.

# जगातील सर्वात भाग्यवान माणुस म्हणजे ओंजळीतले दुसऱ्याला देण्याची ताकद असते : डॉ. विश्वासराव आरोटे

**राजूर (समर्थ गांवकरी)**

जगात प्रत्येक गोष्ट सुंदर आहे. मात्र ती तुमच्या विचारांवर आणि बघण्याच्या दृष्टीकोनावर अवलंबून असते.जगातील सर्वात भाग्यवान माणुस म्हणजे आपल्या ओंजळीतले दुसऱ्याला देण्याची ताकद आहे.असा आशावाद महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा समर्थ दैनिक गांवकरीचे मुख्य संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांनी व्यक्त केला.

थोर समाजसेवक व दानशूर व्यक्तिमत्त्व शेठ नानजीभाई खिमजीभाई ठक्कर (ठाणावाला) यांच्या वाढदिवसानिमित्त महालक्ष्मी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,पिंपळगाव नाकविंदा येथील गोरगरीब व गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी डॉ. विश्वासराव आरोटे हे विचार मंच्यावरून बोलत होते.महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ.विश्वासराव आरोटे तसेच महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे सहसचिव तथा शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रा.सचिन लगड यांच्या वतीने हा सामाजिक उपक्रम राबविण्यात आला.यावेळी विद्यार्थ्यांना शालेय उपयोगाचे विविध साहित्य देण्यात आले. आर्थिक परिस्थितीमुळे शिक्षण घेताना अडचणी येणाऱ्या विद्यार्थ्यांना मदतीचा हात देत त्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्याचा हा उपक्रम असल्याचे आयोजकांनी सांगितले.यावेळी पुढे मार्गदर्शन करताना डॉ.विश्वासराव आरोटे यांनी सांगितले की,विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी मदत करणे ही केवळ सामाजिक जबाबदारी नसून समाजाप्रती असलेले कर्तव्य आहे.ग्रामीण व आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता आणि क्षमता मोठ्या प्रमाणात असते.त्यांना योग्य संधी,प्रोत्साहन आणि

**■ शेठ नानजीभाई खिमजीभाई ठक्कर यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक उपक्रम.**
**■ महालक्ष्मी विद्यालयात विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप.**

आवश्यक साधने उपलब्ध करून दिल्यास ते निश्चितच यशाची शिखरे गाठू शकतात. शेठ नानजीभाई खिमजीभाई ठक्कर यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या सामाजिक कार्याची प्रेरणा घेऊन गरजू विद्यार्थ्यांसाठी हा उपक्रम राबविण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.सहसचिव प्रा.सचिन लगड यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शिक्षण हे जीवन बदलण्याचे प्रभावी माध्यम असल्याचे सांगितले.विद्यार्थ्यांनी परिस्थिती कोणतीही असो,शिक्षणाची कास सोडू



नये.मेहनत,सातत्य,शिस्त आणि संस्कार यांच्या बळावर प्रत्येक विद्यार्थी आपल्या जीवनात यशस्वी होऊ शकतो.मिळालेल्या शैक्षणिक साहित्याचा योग्य उपयोग करून अभ्यासात प्रगती करावी आणि आपल्या कुटुंबाचे व विद्यालयाचे नाव उज्वल करावे,असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य सुनील धुमाळ यांनी केले.रामदास कासार यांनी सूत्रसंचालन केले.विद्यालयाच्या वतीने उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. यावेळी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे,महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे सहसचिव सचिन लगड,प्राचार्य सुनील धुमाळ,अनिल चासकर,रामदास कासार,विठ्ठल आभाळे, तुकाराम भोर,संकेत येलमामे,सुवर्णा धात्रक,निलम कानवडे,म

## आई-वडिलांकडून मिळालेले संस्कार कोणत्याही विद्यापीठातून मिळत नाहीत : डॉ. जालिंदर भोर

**गणोरे (समर्थ गांवकरी)**

विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या ज्ञानाचा उपयोग समाजाच्या विकासासाठी करावा. आई-वडील लहानपणापासून आपल्यावर चांगले संस्कार करतात. हे संस्कार आयुष्यभर उपयोगी पडतात. त्यामुळे आई-वडिलांना कधीही विसरू नका. आई-वडिलांकडून मिळालेले संस्कार कोणत्याही विद्यापीठातून मिळत नाहीत, असे प्रतिपादन साईबाबा देवस्थानचे माजी विश्वस्त डॉ. जालिंदर भोर यांनी केले.

गणोरे (ता. अकोले) येथील रयत शिक्षण संस्थेच्या छत्रपती शिवाजी विद्यालयात संस्थेचे संस्थापक, थोर शिक्षणमहर्षी पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांची १३९ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी डॉ. भोर अध्यक्षीय भाषणातून बोलत होते. कार्यक्रमाची सुरुवात कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या अर्धपुतळ्याचे पूजन व



दीपप्रज्वलनाने झाली. गुणवंत विद्यार्थ्यांना यावेळी बक्षिसे देऊन गौरविण्यात आले.

विद्यालयाच्या इमारत बांधकामासाठी अनिल रामभाऊ दातीर यांनी ५० हजार रुपये, तर प्रदीप वसंत आंबरे यांनी ५१ हजार रुपयांचा देणगीचा धनादेश मुख्याध्यापकांकडे सुपूर्द केला. यावेळी एस.आर. थोरात उद्योग समूहाचे आबासाहेब थोरात, शिक्षणतज्ज्ञ संदीप वाकचौरे, बाबासाहेब नाईकवाडी, मनोज कवडे, अंबादास दातीर, संत नामदेव आंब्रे, अशोकराव आहेर, मुख्याध्यापक अण्णासाहेब दिवे, अनिल आंबरे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

## अपेक्षित ध्येय साध्य करण्यामध्ये अचूक निर्णय क्षमता महत्त्वाची : नीलिमा चंद्रात्रे

### आव्हाड महाविद्यालयात मेंटॉर मित्र उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**पाथर्डी (समर्थ गांवकरी)**

इतरांचे अनुकरण, अतिआत्मविश्वास, अलीकडील घटनेचा प्रभाव तसेच अतिविचार या मानसिक चुकांपासून सावध राहून करिअर, उच्च शिक्षण, आर्थिक नियोजन व वैयक्तिक आयुष्यातील महत्त्वाचे निर्णय घ्यावेत. प्रत्येकाने अफवा व ऐकीव माहिती ऐवजी विश्वसनीय माहितीचा आधार घेऊन माजी विद्यार्थी, वरिष्ठ व तज्ज्ञांशी संवाद साधल्यास अपेक्षित ध्येय गाठता येते असे प्रतिपादन अमेरिकेतील सिमेंस कंपनीमध्ये कार्यरत असणाऱ्या नीलिमा चंद्रात्रे यांनी केले. त्या येथील बाबूजी आव्हाड महाविद्यालयात ग्लोबल नगरी फाउंडेशन अमेरिका व महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने मेंटॉर मित्र उपक्रमांतर्गत प्रभावी निर्णय घेण्याची कला या विषयावर ऑनलाइन व्याख्यान प्रसंगी बोलत होत्या. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बबन चौरे, महाविद्यालय मेंटॉर मित्र समन्वयक डॉ. प्रशांत साळवे, प्रा. दत्तप्रसाद पालवे, डॉ अभिमन्यू ढोरमारे, प्रा.





ब्रह्मानंद दराडे, डॉ. विजयकुमार म्हस्के, प्रा. शरद बोडखे, ग्रंथपाल डॉ. किरण गुलदगड उपस्थित होते.

ऑनलाइन मार्गदर्शन करताना नीलिमा चंद्रात्रे पुढे म्हणाल्या, कोणताही निर्णय घेताना प्रक्रियेचे परीक्षण आवश्यक असून निर्णय नव्हे तर निर्णय घेण्याची प्रक्रिया महत्त्वपूर्ण ठरते. महत्त्वाचा निर्णय घेताना किमान तीन पर्यायांचा विचार करून त्यांचे फायदे तोटे तपासणे गरजेचे आहे.

# पारनेरमध्ये २७६ रोजगार संधींचे दालन

**२९ सप्टेंबरला पारनेर कॉलेजमध्ये रोजगार महाकुंभ...**
**दहावीपासून पदवीधर युवकांना नामांकित कंपनीत नोकरीची संधी..**

**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

शिक्षण पूर्ण करून रोजगाराच्या शोधात असलेल्या युवक-युवतींसाठी पारनेरमध्ये रोजगाराची मोठी संधी उपलब्ध झाली आहे. महाराष्ट्र शासनाच्या जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, मॉडेल करिअर सेंटर, अहिल्यानगर आणि न्यू आर्टस्, कॉमर्स एंड सायन्स महाविद्यालय, पारनेर यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार, २९ सप्टेंबर २०२६ रोजी 'रोजगार महाकुंभ-महाराष्ट्र' आयोजित करण्यात आला आहे. सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत महाविद्यालयाच्या परिसरात हा रोजगार मेळावा होणार आहे.या रोजगार महाकुंभाचे वैशिष्ट्य म्हणजे विविध नामांकित कंपन्यांमधील तब्बल २७६ रिक्त पदांसाठी उमेदवारांना थेट मुलाखतीची संधी मिळणार आहे. त्यामुळे नोकरीच्या शोधासाठी वेगवेगळ्या ठिकाणी भटकण्याऐवजी एकाच छताखाली विविध कंपन्यांशी संवाद साधण्याची संधी युवकांना मिळणार आहे.

मेळाव्यात अंबुज इंटरप्रायझेस इंडिया लि., के.एस.एच. इंटरनॅशनल लि., टॉरेंट इंडिया प्रा. लि., रेणुकामाता मल्टीस्टेट को-ऑप. अर्बन क्रेडिट सोसायटी लि., के-ड्राईव्ह मोबिलिटी सोल्युशन प्रा. लि., के.एस.पी.डी. ऑटोमोटिव्ह इंडिया प्रा. लि., टाटा कॉन्स्युमर इंडिया प्रा. लि., मायक्रोनिया इंडिया प्रा. लि., महालक्ष्मी ऑटोमोटिव्ह प्रा. लि., पी.डी. टेक्नोप्लास्ट, कार्तिक ग्रो, कन्हैया ग्रो, सचिन ऑटोमोटिव्ह-कुबोटा आणि जे.एम. ट्युबलर कम्पोनंट लि. आदी कंपन्या व आस्थापनांचे प्रतिनिधी सहभागी होणार आहेत.उपलब्ध पदांमध्ये ट्रेनी, इलेक्ट्रीशियन, वेल्डर, फिटर, टर्नर, सीएनसी ऑपरेटर, असेंब्ली ऑपरेटर, मेकॅनिकल व इलेक्ट्रिकल टेक्निशियन, सेल्स एक्झिक्युटिव्ह, कॅशियर, क्लार्क, मार्केटिंग क्लार्क, शाखा व्यवस्थापक आणि सहाय्यक शाखा व्यवस्थापक आदी पदांचा समावेश आहे.

दहावी, बारावी, आयटीआय, पदविका तसेच विविध शाखांतील पदवीधर उमेदवारांना त्यांच्या शैक्षणिक पात्रता व कौशल्यानुसार रोजगाराच्या संधी



उपलब्ध होणार आहेत. तांत्रिक तसेच कार्यालयीन क्षेत्रातील विविध पदांचा समावेश असल्याने युवक-युवतींसाठी या मेळाव्यात रोजगाराच्या अनेक वाटा खुल्या होणार आहेत. इच्छुक उमेदवारांनी शैक्षणिक पात्रतेची आवश्यक कागदपत्रे, अद्ययावत बायोडाटा आणि पासपोर्ट आकाराची छायाचित्रे सोबत आणावीत. कंपन्यांचे प्रतिनिधी प्रत्यक्ष उपस्थित राहणार असल्याने उमेदवारांना संबंधित पदांची माहिती घेऊन थेट मुलाखती देता येणार आहेत. शिक्षणातून रोजगाराकडे या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमातून स्थानिक युवकांना त्यांच्या कौशल्याला अनुरूप रोजगार मिळण्यास मदत होईल, अशी अपेक्षा आहे. पारनेर व परिसरातील जास्तीत जास्त युवक-युवतींनी या रोजगार महाकुंभात सहभागी व्हावे, असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रंगनाथ आहेर यांनी केले आहे.

## बेलवंडीत श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाची खो-खोत दमदार कामगिरी

### मुलांचा संघ विजेता, मुली उपविजेत्या





**श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)**

बेलवंडी येथे संपन्न झालेल्या १९ वर्षांखालील आंतरमहाविद्यालयीन खो-खो स्पर्धेत श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाने उल्लेखनीय यश मिळवले. महाविद्यालयाच्या मुलांच्या संघाने प्रथम क्रमांक पटकावत विजेतेपदावर शिक्कामोर्तब केले, तर मुलींच्या संघाने उपविजेतेपदाची कमाई करत महाविद्यालयाच्या क्रीडा परंपरेत आणखी एक मानाचा तुरा खोवला.

श्री छत्रपती शिवाजी विद्यालय, बेलवंडी येथे झालेल्या या स्पर्धेत दोन्ही संघांतील खेळाडूंनी सुरुवातीपासूनच आक्रमक आणि शिस्तबद्ध खेळाचे प्रदर्शन केले. मुलांच्या संघाने अंतिम सामन्यात प्रतिस्पर्धी संघावर प्रभावी मात करत विजेतेपद पटकावले आणि पुढील जिल्हास्तरीय स्पर्धेतील आपले स्थान निश्चित केले. मुलींच्या संघानेही सातत्यपूर्ण कामगिरीच्या जोरावर उपविजेतेपद मिळवत महाविद्यालयाची मान उंचावली.

या यशामागे महाविद्यालयाचे क्रीडा संचालक डॉ. सतीश चोरमले तसेच कनिष्ठ विभागाचे क्रीडा संचालक डॉ. महेश गिरमकर यांचे मार्गदर्शन आणि प्रशिक्षण महत्त्वाचे ठरले.

खेळाडूंच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष राजेंद्रदादा नागवडे, जिल्हा बँकेच्या संचालिका अनुराधा नागवडे, प्राचार्य डॉ. सतिशचंद्र सूर्यवंशी, संस्थेचे निरीक्षक सचिन लगड, युवा नेते दिग्विजय नागवडे, नागवडे कारखान्याच्या उपाध्यक्षा मेघाताई औटी, कारखान्याचे सर्व संचालक, उपप्राचार्य कातोरे, पर्यवेक्षक टकले तसेच श्रीगोंदा क्रीडा समितीचे अध्यक्ष सचिन जामदार यांनी विजेत्या खेळाडू व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले.

# सुजित झावरे पाटील यांच्या पाठपुराव्याला मोठे यश

## पोखरीतील आदिवासी बांधवांना वनहक्काच्या जमिनींचे सातबारा उतारे प्रदान

**पारनेर (समर्थ गांवकरी)**

पारनेर तालुक्यातील पोखरी परिसरातील आदिवासी बांधवांना वनहक्क कायद्यांतर्गत वनजमिनींचे हक्क मिळवून देण्यासाठी सुजित झावरे पाटील यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला अखेर यश आले आहे. शासन स्तरावर आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर संबंधित आदिवासी बांधवांना त्यांच्या हक्काच्या जमिनींचे सातबारा उतारे प्रदान करण्यात आले.

या वेळी पोखरी गावचे सरपंच सतीश पवार पाटील, आदिवासी नेते आनंदराव केदार, राहुल मधे तसेच आदिवासी समाजातील बांधव उपस्थित होते.

**अनेक वर्षांपासून प्रलंबित होता वनहक्काचा प्रश्न**

पोखरी परिसरातील अनेक आदिवासी कुटुंबे पिढ्यान्पिढ्या वनजमिनीवर वास्तव्यास असून संबंधित जमिनीवर त्यांचा पारंपरिक वापर व उपजीविका अवलंबून होती. मात्र, जमिनीच्या मालकी हक्काचा अधिकृत दस्तऐवज नसल्यामुळे या कुटुंबांना विविध शासकीय योजनांचा लाभ घेताना अडचणी येत होत्या.

स्वतःचे घर आणि कसण्यासाठी जमीन असूनही अधिकृत हक्कपत्र नसल्याने अनेक कुटुंबे शासकीय सुविधांपासून वंचित राहत होती. त्यामुळे वनहक्क कायद्यांतर्गत त्यांना त्यांच्या हक्काच्या जमिनी मिळाव्यात, अशी मागणी अनेक वर्षांपासून करण्यात येत होती.

**दृसरपंच सतीश पवार पाटील यांनी मांडला प्रश्न**

पोखरी गावचे सरपंच सतीश पवार पाटील यांनी आदिवासी बांधवांच्या या प्रश्नाकडे सुजित झावरे पाटील यांचे लक्ष वेधले. आदिवासी समाजाचा अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला हा प्रश्न मार्गी लागण्यासाठी झावरे पाटील यांनी संबंधित यंत्रणांकडे पाठपुरावा सुरू केला.

**दृग्रामपातळीपासून शासन स्तरापर्यंत पाठपुरावा**

वनहक्काच्या दाव्यांसाठी आवश्यक कागदपत्रे, प्रस्ताव आणि प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी ग्रामपातळीपासून तालुका व जिल्हा पातळीपर्यंत पाठपुरावा करण्यात आला. प्रस्तावांमध्ये कोणत्याही प्रकारची कागदपत्रांची कमतरता राहू नये तसेच प्रस्ताव विहित नमुन्यात शासनाकडे पाठवले जावेत, यासाठी संबंधित अधिकाऱ्यांशी समन्वय साधण्यात आला.

तालुका पातळीवरील प्रस्ताव जिल्हा पातळीवर आणि त्यानंतर शासन स्तरावर पाठविण्याच्या प्रक्रियेत सुजित झावरे पाटील यांनी विशेष लक्ष दिले. अखेर शासनाच्या प्रक्रियेनंतर संबंधित आदिवासी बांधवांना वनजमिनीवरील हक्क प्राप्त झाले.

**दृसातबारा उतारे मिळाल्याने आदिवासी बांधवांना मोठा दिलासा**

वनहक्काच्या जमिनींचे सातबारा उतारे हातात मिळाल्याने आदिवासी बांधवांना त्यांच्या हक्काची अधिकृत नोंद प्राप्त झाली आहे. त्यामुळे अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या जमिनीच्या प्रश्नाला कायमस्वरूपी स्वरूपात मार्गी लावण्यास मदत झाली आहे.

जमिनीचा अधिकृत हक्क मिळाल्यामुळे संबंधित कुटुंबांना भविष्यात विविध शासकीय योजना आणि सुविधांचा लाभ घेण्याच्या दृष्टीनेही महत्त्वपूर्ण आधार मिळणार



असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

**इतर गावांतील आदिवासी बांधवांनाही आवाहन**

पारनेर तालुक्यातील इतर गावांमध्येही वनहक्क कायद्यांतर्गत पात्र आदिवासी बांधवांनी आपल्या जमिनीचे प्रस्ताव तयार करून शासनाकडे सादर करावेत, असे आवाहन सुजित झावरे पाटील यांनी केले आहे.

ग्रामपातळीवरून प्राप्त होणारे प्रस्ताव तालुका, जिल्हा आणि राज्य शासनाच्या संबंधित यंत्रणांकडे आवश्यक त्या कागदपत्रांसह पाठविण्यासाठी आपण सहकार्य करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

**आदिवासी समाजाला मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न**

वनहक्काच्या जमिनींचा प्रश्न मार्गी लागल्यामुळे पोखरी परिसरातील आदिवासी समाजाला केवळ जमिनीचा हक्क मिळाला नसून त्यांच्या सामाजिक आणि आर्थिक स्थैर्याच्या दृष्टीनेही हा महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

आदिवासी बांधवांना त्यांच्या हक्कापासून वंचित राहावे लागू नये, तसेच शासनाच्या विविध योजनांचा लाभ त्यांना मिळावा, यासाठी यापुढेही प्रयत्न सुरू ठेवणार असल्याचे सुजित झावरे पाटील यांनी स्पष्ट केले.

महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक
समर्थ गांवकरी



## थोडक्यात पण महत्त्वाचे

### जय मल्हार ची सिद्धी सूंबरे ६०० मीटर धावणे प्रकारात जिल्हास्तरावर निवड



अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

पारनेर तालुकास्तरीय मैदानी स्पर्धेत ६०० मीटर धावणे या क्रीडा प्रकारात १४ वर्षे वयोगटात इयत्ता आठवीची विद्यार्थिनी सिद्धी गोरक्ष सुंबरें हिने तालुक्यात द्वितीय क्रमांक मिळवून जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी पात्र ठरली. तिला क्रीडा शिक्षक श्री गरकळ सरांचे मार्गदर्शन लाभले, विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री उंडे बी आर ,सर्व स्टाफ, संस्थेचे सचिव ड पांडुरंग गायकवाड ,सर्व संस्था पदाधिकारी ग्रामस्थ , पालक ,माजी विद्यार्थी मुंबईकर ,पुणेकर यांनी अभिनंदन केले व जिल्हा स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

### राजूर महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना वर्धापन दिन साजरा



राजूर (समर्थ गांवकरी)

येथील ॲड. मनोहरराव नानासाहेब देशमुख कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात २४ सप्टेंबर राष्ट्रीय सेवा योजना वर्धापन दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून श्री. लहानु परबत हे उपस्थित होते. तर अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. भाऊसाहेब देशमुख हे उपस्थित होते. या कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रीय सेवा योजना गीताने झाली.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक रा. से. यो. चे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. भरत शेणकर यांनी केले. आपल्या प्रास्तविक भाषणात डॉ.शेणकर यांनी राष्ट्रीय सेवा योजना स्थापने मागील उद्देश व या माध्यमातून आयोजीत करण्यात येणाऱ्या उपक्रमांची विस्तृत माहिती विद्यार्थ्यांना दिली.

राष्ट्रीय सेवा योजना उपक्रम हा विद्यार्थ्यांच्या सर्वांगिनी विकासासाठी कसा योग्य आहे याचे प्रतिपादन श्री. लहानु परबत यांनी केले. त्यांनी विद्यार्थ्यांना श्रमाची लाज बाळगु नये असे आवाहन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षिय भाषणात महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफेसर डॉ. भाऊसाहेब देशमुख यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या विविध उपक्रमांचा आढावा घेतला. महाविद्यालय व परिसरात रा. से. यो ने केलेल्या कामांची माहिती त्यांनी यावेळी उपस्थितांना दिली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. भरत शेणकर यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. संतोष अस्वले यांनी केले. या प्रसंगी रा. से. यो. चे कार्यक्रम अधिकारी, प्राध्यापक,सेवक वृंद व रा. से. यो. स्वयंसेवक हजर होते.

### मातंग समाज मुंबईत धडकणार!

#### उपवर्गीकरणाच्या मागणीसाठी २९ सप्टेंबरला महामोर्चा



मुंबई (समर्थ गांवकरी)

अनुसूचित जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाच्या मागणीसाठी मातंग समाजाकडून २९ सप्टेंबर रोजी मुंबईत महामोर्चा काढण्यात येणार आहे. राज्यभरातून सुमारे ५ लाख समाजबांधव मुंबईत दाखल होणार असल्याचा दावा आंदोलनाच्या आयोजकांनी केला आहे. आझाद मैदानावर हा मोर्चा होणार असून, शासन निर्णय जारी होईपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याचा इशारा देण्यात आला आहे. अनुसूचित जातींच्या १३ टक्के आरक्षणाचे अ, ब, क, ड असे उपवर्गीकरण करण्याची मागणी मातंग समाजाकडून करण्यात येत आहे. यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने १ ऑगस्ट २०२४ रोजी उपवर्गीकरणाला घटनात्मक मान्यता देण्याचा मार्ग मोकळा केला होता. त्यानंतर महाराष्ट्र सरकारने या विषयाचा अभ्यास करण्यासाठी न्यायमूर्ती अनंत मनोहर बदर यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली. या समितीने १६ मार्च २०२६ रोजी अहवाल सरकारकडे सादर केला. मात्र, अहवालावर अद्याप अंतिम निर्णय झालेला नसल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला आहे. उपवर्गीकरणाच्या मागणीसाठी राज्यातील विविध भागांत आंदोलनं आणि मोर्चे काढण्यात आले असून, २९ सप्टेंबरच्या मुंबईतील मोर्चातून सरकारवर निर्णयासाठी दबाव आणण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. जूनमध्येही सकल मातंग समाजाच्या बैठकीत सरकारने निर्णय न घेतल्यास २९ सप्टेंबरला महामोर्चा काढण्याचा इशारा देण्यात आला होता.

# मिळालेला प्रत्येक क्षण मनापासून जगायला शिका : डॉ. विश्वासराव आरोटे

## शेठ नानजीभाई खिमजीभाई ठक्कर यांच्या वाढदिवसानिमित्त सर्वोदय विद्यालयातील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

राजूर (समर्थ गांवकरी)

हसऱ्या चेहऱ्याची किंमत कधीच मोजता येत नाही.आनंदाची खरी व्याख्या कोणत्याच पुस्तकात सापडत नाही. जिवनात निघून गेलेली वेळ पुन्हा कधीच येत नाही. म्हणून मिळालेला प्रत्येक क्षण मनापासून जगायला शिका.असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा समर्थ दैनिक गांवकरीचे मुख्य संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांनी केले.

थोर समाजसेवक दानशूर व्यक्तिमहत्त्व शेठ नानजीभाई खिमजीभाई ठक्कर (ठाणावाला) यांच्या वाढदिवसानिमित्त सत्यनिकेतन संस्थेचे गुरूवर्य रा.वि. पाटणकर सर्वोदय विद्या मंदिर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,राजूर येथील गोरगरीब व गरजू विद्यार्थ्यांना स्कूल बॅग तसेच विविध शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.यावेळी डॉ. विश्वासराव आरोटे हे विचार मंच्यावरून बोलत होते.महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक मा.डॉ.विश्वासराव आरोटे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला.

यावेळी पुढे मार्गदर्शन करताना डॉ. विश्वासराव आरोटे यांनी सांगितले की,समाजातील गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध करून देणे ही सामाजिक बांधिलकी आहे.आर्थिक परिस्थितीमुळे कोणत्याही विद्यार्थ्याच्या शिक्षणात अडथळा येऊ नये,यासाठी समाजातील दानशूर व्यक्ती व संस्थांनी पुढाकार घेणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांनी उपलब्ध संधीचा योग्य उपयोग करून शिक्षणात प्रगती साधावी,असे आवाहन त्यांनी केले. ज्येष्ठ पत्रकार तथा माजी प्राचार्य प्रकाश टाकळकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शिक्षणाबरोबरच शिस्त,मेहनत आणि संस्कार यांचे महत्त्व सांगितले. विद्यार्थ्यांनी परिस्थितीवर मात करून ध्येय निश्चित करावे आणि सातत्याने प्रयत्न करत यश मिळवावे,असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमास ज्येष्ठ पत्रकार तथा माजी प्राचार्य प्रकाश टाकळकर,प्रकाश महाले,प्राचार्य भाऊसाहेब बनकर,पर्यवेक्षक



संजय व्यावहारे यांच्यासह विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे सहसचिव प्रा.सचिन लगड यांनी केले. विद्यालयाच्या वतीने उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. शेवटी प्राचार्य भाऊसाहेब बनकर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन नानासाहेब शिंदे यांनी केले.

# सरसकट कर्जमाफी करा आता अधिकाऱ्यांनी पंचनामे करण्याचे नाटक बंद करा

## सरकारच्या निर्णयाचे स्वागत मात्र एकही शेतकरी वगळू नका .. बाळासाहेब नाईकवाडी

अकोले (समर्थ गांवकरी)



जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची निवडणूक सुरू झाली असून एकीकडे बळीराजा पाऊस नसल्यामुळे चिंतेत असताना दुसरीकडे मात्र या सरकारला निवडणुकीचे पडले आहे का असा संतप्त सवाल अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे तालुका कार्याध्यक्ष तथा अगस्ती सहकारी साखर कारखान्याचे ज्येष्ठ संचालक बाळासाहेब नाईकवाडी यांनी केला आहे नाईकवाडी यांनी बोलताना सांगितले आहे की या निवडणुकीत राजकीय नेते निवडणुकीसाठी बिनविरोध करण्याचा प्रयत्न करतात तर दुसरीकडे मात्र १४ तालुक्यातील दुष्काळाने शेतकरी होरपळून निघाला आहे या शेतकऱ्यांना सरकारने सरसकट कर्जमाफीची घोषणा केली तसेच संपूर्ण जिल्ह्यातील १४ तालुक्यातील शेतकऱ्यांचे नुकसान झाले असून सर्व शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वीच नुकसान भरपाई द्यावी व पतसंस्था बँका खाजगी सावकारांनी वसुलीसाठी शेतकऱ्यांना त्रास देऊ नये जिल्हा बँकेने पुन्हा शेतकऱ्यांना कर्ज देऊन रब्बी पिकासाठी सहकार्य करावे असे आव्हान देखील त्यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार राज्याचे कृषिमंत्री दत्ता भरणे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे .....राजकीय नेत्यांनी आपल्या शिमगा थांबवा शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन नुकसानग्रस्त पिकांची पाहणी करून नुसती राजकीय फोटोसेशन करू नये त्या बळीराजासाठी आता मदत करणे ही काळाची गरज आहे ज्या शेतकऱ्यांच्या मुलींचे लग्न जमले असेल त्या मुलींना व आई-वडिलांना मदत करा विद्यार्थ्यांना फी साठी मदत करा वाढदिवस साजरे न करता अण्णाठायी खर्च शेतकऱ्यांसाठी खर्च करा शेतकऱ्यांनी देखील पाण्याचे महत्व जाणून घ्या ज्या ठिकाणी पाणी आहे त्या ठिकाणी आरक्षित करा सरकारने मात्र डोळ्यादेखत पाण्याचा गैरवापर थांबवावा धरणे बंधारे आमच्या तालुक्यात कॅनॉल ने पाणी २४ तास धावत आहे कॅनाल बंदिस्त केल्यामुळे अकोले तालुका वंचित आहे..पाऊस थांबला आहे पावसाळी पिके जळून गेली एकीकडे कर्ज डोक्यावर एकरी सोयाबीन पिकासाठी व इतर पिकांसाठी एकरी ८० ते ९० हजार रुपये खर्च येतो शासन मात्र ५० हजार रुपये देऊन शेतकऱ्यांचे पाने पुसणार का जखम शेंडीला मलम गुडघ्याला हे थांबवा प्रथम शेतकऱ्यांचे नुकसान झाले त्यांच्या बांधावर अधिकाऱ्यांनी जावे शासकीय कार्यालयात बसून एसीची हवा खाऊन पंचनामे करू नये मंडळ तलाठी कृषी अधिकारी व गाव पातळीवर असणाऱ्या कृषी सहायकांनी तोंड पाहून काम करू नये याचे नुकसान असेल त्याला मदत झाली पाहिजे.

# अहिल्यानगर तालुक्यातील नेप्तीत वेताळबाबा मित्र मंडळाच्या क्रिडा स्पर्धा उत्साहात

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

नगर तालुक्यातील नेप्ती येथील श्री संत सावता महाराज मंदिर प्रांगणात वेताळबाबा मित्र मंडळ व द किंग ग्रुप, नेप्ती यांच्या संयुक्त विद्यमाने गणेशोत्सवानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या भव्य क्रीडा स्पर्धा उत्साहात व जल्लोषपूर्ण वातावरणात संपन्न झाल्या. २१ ते २३ सप्टेंबरदरम्यान तीन दिवस झालेल्या या स्पर्धांमध्ये नेप्ती व परिसरातील लहान मुले, महिला, पुरुष, युवक-युवती अशा ३०० हून अधिक स्पर्धकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. त्यामुळे संपूर्ण नेप्ती गावात गणेशोत्सवाच्या निमित्ताने सणासुदीचे वातावरण निर्माण झाले होते अशी माहिती रामदास फुले यांनी दिली.

या स्पर्धांचे उद्घाटन मंडळाचे अध्यक्ष शाहूराजे होले यांच्या हस्ते करण्यात आले होते. दररोज सायंकाळी



सात वाजता विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. पहिल्या दिवशी लिंबू-चमचा व तळ्यात-मळ्यात या मनोरंजक स्पर्धांनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. लिंबू-चमचा स्पर्धेत महिला व पुरुषांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. समतोल राखत लिंबू चमच्यातून घेऊन जाण्याच्या या स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. त्यानंतर झालेल्या तळ्यात-मळ्यात स्पर्धेत युवकांनी उत्साहाने सहभाग घेतला.

दुसऱ्या दिवशी रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत २३ हून अधिक महिला व युवतींनी सहभाग घेतला. गणपती, फुलांची रांगोळी, निसर्गचित्रे अशा विविध विषयांवर आकर्षक रांगोळ्या साकारण्यात आल्या. सुमारे तीन तास रंगलेल्या या स्पर्धेत महिलांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळाले.

अंतिम दिवशी संगीत खुर्ची व ग्लास बॅलन्सिंग रेस या स्पर्धा घेण्यात आल्या. संगीत खुर्चीमध्ये लहान मुले , युवकांनी व महिलांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला. विजेत्यांची घोषणा होताच उपस्थितांनी टाळ्यांचा कडकडाट करीत त्यांचे अभिनंदन केले. ग्लास बॅलन्सिंग रेसमध्ये डोक्यावर पाण्याने भरलेला ग्लास ठेवून तो न सांडता धावण्याचे आव्हान स्पर्धकांसमोर होते.

# 'आयडियाचा आविष्कार २०२६'मध्ये महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयाचा दबदबा

## मास्टरमाईंड ३.0 ला प्रथम क्रमांक; OMNEX प्रकल्पाला उत्तेजनार्थ पारितोषिक

श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)

कर्जत येथील दादा पाटील महाविद्यालयात आयोजित जिल्हास्तरीय 'आयडियाचा आविष्कार २०२६' स्पर्धेत श्रीगोंदा येथील रयत शिक्षण संस्थेच्या महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयाच्या (कनिष्ठ विभाग) विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करत महाविद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला.

स्पर्धेत विद्यार्थ्यांनी नाविन्यपूर्ण कल्पना, तांत्रिक कौशल्य आणि प्रभावी सादरीकरणाच्या जोरावर आपली गुणवत्ता सिद्ध केली. 'मास्टरमाईंड ३.0' या प्रकल्पासाठी वैभव संजय शेलार आणि सौरभ हौसराव घोडके यांनी प्रथम क्रमांक



पटकावला. तर 'जचछ्एद' या प्रकल्पासाठी अमन नियाज शेख आणि आदिनाथ संदीप मोहिते यांना उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले.

या यशामागे एआय समिती प्रमुख प्रा. ओंकार पवार, विज्ञान प्रदर्शन समिती प्रमुख प्रा. श्रद्धा जवळकर, आयटी विषय प्रमुख प्रा. साक्षी जाधव तसेच विज्ञान विभागातील सर्व शिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल महाविद्यालयीन विकास समितीचे प्रमुख बबनराव पाचपुते, रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य बाबासाहेब भोस, महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. प्रकाश साळवे, वरिष्ठ विभागाचे उपप्राचार्य डॉ. नितीन थोरात व डॉ. सुदाम भुजबळ, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा. श्रीकांत थोरात, पर्यवेक्षक प्रा. रत्नाकर झिटे, विज्ञान विभागप्रमुख उषा बोरुडे, कला विभागप्रमुख प्रा. दरेकर, वाणिज्य विभागप्रमुख मगर सर तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे आणि मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांच्या या कामगिरीमुळे नवकल्पना, संशोधनवृत्ती आणि तंत्रज्ञानाधारित शिक्षणाला चालना मिळाल्याचे मत व्यक्त करण्यात आले असून, भविष्यातही अशाच स्पर्धांमध्ये विद्यार्थी अधिक जोमाने सहभागी होतील, असा विश्वास महाविद्यालय प्रशासनाने व्यक्त केला.

## हळगाव कृषी महाविद्यालयातील रँगीग प्रकरणी सहा विद्यार्थी एक सत्रासाठी निलंबित, वसतीगृहातून कायमचे टाकले काढुन

जामखेड (समर्थ गांवकरी)

तालुक्यातील हळगाव येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषी महाविद्यालयात प्रथम वर्षाच्या तीन विद्यार्थ्यावर सिनिअर विद्यार्थ्यांनी रॅगिंग करून अमानुष मारहाण प्रकरणी चार विद्यार्थ्यांवर जामखेड पोलीसांत गुन्हा दाखल झाला होता. दरम्यान महाविद्यालयाचे प्राचार्यांनी पाच जणांची समिती नियुक्त करून अहवाल मागितला होता. त्या अहवालानुसार एकदंर सहा विद्यार्थी दोषी आढळले. त्या सर्वांना एका सत्रासाठी निलंबित केले आहे. तसेच वसतिगृहातून कायमचे काढून टाकले आहे. व नुकसानभरपाई एक हजार रुपये प्रति विद्यार्थी दंड केला आहे.

जामखेड तालुक्यातील हळगाव येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषी महाविद्यालयात प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या तीन विद्यार्थ्यांना ७ सप्टेंबर रोजी महाविद्यालयाच्या वसतीगृहात रात्री १०.१५ वाजता काही वरिष्ठ विद्यार्थ्यांनी फिर्यादी वेदांत तळुले व त्यांच्या दोन मित्रांना फॉर्मल कपड्यांत आपल्या खोलीत बोलावून घेतले. त्या ठिकाणी सिनिअर मुलांनी फिर्यादीचा मोबाइल जबरदस्तीने काढून घेतला. सर्व विद्यार्थ्यांना एका रांगेत उभे करून मानसिक व शारीरिक त्रास दिला. फिर्यादीने विनंती केल्यानंतर त्याचा मोबाइल परत मिळाला. या प्रकारानंतर फिर्यादीने वसतिगृहाच्या रेक्टरला घटनेची माहिती दिली.

रेक्टरने सिनिअर मुलांना समज देत आपापल्या खोलीत पाठवले.

# अहिल्यानगर मध्ये पंडित दीनदयाळ नागरी पतसंस्थेत दीनदयाळ उपाध्याय यांना ११० व्या जयंतीनिमित्त अभिवादन

## पंडित दीनदयाळ यांच्या विचारातूनच सहकाराचा खरा विकास : वसंत लोढा

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

पंडित दीनदयाळ उपाध्याय यांनी अंत्योदय आणि एकात्म मानववादाचा विचार देशाला दिला.शेवटच्या घटकाचा विकास हाच खरा विकास आहे.हा त्यांचा मंत्र आजही सहकार क्षेत्रासाठी मार्गदर्शक आहे.पंडित दिनदयाळ पतसंस्थेची वाटचाल पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या विचाराने सुरू आहे.

पतसंस्थेच्या माध्यमातून सामान्य माणसाची समाजात पत निर्माण करणे हा मुख्य उद्देश ठेवून पतसंस्थेचे कार्य सुरू आहे.ज्यांना ५०००रुपये कर्ज दिले. आज ते ५०लाख रुपये कर्ज घेत मोठा व्यवसाय करत होते.सामान्य माणसाला उभं करण्यासाठी पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या विचारांची गरज आहे. असे प्रतिपादन पंडित दीनदयाळ नागरी सहकारी पतसंस्थेचे संस्थापक चेअरमन वसंत लोढा यांनी केले आहे.

पंडित दीनदयाळ नागरी सहकारी पतसंस्था व पंडित दिनदयाळ परिवार प्रतिष्ठान ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या ११० व्या जयंती निमित्त त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.याप्रसंगी पतसंस्थेचे संस्थापक चेअरमन वसंत लोढा,पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठानचे अध्यक्ष धनंजय तागडे, सचिव बाळासाहेब भुजबळ, कार्याध्यक्ष सुरज अग्रवाल, भाजपचे मुकुल गंधे,अनिल सबलोक,महावीर कांकरिया, अजिंक्य गुरावे,पतसंस्थेचे व्यवस्थापक निलेश लाटे, सुखदेव दरेकर,वसुली अधिकारी उमेश मेरगु,सागर बडे,गणेश जंगम आदी उपस्थित होते.

सुरज अग्रवाल म्हणाले,पंडित दीनदयाळ उपाध्याय यांचे विचार तरुणांना



प्रेरणादायी आहेत.शालेय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळण्यासाठी डाक विभागाने पंडित दीनदयाळ उपाध्याय यांचे नावाने स्पर्श शिष्यवृत्ती योजना सुरू करण्याची मागणी करण्यात आली. आहे.याच स्पर्श योजनेचा विविध शाळांमध्ये प्रचार प्रसार करण्यात आला.तसेच परीक्षेच्या घेऊन विद्यार्थ्यांची निवड केली जाईल व विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजना मिळणार आहे. यावेळी अनिल सबलोक यांनी मनोगत व्यक्त केले. आभार बाळासाहेब भुजबळ यांनी मानले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे - ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : अ-१, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)/
कोकण विभागीय कार्यालयाचा पत्ता : शकुंतल बिल्डिंग, गाळा क्र. २, सेक्टर ५, कोपरखैरणे, नवी मुंबई ४००७०९

# अकोले बाजार समितीची २३ वी वार्षिक सभा उत्साहात

## उपबाजार, पेट्रोल पंप व विविध विकासकामांना गती देण्याची मागणी!










: लेखन :
**डॉ. विश्वासराव आरोटे**
कळसुबाई शिखरावरून

संपूर्ण राज्यावर दुष्काळाचे सावट असून, पावसाअभावी सोयाबीनसह खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अकोले तालुका दुष्काळग्रस्त जाहीर झाल्याच्या पार्श्वभूमीवर शासनाने आवश्यक पावले उचलली असून, दिवाळीपर्यंत शेतकऱ्यांना पीक नुकसानभरपाई मिळण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. शेतकऱ्यांना या संकटातून बाहेर काढण्यासाठी विद्युत बिल, कर्ज वसुली, पतसंस्थांची वसुली तसेच विद्यार्थ्यांच्या फीबाबत तगादा लावू नये, असे आवाहन अकोले विधानसभा मतदारसंघाचे आमदार डॉ. किरण लहामटे यांनी केले.

अकोले कृषी उत्पन्न बाजार समितीच्या २३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ते बोलत होते. सभेच्या अध्यक्षस्थानी बाजार समितीचे सभापती भानुदास पाटील तिकांडे होते. यावेळी आमदार लहामटे म्हणाले की, बाजार समितीत चांगले व्यापारी येऊ लागल्याने आडत व्यवसायाला चालना मिळाली आहे. कोतुळ, समशेरपूर आणि राजूर येथे उपबाजार सुरू झाल्यास शेतकऱ्यांना मोठी सुविधा मिळेल आणि बाजार समितीची उलाढालही वाढेल. बाजार समितीचा विकास करण्यासाठी आवश्यक ते सहकार्य करण्याची ग्वाही त्यांनी दिली. अकोले बसस्थानक, बाजारतळ आणि कारखाना रोडच्या धर्तीवर कृषी उत्पन्न बाजार समिती परिसराचे सुशोभीकरण व विकास करण्यासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यास आपण बांधील असल्याचे त्यांनी सांगितले.

बाजार समितीने शेतकऱ्यांसाठी गेल्या तीन वर्षांत राबविलेला विकासात्मक पॅटर्न राज्यासाठी आदर्श ठरेल, असेही ते म्हणाले.

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर बळीराजाला सर्वांनी सहकार्य करण्याची गरज आहे. अकोले तालुका दुष्काळाचा सामना करत असला, तरी याच तालुक्यातून संपूर्ण जिल्ह्याला पाणी मिळते. त्यामुळे शेतकऱ्यांच्या मालाला योग्य बाजारपेठ उपलब्ध करून देणे महत्त्वाचे आहे. बाजार समितीत जनावरे, हिरडा, कडधान्य यांसह विविध कृषी मालाची उलाढाल वाढविण्याची गरज असून, शेतकऱ्यांनी खाजगी व्यापाऱ्यांपासून सावध राहावे. पाडाळणे येथील शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात फसवणूक झाल्याचा उल्लेखही त्यांनी केला. शेतकरी हेच बाजार समितीचे आराध्य दैवत असून, त्यांच्या हिताला प्राधान्य द्यावे, असे आमदार लहामटे यांनी सांगितले.

यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांनी बाजार समितीच्या कामकाजाचे कौतुक केले. कोतुळ येथील पेट्रोल पंपामुळे बाजार समितीच्या उत्पन्नात सुमारे ४८ लाख रुपयांची वाढ झाली असून, राजूर व अकोले येथील पेट्रोल पंप सुरू झाल्यास उत्पन्नात तिप्पट वाढ होऊ शकते, असे त्यांनी सांगितले. बाजार समितीच्या विकासासाठी उपबाजार सुरू करण्याबरोबरच मंजूर पेट्रोल पंप तातडीने सुरू करण्याची मागणी त्यांनी केली.

अध्यक्ष व संचालक मंडळाने कोणतेही मानधन अथवा भत्ते न घेता संस्थेच्या व सभासदांच्या हितासाठी काम करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

माजी सभापती तथा अगस्ती सहकारी साखर कारखान्याचे ज्येष्ठ संचालक पर्वतराव नाईकवाडी म्हणाले की, बाजार समितीला गतवैभव प्राप्त करून देण्यासाठी मोठ्या प्रमाणात विकास निधीची आवश्यकता आहे. तोलारखिंड रस्ता झाल्यास मुंबईतील व्यापारी अकोले बाजार समितीत येऊ शकतील आणि शेतकऱ्यांचा माल काही तासांत मुंबईच्या बाजारपेठेत पोहोचू शकेल. बाजार समितीने नफ्याच्या दृष्टीने उचललेली पावले कौतुकास्पद असून, कोतुळ येथील पेट्रोल पंप सुरू करण्यासाठी संचालक मंडळाने केलेले प्रयत्न महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले. अगस्ती पतसंस्थेचे अध्यक्ष तथा अगस्ती सहकारी साखर कारखान्याचे ज्येष्ठ संचालक अशोकराव देशमुख यांनी संस्था आणि व्यवस्थापन ही दोन चाके सक्षम असतील, तर संस्था गतिमान होते, असे सांगितले. कोतुळ, समशेरपूर आणि राजूर येथे उपबाजार सुरू झाल्यास बाजार समितीची उलाढाल मोठ्या प्रमाणात वाढेल. बाजार समितीला आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी लोकप्रतिनिधींनी सहकार्य करावे, अशी मागणी त्यांनी केली. शेतकऱ्यांनी आपला चांगल्या प्रतीचा माल अकोले बाजार समितीतच विक्रीस आणावा.

कांदा व फ्लॉवर्स मार्केट सुरू करण्यासाठी प्रयत्न करावेत, अशी मागणीही त्यांनी केली. बाजार समितीचे सभापती भानुदास पाटील तिकांडे यांनी बाजार समितीच्या वाटचालीचा आढावा घेतला. १९८८ मध्ये संगमनेर–अकोले संयुक्त बाजार समितीचे विभाजन झाल्यानंतर अकोले बाजार समिती अस्तित्वात आली.

मागील तीन वर्षांत सभासदांचा विश्वास, कर्मचारी वर्गाचे प्रयत्न आणि संचालक मंडळाच्या सहकार्यामुळे संस्थेने प्रगती केली आहे. याच कामगिरीची दखल घेत बाजार समितीला राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर झाल्याचे त्यांनी सांगितले. संस्थेने शासनाकडे सुमारे १३ कोटी रुपयांचे विकास प्रस्ताव सादर केले असून, पणन महामंडळाकडून भरती प्रक्रियेला मान्यता मिळाल्यास कर्मचारी वर्गालाही बळ मिळेल, असे त्यांनी स्पष्ट केले.

बाजार समितीचे माजी व्यवस्थापक भाऊसाहेब शेणकर यांनी संस्थेच्या स्थापनेपासूनच्या वाटचालीचा आढावा घेतला. केवळ दीड लाख रुपयांच्या व्यवसायापासून सुरू झालेली संस्था आज सुमारे दीड कोटी रुपयांपर्यंत व्यवसाय करत असल्याचा अभिमान असल्याचे त्यांनी सांगितले.

संस्था उभी करताना कर्मचाऱ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागला; मात्र एकजुटीने काम केल्यामुळे आज संस्थेचा वटवृक्ष उभा राहिला असल्याचे त्यांनी नमूद केले.

सभेपूर्वी अहवाल सालातील दिवंगत मान्यवरांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. अहवाल सालात कांदा व भाजीपाला मोठ्या प्रमाणात बाजार समितीत आणणारे शेतकरी शरद सखाराम पानसरे, ताराचंद माने, भगवान एकनाथ अस्वले, सुनील बबन भांगरे, रोहिदास रामनाथ कोटकर, नामदेव दिनकर पावडे, सचिन नामदेव भोर, सागर उत्तम कराड, योगेश नामदेव कानडे, प्रकाश तुळशीराम जाधव, उत्तम गेनू जाधव, सोमनाथ विठ्ठल आवारी व संजय वाळीबा आवारी यांचा शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

मापाडी व हमाल वर्गातील अण्णासाहेब नाना वैद्य, मच्छिंद्र आनंदा पांडे, भास्कर प्रभाकर सोनवणे, गोरख सुखदेव शिंगवे, माधव शिवाजी शिंगवे व सचिन रमेश जाधव यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. आडते व व्यापारी वर्गातील विविध मान्यवरांचाही विशेष सत्कार करण्यात आला. सभेला अगस्ती पतसंस्थेचे अध्यक्ष अशोकराव देशमुख, माजी सभापती पर्वतराव नाईकवाडी, संदीप शेटे, भाऊसाहेब कासार, सुभाष काकड, शेळके, पाटीलबुवा सावंत, गीता आवारी, गंगाराम पापळ, शांताराम नेहे, साहेबराव देवकर, बाळासाहेब सावंत, ईश्वर वाकचौरे, योगेश आरोटे, शिवनाथ आरज, रूपाली कचरे, भास्करराव खांडगे, सचिन रंधे, चक्रधर सदगीर, स्वाती कोरडे, मंगल भांगरे, रामकृष्ण आवारी, भाऊसाहेब नाईकवाडी, तुकाराम खाडे, अब्दुल इनामदार, किरण कानकाटे, मारुती वैद्य आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे स्वागत व सूत्रसंचालन ज्येष्ठ संचालक बाळासाहेब सावंत यांनी केले. अध्यक्षपदाची सूचना शिवाजी आरज यांनी केली. श्रद्धांजलीचा ठराव योगेश आरोटे यांनी मांडला. प्रास्ताविक ज्येष्ठ संचालक भास्करराव खांडगे यांनी केले. सन २०२५–२६ चा उत्पन्न–खर्च ताळेबंद, वार्षिक अहवाल व लेखापरीक्षण अहवालाचे वाचन व्यवस्थापक राजेंद्र जगताप यांनी केले. आभार ज्येष्ठ संचालक भाऊसाहेब नाईकवाडी यांनी मानले. सभेला मोठ्या संख्येने सभासद उपस्थित होते.

**■ बाजार समिती सुशोभीकरणासाठी कोट्यवधींचा निधी देण्यास बांधील : आमदार लहामटे**

**■ तोलारखिंड रस्ता झाल्यास शेतकऱ्यांचा माल थेट मुंबई मार्केटमध्ये जाईल मुंबईचे व्यापारी देखील या बाजार समितीत व्यापार करतील : नाईकवाडी**

**■ अकोले बाजार समितीच्या विकासाचा 'पॅटर्न' राज्यात आदर्श ठरेल; कोट्यवधींचा निधी देणार : आमदार लहामटे**

**■ कोतुळ पेट्रोल पंपामुळे ४८ लाखांचे उत्पन्न; राजूर व अकोले येथील पंप सुरू झाल्यास उत्पन्नात तिप्पट वाढ होईल : डॉ. विश्वासराव आरोटे**

**■ भानुदास तिकांडे यांच्या नेतृत्वाखाली अकोले बाजार समितीची भरारी; प्रगतीची दखल घेत राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर!**

# कौटुंबिक वादाचे राजकारण जिल्ह्यासाठी धोकादायक

## खासदारांना स्वीडन कुठे आहे हेही माहिती नाही, दोन वर्षांत जिल्ह्यासाठी एक रुपयाचा निधीही आणता आला नाही : डॉ. सुजय विखे पाटील



: लेखन :
**डॉ. विश्वासराव आरोटे**
कळसुबाई शिखरावरून

**■ दुष्काळ, विकास आणि प्रलंबित प्रकल्प सोडून कौटुंबिक विषयांचे राजकारण कशासाठी? रोहित पवारांना विखेंचा सल्ला; राजकारणात लक्ष्मणरेषा ठेवा, महाराष्ट्राचा सुसंस्कृतपणा जपा**

**■ कौटुंबिक वादात राजकारण करणे जिल्ह्यासाठी धोकादायक; डॉ. सुजय विखे पाटील**

**अहिल्यानगर :** खासदारांना स्वीडन कुठे आहे, हेही माहिती नाही, त्यामुळे त्यांनी या विषयावर भाष्य करू नये, असा टोला लगावत मागील दोन वर्षांत जिल्ह्याच्या विकासासाठी एक रुपयाचाही निधी आणता आला नाही, असा दावा माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी पत्रकार परिषदेत केला. जिल्ह्याच्या आणि जनतेच्या प्रश्नांवर बोलण्याऐवजी दुसऱ्यांच्या कौटुंबिक विषयांचे राजकारण करणे ही विचारसरणी जिल्ह्यासाठी धोकादायक असल्याचेही त्यांनी म्हटले.

डॉ. विखे पाटील म्हणाले की, राजकीय व्यक्तीचे राजकीय आणि व्यक्तिगत आयुष्य वेगळे असते. राजकीय क्षेत्रात पक्ष, भूमिका, आरोप–प्रत्यारोप असतात; मात्र व्यक्तिगत आयुष्याची एक मर्यादा असते. गेल्या काही वर्षांत खासदारांवर विविध आरोप झाले, महिलांशी संबंधित आरोप आणि कॉल रेकॉर्डिंगचे मुद्देही समोर आले. मात्र, आपण कधीही त्यांच्या व्यक्तिगत आयुष्याचा राजकीय फायदा घेण्याचा प्रयत्न केला नाही. आपली एकही अशी बाईट दाखवावी, ज्यामध्ये खासदारांच्या व्यक्तिगत आयुष्यावर किंवा चारित्र्यावर भाष्य केले आहे, असे आव्हानही त्यांनी दिले.

रोहित पवारांना सल्ला देताना डॉ. विखे पाटील म्हणाले की, आपण एका सुसंस्कृत परिवारातून आलेले लोकप्रतिनिधी आहात. पवार परिवाराने किंवा विखे पाटील परिवाराने कौटुंबिक विषय माध्यमांसमोर आणण्याचे काम केलेले नाही. राजकीय टीका करायची असेल तर आमच्या कार्यपद्धतीवर, सरकारच्या कामावर किंवा राजकीय भूमिकांवर करा; मात्र कौटुंबिक वादामध्ये पडू नका. महाराष्ट्राचा सुसंस्कृतपणा आणि राजकारणातील लक्ष्मणरेषा जपण्याची जबाबदारी सत्ताधारी तसेच विरोधी पक्षातील प्रत्येक लोकप्रतिनिधीची आहे. अन्यथा राजकारणात कोणतीही मर्यादा राहणार नाही आणि महाराष्ट्राच्या वैचारिक व सुसंस्कृत परंपरेला न शोभणारे राजकारण निर्माण होईल, असे ते म्हणाले.

दुष्काळाच्या प्रश्नांवर चर्चा करण्याऐवजी कौटुंबिक विषय का? असा सवालही त्यांनी उपस्थित केला. मागील पाच विधानसभा निवडणुकांमध्ये जनतेने विखे परिवाराला महाराष्ट्रातील पहिल्या पाच मताधिक्यांमध्ये स्थान दिल्याचा दावा करत कोणाच्या बोलण्याने आपण मोठे किंवा लहान होणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. जनसामान्यांचे कल्याण आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र तसेच अहिल्यानगर जिल्हा दुष्काळमुक्त करण्यासाठी काम करत राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रकल्पाच्या आंदोलनावरही टोला:

प्रलंबित प्रकल्पाच्या प्रश्नावर ५ तारखेला आंदोलन करण्याच्या घोषणेवर बोलताना डॉ. विखे पाटील यांनी, जी गोष्ट झालीच नाही, त्यावर आंदोलन कशासाठी? असा सवाल केला. त्यांच्या निवेदनाला जलसंपदा विभागाकडून योग्य ते उत्तर दिले जाईल. आपल्या माहितीनुसार या प्रकल्पाला कोणतीही स्थगिती देण्यात आलेली नाही किंवा स्थगितीचा आदेश नाही. त्यामुळे स्थगिती नसताना त्याविरोधात आंदोलनाची भूमिका घेणे हास्यास्पद असल्याचे त्यांनी म्हटले.

गेल्या ४० ते ५० वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या प्रकल्पाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मान्यता दिली असून मंत्रिमंडळात मंजुरी देऊन निधीची तरतूदही केली आहे. त्यामुळे प्रकल्पाचे काम लवकरात लवकर सुरू होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या प्रकल्पासाठी गेल्या ३०–४० वर्षांत अनेकांनी संघर्ष केला असून प्रत्येकाचे योगदान मान्य केले पाहिजे. श्रेयासाठी संघर्ष करण्यापेक्षा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले. रोहित पवारांनी या विषयावर भूमिका मांडली असेल, तर त्यांचे योगदानही नाकारत नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

दुष्काळावर सरकार गंभीर:

राज्यातील दुष्काळाच्या परिस्थितीवरही डॉ. विखे पाटील यांनी भाष्य केले. शेतकऱ्यांना मदत, विद्यार्थ्यांची फी माफी यांसह विविध मागण्या विरोधकांकडून केल्या जात आहेत. विरोधकांचे काम सरकारवर टीका करणे असून ते त्यांचे काम करत आहेत, असे ते म्हणाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मराठवाडा आणि विदर्भाचा दौरा करून शेतकऱ्यांशी थेट संवाद साधला आहे. दुष्काळासंदर्भातील शासन निर्णयात 'ट्रिगर–१' सक्रिय करण्यात आला असून अपेक्षित परतीचा पाऊस न झाल्यास पुढील टप्प्यात 'ट्रिगर–२' सक्रिय करण्याची प्रक्रिया होऊ शकते, अशी माहिती त्यांनी दिली. तांत्रिक बाबींचा सविस्तर खुलासा संबंधित विभाग करेल, असेही त्यांनी स्पष्ट केले.



जिल्हा बँकेच्या चेअरमनपदाबाबत म्हणाले...

अहिल्यानगर जिल्हा बँकेच्या चेअरमनपदासाठी आपल्या नावाची चर्चा सुरू असल्याच्या प्रश्नावर डॉ. सुजय विखे पाटील म्हणाले की, ही चर्चा आपल्या कानावरही आली आहे; मात्र आपण या पदासाठी कोणताही संघर्ष किंवा प्रयत्न करत नाही. मुख्यमंत्री ज्याला योग्य समजतील, तोच जिल्हा बँकेचा चेअरमन होईल, अशी आपली भूमिका स्पष्ट असल्याचे त्यांनी सांगितले.

आपल्या नावावर शिक्कामोर्तब व्हावे यासाठी आपण कुठेही धावत नसल्याचे सांगत, सध्या आपले प्रयत्न वेगळ्या दिशेने सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. जागतिक स्तरावर, विशेषतः वर्ल्ड बँकेसारख्या संस्थांमध्ये काम करण्याची संधी मिळू शकते का, तसेच देशाच्या आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर काम करण्याची संधी उपलब्ध होऊ शकते का, यासाठी आपण प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले. जिल्ह्याच्या राजकारणात मुख्यमंत्री जो निर्णय घेतील, तो मान्य असेल, हीच आपली कालची आणि आजचीही भूमिका असल्याचे डॉ. विखे पाटील यांनी पत्रकार परिषदेत स्पष्ट केले.

# अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची निवडणूक बिनविरोध करण्यासाठी सर्वपक्षीय नेत्यांची सकारात्मक भूमिका

**अहमदनगर (समर्थ गांवकरी)**



अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या आगामी पंचवार्षिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर संगमनेर येथे जिल्ह्यातील प्रमुख राजकीय नेते, लोकप्रतिनिधी आणि सहकार क्षेत्रातील मान्यवरांची बैठक पार पडली. दुष्काळी परिस्थिती, शेतकरी व सहकार क्षेत्रासमोरील आव्हाने लक्षात घेता बँकेची निवडणूक बिनविरोध करण्यासाठी सर्वांनी सकारात्मक प्रयत्न करण्याची भूमिका बैठकीत व्यक्त करण्यात आली.

या बैठकीला माजी मंत्री बाळासाहेब थोरात, माजी मंत्री शंकरराव गडाख, माजी खासदार सुजय विखे पाटील, माजी आमदार डॉ. सुधीर तांबे, आमदार आशुतोष काळे, आमदार संग्राम जगताप, आमदार हेमंत ओगले, आमदार विवेक कोल्हे, आमदार विक्रम पाचपुते, आमदार प्राजक्त तनपुरे, आमदार काशिनाथ दाते, आमदार अक्षय कर्डिले, श्रीरामपूरचे नगराध्यक्ष करण ससाने, श्रीगोंदा सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन राजेंद्र नागवडे, ज्येष्ठ नेते भगवानराव पाचपुते आणि प्रतापसिंह पाचपुते उपस्थित होते.

आमदार मोनिका राजळे आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे माजी अध्यक्ष चंद्रशेखर घुले यांनी ऑनलाइन माध्यमातून बैठकीत सहभागी होत या भूमिकेला पाठिंबा दर्शविला. राजकीय मतभेद बाजूला ठेवून जिल्ह्याच्या सहकार क्षेत्राच्या व्यापक हितासाठी बँकेची निवडणूक बिनविरोध करण्याचे प्रयत्न करण्यावर बैठकीत भर देण्यात आला. अनुपस्थित असलेल्या इतर नेत्यांशीही संपर्क साधून त्यांना या भूमिकेसोबत घेण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

# जिल्हास्तरीय शालेय तायक्वांदो स्पर्धा उत्साहात संपन्न

## रोमहर्षक सामन्यांनी रंगली स्पर्धा; विजयी खेळाडूंची पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड

**श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)**



शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, अहिल्यानगर यांच्या वतीने तसेच अहिल्यानगर जिल्हा म्युचर तायक्वांदो असोसिएशनच्या तांत्रिक सहकार्याने रयत शिक्षण संस्थेच्या महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालय, श्रीगोंदा व संजय आनंदकर स्पोर्ट्स अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय शालेय तायक्वांदो क्रीडा स्पर्धा उत्साहात संपन्न झाली.

अहिल्यानगर जिल्ह्यातील १४ तालुक्यांमधून तब्बल ९६६ खेळाडूंनी या स्पर्धेत सहभाग नोंदविला. १४, १७ व १९ वर्षे वयोगटातील विविध वजनगटांमध्ये झालेल्या या स्पर्धेत खेळाडूंनी आपल्या कौशल्याचा, वेगाचा, चपळाईचा आणि आक्रमक खेळाचा उत्कृष्ट नमुना सादर केला. अनेक सामने अत्यंत अटीतटीचे आणि रोमहर्षक झाल्याने उपस्थित क्रीडाप्रेमींची उत्सुकता शिगेला पोहोचली.

स्पर्धेचे उद्घाटन महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रकाश साळवे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरांगे, क्रीडा अधिकारी संतोष वाबळे, जिल्हा तायक्वांदो संघटनेचे अध्यक्ष संजय आनंदकर, तालुका क्रीडा अधिकारी रंजन तडवी तसेच पर्यवेक्षक प्रा. रत्नाकर झिटे यांची प्रमुख उपस्थिती होती.

स्पर्धेदरम्यान खेळाडूंनी तायक्वांदोमधील विविध डावपेच, तंत्रे आणि कौशल्यांचे प्रभावी सादरीकरण करत प्रतिस्पर्ध्यांवर मात केली. उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या सुवर्णपदक विजेत्या खेळाडूंची पुणे विभागीय शालेय तायक्वांदो क्रीडा स्पर्धेसाठी निवड करण्यात आली.